सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर मंगळवार, दि. ०५ ऑगस्ट २०२५ वर्ष - तिसरे अंक १२४ पाने : ८ किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# ओबीसी आरक्षणासासह महापालिकांच्या निवडणुका घेण्याचे सुप्रीम कोर्टाचे आदेश

मुंबई : महाराष्ट्राच्या राजकारणातील मोठी बातमी समोर येत आहे. गेल्या अनेक दिवसांपासून प्रभागरचना आणि ओबीसी आरक्षणाच्या मुद्दावरुन राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्या होत्या. यामुळे अनेक महापालिकांच्या निवडणुका तब्बल चार ते पाच वर्षांपासून रखडल्या आहेत. तिथे प्रशासकीय शासन सुरु आहे. मधल्या काळात कोरोना संकटामुळे या निवडणुका रखडल्या. नंतर ओबीसी आरक्षण आणि प्रभागरचनांच्या कारणास्तव या निवडणुका रखडल्या. सुप्रीम कोर्टात या प्रकरणी सुनावणी सुरु होती. अखेर सुप्रीम कोर्टाने याच प्रकरणी आज महत्त्वाचे आदेश दिले आहेत. त्यामुळे स्थानिक



स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा मार्ग आता मोकळा झाला आहे.

राज्यात महापालिका, नगर पालिका आणि जिल्हा परिषदेच्या निवडणुका या जुन्या की नव्या प्रभागरचनेनुसार पार पाडाव्यात? याबाबत अनेक मतभेद होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आधीच्या नेतृत्वातील सरकारने नवी प्रभागरचना आखली होती. पण महाविकास आघाडी सरकारने ती प्रभागरचना रद्द करत नवी प्रभागरचना आखली. पण नंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सरकार अस्तित्वात आल्यानंतर फडणवीस सरकारने आखलेली नवी प्रभागरचना लागू करण्यात आली. त्याला सुप्रीम कोर्टात आव्हान करण्यात आलं होतं. तेव्हा पासून हे प्रकरण न्याय प्रविष्ट होतं. अखेर सुप्रीम कोर्टाने याबाबत महत्त्वाचे आदेश आज दिले आहेत.

**कोर्टाचा निकाल नेमका काय?**

महापालिका, नगर पालिका, जिल्हा परिषद निवडणुका नव्या प्रभागरचनेनुसार करण्यास सुप्रीम कोर्टाने मंजुरी दिली आहे. नवीन प्रभागरचनेला आव्हान देणाऱ्या याचिका सुप्रीम कोर्टाने फेटाळल्या आहेत. विशेष म्हणजे या निवडणुका ओबीसी आरक्षणासासह घेण्याचे आदेश सुप्रीम कोर्टाने दिले आहेत. त्यामुळे आगामी निवडणुका या नव्या प्रभारचनेनुसार असतील.

गेल्यावेळी सुप्रीम कोर्टाचा आदेश आला त्यावेळी कोर्टाने पूर्वी जसं २७ टक्के आरक्षण होतं त्यानुसार निवडणुका घेण्यात याव्यात, असा आदेश दिला होता. ओबीसी आरक्षणाचा प्रश्न घटनात्मकदृष्ट्या चॅलेंज केला गेला आहे. तो प्रश्न तसाचा तसा राहील. २७ टक्के आरक्षणानुसार निवडणुका घेण्याचे आदेश कोर्टाने दिले होते. पण प्रभागरचेवरुन वाद होता. नवी प्रभारचना ठेवायची की जुनी ठेवायची? याबाबत वाद होता. अखेर कोर्टाने याबाबत आदेश दिले आहेत.

प्रभागरचना कशी ठेवायची त्याचा निर्णय तिथल्या राज्य सरकारचा असेल. राज्य सरकारने ठरवलेल्या प्रभागरचनेनुसार निवडणुका होतील. तसेच २७ टक्के आरक्षणाला आव्हान देणारी याचिका दाखल करण्यात आली होती. पण त्यावर सुप्रीम कोर्टाने म्हटलं की, याआधीच आम्ही २७ टक्के आरक्षणाने निवडणुका होतील. राज्याच्या निवडणुक आयोगाकडून निवडणुका होतील.

# ओव्हल कसोटीत टीम इंडियाने रचले अनेक विक्रम, इतिहासात होईल नोंद

लंडन: लंडनच्या ओव्हल मैदानावर पाचव्या कसोटी सामन्यात टीम इंडियाने केवळ इंग्लंडला पराभूतच केले नाही तर अनेक रेकॉर्डही रचले. कसोटी क्रिकेटचा हा सामना क्रिकेटप्रेमींसाठी रोमहर्षक असाच होता. शेवटच्या क्षणापर्यंत चाहत्यांच्या मनात धाकधूकच होती. अखेर भारताने शेवटची विकेट मिळवली आणि एकच जल्लोष सुरू झाला.

भारतीय संघाने पहिल्यांदा परदेशी भूमीर जिंकलेला कसोटी मालिकेतील पाचवा सामना आहे. इंग्लंडने भारताविरुद्ध २०१८ नंतर कोणतीही कसोटी मालिका जिंकलेली नाही. त्यानंतर भारताने २ सामने जिंकले तर २ अनिर्णीत राहिले. या कसोटी मालिकेत एकूण ७१८७ धावा झाल्या, जी कोणत्याही द्विपक्षीय कसोटी मालिकेतील दुसऱ्या क्रमांकाची सर्वोच्च धावसंख्या आहे.

या मालिकेत संघांनी १४ वेळा ३०० किंवा त्याहून अधिक



धावा केल्या, जो एक संयुक्त-उच्च विक्रम आहे.

२. फलंदाजीतील विक्रम: या मालिकेत ९ भारतीय फलंदाजांनी ४०० किंवा त्याहून अधिक धावा केल्या, जो एक नवा विक्रम आहे. एकूण ५० अर्धशतके आणि २१ शतके या मालिकेत नोंदवली गेली, हे दोन्ही संयुक्त-उच्च विक्रम आहेत. १९ शतकी भागीदारी झाल्या, जी कसोटी इतिहासातील एक संयुक्त-सर्वोत्तम आकडेवारी आहे.

३. शुभमन गिलचे नेतृत्व आणि संघाला मिळालेला आत्मविश्वास: ओव्हल येथील विजयाने भारतीय क्रिकेटला नवा आत्मविश्वास दिला.शुभमन गिलच्या नेतृत्वाखालील टीम इंडियाने इंग्लंडमध्ये इतिहास रचला. तसेच, गिल आणि कंपनीने ओव्हल कसोटीत बाजी पलटवली. यावरून शुभमन गिलचे कर्णधार म्हणून योगदान महत्त्वाचे ठरले हे स्पष्ट होते.

४. मोहम्मद सिराजची शानदार गोलंदाजी:

मोहम्मद सिराजने गोलंदाजीत महत्त्वाची भूमिका बजावली. इंग्लंडमधील एका मालिकेत सर्वाधिक बळी घेण्याच्या बाबतीत त्याने जसप्रीत बुमराहच्या विक्रमाशी बरोबरी केली. सिराजने या मालिकेत २३ बळी घेतले.



# सुप्रीम कोर्टाच्या राहुल गांधींना कानपिचक्या

नवी दिल्ली : काँग्रेस खासदार राहुल गांधी यांच्याविरुद्धच्या फौजदारी मानहानीच्या प्रकरणाची सुनावणी करणारे न्या. दीपांकर दत्ता आणि न्या. ऑगस्टीन जॉर्ज मसीह यांच्या खंडपीठाने गांधी यांच्या चीनबाबतच्या यांच्या विधानांशी तीव्र असहमती व्यक्त केली. असे मुद्दे संसदेत उपस्थित करण्याऐवजी सोशल मीडियावर विधाने का करत आहात आणि तुमची विधाने कोणत्याही विश्वासार्ह माहितीवर आधारित आहेत का? असेही प्रश्न न्यायालयाने विचारले. तीन आठवड्यांनंतर या खटल्याची पुन्हा सुनावणी होईल.

बॉर्डर रोड्स ऑर्गनायझेशनचे (बीआरओ) माजी संचालक उदय शंकर श्रीवास्तव यांनी दाखल केलेल्या मानहानीच्या तक्रारीत म्हटले आहे की, राहुल गांधी यांनी भारत जोडो यात्रे दरम्यान १६ डिसेंबर २०२२ रोजी चीनने भारताचा भूभाग बळकावल्याबाबतची कथित टिप्पणी केली होती. राहुल गांधींच्या वतीने युक्तिवाद करणारे ज्येष्ठ वकील अभिषेक मनु सिंघवी यांचीच न्यायालयाने उलटतपासणी घेतली.

अभिषेक मनु सिंघवी म्हणाले की, विरोधी पक्षनेते असे मुद्दे उपस्थित करू शकत नसेल तर ती दुर्दैवी परिस्थिती असेल. वृत्तपत्रांच छापलेल्या गोष्टीही बोलता येत नसतील तर विरोधी पक्षनेते असू शकत नाहीत. यावर न्यायमूर्ती दत्ता म्हणाले, तुम्ही (राहुल) संसदेत जे काही बोलायचे आहे ते तेथेच का बोलत नाही? तुम्हाला हे समाज माध्यमांवरून का बोलावे लागते? असा सवाल न्यायालयाने केला. गांधी यांच्या टिप्पण्यांशी आणखी असहमती व्यक्त करताना न्यायमूर्ती दत्ता यांनी सिंघवी यांना विचारले की तुम्हाला (गांधी) कसे कळले की २००० चौरस किलोमीटर भारतीय भूभाग चिनी लोकांनी व्यापला आहे? तुम्ही तिथे होता का? तुमच्याकडे काही विश्वासार्ह माहिती आहे का? तुम्ही कोणत्याही पुराव्याशिवाय ही विधाने का करत आहात?, असे देखील सवाल न्यायमूर्तींनी केले.

# नमो घाट बंद, मणिकर्णिका घाटावर मृतदेहांची रांग

## अंत्यसंस्कारासाठी दुप्पट पैसे; गंगेने धोक्याची पातळी ओलांडली

वाराणसी: वाराणसीतील गंगा नदीने रविवारी धोक्याची पाणी पातळी ओलांडली आहे. जलस्तर ५७ सेंटीमीटरने जास्त नोंदण्यात आला. यामुळे सध्या गंगा नदीला पूर येण्याची भीती वाढली आहे. यामुळे पहिल्यांदाच नमो घाट पूर्णपणे बंद करण्यात आला आहे. तर, घाटावर बांधलेली आकर्षक नमस्ते रचना पूर्णपणे गंगा नदीतच्या पाण्यात बुडण्याच्या मार्गावर आहे. पाण्याची पातळी पाहता पर्यटक आणि भाविकांची ये-जा थांबवण्यात आली आहे. यापूर्वी नमो घाटावर पुराचे पाणी इतक्या प्रमाणात कधीच आले नव्हते.

पाण्याची पातळी इतकी वेगाने वाढत आहे की शीतला



घाटाच्या रस्त्यावर पाणी साचले आहे. अस्सी घाटाच्या रस्त्यांवर पाणी साचले आहे. समोरील घाटाच्या रस्त्यावर पुराचे पाणी आले आहे.

**गंगेची पाणी पातळी वाढली**

सध्या पुराचे पाणी बीएचयूच्या ट्रॉमा सेंटरपासून फक्त ८०० मीटर अंतरावर आहे. गंगेचे पाणी श्री काशी विश्वनाथ मंदिराच्या पायऱ्यांकडेही वेगाने वाढत असल्याचं दिसत आहे. तर, गंगा द्वारच्या फक्त १३ पायऱ्या शिल्लक आहेत. जर पाण्याची पातळी अशीच वाढत राहिली तर गंगा द्वारच्या आणखी काही पायऱ्या पाण्याखाली जाऊ शकतात.


**४४ गावांना फटका**

वाराणसीतील ४४ गावांना पुराचा तडाखा बसला आहे. यामुळे १४१० कुटुंबांना आपलं घरं सोडावं लागलं आहे. ६२४४ शेतकऱ्यांचे १७२१ एकर पीक पाण्याखाली गेले आहे. तसेच, शहरी भागातील २४ हून अधिक वस्त्यांवर पुराचा परिणाम झाला आहे. गंगेची पाण्याची पातळी ताशी दोन सेंटीमीटर या वेगाने वाढत असल्याची महिती आहे. तसेच, वरुण, नाद आणि गोमती नद्याही दुथड्या भरुन वाहत आहेत. त्याचा परिणाम लोकवस्तीच्या भागात दिसून येत आहे. काशीचे ८४ घाट पाण्याखाली गेले आहेत.

नमो धाट पुर्णपणे पाण्याखाली गेल्यानंतर आता मणिकर्णिका घाटावर अंत्यसंस्कारासाठी गर्दी वाढली आहे. रस्त्यांवर पाणी साचल्याने गाड्या नाही तर होड्या धावताना दिसत आहे. मृतदेह बोटीने नेण्यासाठी शववाहिकांकडून २०० ते ५०० रुपये जास्त आकारले जात आहेत. मणिकर्णिका घाटावर मृतदेहांची रांग लागली आहे. अंत्यसंस्कारासाठी पाच ते सहा तास वाट पहावी लागत आहे. छतावरही अंत्यसंस्कार केले जात आहेत. इतकंच काय तर लाकडासाठीही दुप्पट किंमत आकारली जात आहे. हरिश्चंद्र घाटावरही पाणी साचलं आहे. पाण्याची पातळी वाढल्याने आता रस्त्यावर अंत्यसंस्कार करण्याची वेळ आली आहे.

# मोबाईल न दिल्याच्या रागात १६ वर्षीय मुलाची आत्महत्या

छत्रपती संभाजीनगर : आईने मोबाईल का दिला नाही ? या क्षुल्लक कारणावरून अवघ्या १६ वर्षांच्या मुलाने थेट डोंगरावरून उडी मारत आपला आयुष्य संपवण्याची घटना समोर आली आहे. ही धक्कादायक घटना छत्रपती संभाजीनगरमध्ये घडलीय . शहरा जवळील खवड्या डोंगरावरून तरुणांना उडी घेतल्याने त्याचा जागेच मृत्यू झाला .गेल्या काही दिवसांपासून अशाच कारणांमुळे घडलेल्या आत्महत्यांच्या घटना वारंवार समोर येत असल्याने पालकांसमोर आव्हान निर्माण झाले आहे .



छत्रपती संभाजीनगरमध्ये आईने मोबाईल का दिला नाही? या क्षुल्लक कारणावरून तब्बल १६ वर्षांच्या मुलाने थेट डोंगरावरून उडी मारत आपलं आयुष्य संपवलय. शहराजवळील खवडया डोंगरावर ही घटना घडली आहे. मूळचा बुलढाणा जिल्ह्यातील असलेला हा मुलगा आपल्या आई-वडिलांसोबत संभाजीनगरच्या वाळूज परिसरात राहत होता. तो सध्या पोलीस भरतीसाठी तयारी करत होता. काही दिवसांपूर्वी त्याने आई-वडिलांकडे मोबाईलची मागणी केली होती. मात्र, आईने सध्या मोबाईल घेऊ नको असं स्पष्ट सांगितल्याने तो नाराज झाला होता. आईने मोबाईल न दिल्याच्या रागात त्याने थेट खवडया डोंगर गाठला आणि उंचावरून उडी घेतली. या घटनेत त्याचा जागीच मृत्यू झाला. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असून, पुढील तपास सुरू आहे.

**मुलांच्या भावना समजून घ्याव्यात: पोलीस उपायुक्त प्रशांत स्वामी**

या प्रकारानंतर पोलीस उपायुक्त प्रशांत स्वामी यांनी अपील केलं आहे की, पालकांनी आपल्या मुलांना समजून घेणं गरजेचं आहे. मुलांमध्ये आलेली अस्थिरता, निर्णय घेण्याची घाई आणि तात्कालिक रागाचे परिणाम खूप गंभीर होऊ शकतात. पालकांनी संवाद वाढवावा, मुलांच्या भावना समजून घ्याव्यात, असं ते म्हणाले.

दरम्यान, मानसोपचार तज्ञ डॉ. संदीप शिसोदे यांचेही मत अधिक गंभीर आहे. ते म्हणाले, गेल्या काही वर्षांपासून मोबाईलचे आकर्षण इतकं प्रचंड वाढलं आहे की, मानसोपचार विभागात येणाऱ्या दहा केसेसपैकी नऊ केसेस या मोबाईलशी संबंधित असतात. मोबाईल मिळत नाही म्हणून मुले नैराश्यात जातात, चिडचिड करतात आणि काही वेळा जीवघेणं पाऊल उचलतात.

**मानसोपचार तज्ञ काय सांगतात?**

डॉ. शिसोदे पुढे सांगतात, ..मुलांना या वयात राग अनावर होतो, आजूबाजूला सगळ्यांकडे मोबाईल आहे मग माझ्याकडे का नाही माझे पालक मला का देत नाही असा विचार त्याच्या मनात येतो आणि त्यातून ते असले धोकादायक निर्णय घेऊ शकतात त्यामुळे पालकांनीही काळजी घेणं गरजेचं आहे .या वयात मुलांमध्ये राग अनावर होतो. त्यांना वाटतं, 'सगळ्यांकडे मोबाईल आहे, मग माझ्याकडे का नाही?' या असंतोषातून त्यांचं विचार करणं बंद होतं आणि ते धोकादायक निर्णय घेतात. म्हणूनच पालकांनी कठोरपणा न दाखवता संवादातून मार्ग शोधावा.

# छत्रपती संभाजीनगरमध्ये अवैध बांधकामावर हातोडा

## विरोध करणाऱ्यावर कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश

संभाजीनगर: छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने दोन दिवसांच्या विश्रांतीनंतर अवैध बांधकामविरुद्ध मोहीम पुन्हा सुरू केली आहे. आज दिल्ली गेट ते हर्सल टी पॉईंटपर्यंत ही धडक कारवाई करण्यात आली, यासाठी १५ जेसीबी, चार कोकलेन, पंधरा टिप्पर आणि मोठा पोलीस फौजफाटा तैनात करण्यात आला आहे.

वृत्तसंस्थेकडून मिळालेल्या माहितीनुसार या कारवाईला काही दुकानदारांनी सुरुवातीला विरोध केला खरा, परंतु कायदेशीर कारवाईच्या इशाऱ्यानंतर ते स्वतःहून अतिक्रमण काढण्यास तयार झाले. सांभाजीनगरमध्ये दिवसागणिक वाढत चाललेल्या



अवैध बांधकामाला अंकुश घालण्यासाठी आणि अतिक्रमण करणाऱ्यावर कारवाई करण्यासाठी औरंगाबाद खंडपीठाने कठोर भूमिका घेतली असून, अतिक्रमण काढत नसल्यास त्यांच्यावरती कायदेशीर कारवाई करा, असे स्पष्ट आदेश दिले आहेत.

अतिक्रमण संबंधित खंडपीठाने अनेक याचिका फेटाळून लावल्या असून, अवैध बांधकाम तोंडण्यासाठी नोटीस देण्याची गरज नसल्याचेही म्हटले आहे. ज्यांची अधिकृत घरे रस्त्यात येत आहेत, त्यांना महानगरपालिकेकडून टीडीआर दिला जाणार आहे. तर व्यावसायिक बांधकामे हटवली जात आहेत.

# झारखंडचे माजी मुख्यमंत्री शिबू सोरेन यांचे निधन



नवी दिल्ली : झारखंडचे माजी मुख्यमंत्री शिबू सोरेन यांचे सोमवारी ४ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी प्रदीर्घ आजाराने निधन झाले. ते ८१ वर्षांचे होते. शिबू सोरेन यांच्यावर दिल्लीच्या सर गंगाराम रुग्णालयात मागील एक महिन्यापेक्षा जास्त काळापासून उपचार सुरू होते. तिथेच शिबू सोरेन यांनी अखेरचा श्वास घेतला. झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत शिबू सोरेन यांनी वडिलांच्या निधनाचे वृत्त एक्स पोस्ट करुन दिले.

शिबू सोरेन यांना दिल्लीच्या सर गंगाराम रुग्णालयात जूनच्या शेवटच्या आठवड्यात दाखल केले होते. अनुभवी डॉक्टर शिबू सोरेन यांच्यावर उपचार करत होते. उपचार सुरू असतानाच सोमवारी सकाळी शिबू सोरेन यांनी अखेरचा श्वास घेतला. शिबू सोरेन यांच्या निधनाचे वृत्त कळताच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शोक प्रकट केला. तसेच झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्याशी फोनवरुन बातचीत केली.

मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी एक्स पोस्ट केली त्यात 'आदरणीय दिशोम गुरुजी हम सभी को छोड़कर चले गए हैं। आज मैं शून्य हो गया हूं...।' असा संदेश नमूद आहे. दिल्लीच्या सर गंगाराम रुग्णालयाने प्रसिद्धीपत्रक काढून झारखंडचे माजी मुख्यमंत्री शिबू सोरेन यांचे सकाळी आठ वाजून ५६ मिनिटांनी निधन झाल्याचे जाहीर केले. किडनीच्या समस्येने ग्रस्त असलेल्या सोरेन यांना दीड महिन्यांपूर्वी पक्षाघाताचा झटका आला होता. ते सुमारे एक महिना लाइफ सपोर्ट सिस्टमवर होते.

# गाव विकासाच्या सामाजिक उपक्रमात गावकऱ्यांचा सहभाग आवश्यक- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान**

छत्रपती संभाजीनगर - पर्यावरण रक्षण, स्वच्छता अभियान, वृक्षरोपण, रक्तदान यासारख्या गाव विकासाच्या सामाजिक उपक्रमात गावकऱ्यांचा सहभाग आवश्यक आहे,असे प्रतिपादन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज येथे केले.

महसूल सप्ताहानिमित्त आयोजीत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत आज जिल्हाधिकारी कार्यालयात विविध प्रमाणपत्र दाखल्यांचे वाटप करण्यात आले. त्यात जात प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, रहिवास दाखला, फेरफार




दाखले, शिधा पत्रिका इ.चा समावेश होता.

जिल्हाधिकारी कार्यालयात नियोजन सभागृहात हा कार्यक्रम पार पडला. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकूणे, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते,उपजिल्हाधिकारी संगिता राठोड, जिल्हा खनिकर्म अधिकारी अनिल घनसावंत, तहसिलदार शिवानंद बिडवे, अपर तहसिलदार डॉ. परेश चौधरी आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, महसूल विभाग हा आपल्या जीवनाशी निगडीत विभाग आहे. पूर्वी विविध कारणांने कामांमध्ये दिरंगाई होत असे. मात्र आता तंत्रज्ञानाचा अंगिकार झाल्याने कामांचा वेग वाढला आहे. जीवनमानात सुधारणा करतांना महसूल विभागामार्फत विविध उपक्रम राबविण्यात येत असतात. त्यात नागरिकांनी आपला सहयोग द्यावा,असे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले.

प्रास्ताविक निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते यांनी केले. अपर जिल्हाधिकारी अडकूणे यांनी महसूल सप्ताहात आयोजीत विविध उपक्रमांची माहिती दिली. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व दाखल्यांचे वाटप करण्यात आले.

# आता नवीन 'पॅन २.0' येणार!

नवी दिल्ली : गेल्या काही दिवसांत पॅन २.० सातत्याने चर्चेत आहे. आयकर विभागाने P-N २.०च्या आधुनिकीकरणासाठी मोठं पाऊल उचललं असून, खढ क्षेत्रातील आघाडीची कंपनी LTIMindtree ला हा प्रकल्प दिला आहे. नव्या प्रणालीसाठीचा करार ७९२ कोटी रुपयांहून अधिक रकमेवर मंजूर करण्यात आला आहे.

खरंतर पॅन कार्ड आता केवळ ओळखपत्र राहिलेले नाही, तर ते एक प्रगत डिजिटल साधन बनलं आहे. सरकारकडून आता पॅन २.० सादर केले गेलं आहे. जे पेपरलेस प्रक्रिया, युनिफाइड पोर्टल आणि डायनॅमिक क्यूआरकोड सारख्या आधुनिक वैशिष्ट्यांनी सुसज्ज आहे. तर पॅन २.० जरी सरकारने आणलं असलं तरी विद्यमान पॅनकार्ड धारकांना घाबरण्याचे काहीही कारण नाही. कारण, त्यांचे कार्ड अजूनही पूर्णपणे वैध आहे.

**काय आहे 'PAN 2.0'?**

P-N 2.0 हे स्थायी खाते क्रमांक (P-N) आणि कर वजावट व संकलन खाते क्रमांक (TAN) शी संबंधित सर्व सेवा एकाच प्लॅटफॉर्मवर आणणारं डिजिटल पोर्टल असेल. यामध्ये PAN वाटप, सुधारणा, आधार-पॅन लिंकिंग, पुन्हा इश्यू करणे, आणि ऑनलाइन पडताळणी अशा सर्व सेवा असणार आहेत.

नोव्हेंबर २०२४ मध्ये अर्थ मंत्रालयाने पॅन २.० सुरू केले. करदात्यांना चांगल्या, जलद आणि विश्वासार्ह सेवा प्रदान करण्याच्या यामागे उद्देश होता. हा उपक्रम भारताच्या डिजिटल पायाभूत सुविधांना अधिक मजबूत करण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल आहे. या अंतर्गत, आता पॅनशी संबंधित सर्व सेवा एकाच युनिफाइड पोर्टलवर उपलब्ध असतील.

# पिंपळनेर पोलिसांकडून गावठी पिस्तूल जप्त, एका आरोपीला अटक

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.४ ऑगस्ट**

जिल्ह्यातील पिंपळनेर पोलिसांनी एका व्यक्तीकडून गावठी पिस्तूल जप्त करून त्याला अटक केली आहे. किशोर रामभाऊ माटे (वय ३७, रा. लोणी, ता. जि. बीड) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.



दि.०४.०८.२०२५ रोजी पिंपळनेर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मधुसुदन घुगे यांना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, पिंपळनेर ते लोणी फाटा रस्त्यावर ओमकार हॉटेलसमोर एक व्यक्ती गावठी पिस्तूल घेऊन फिरत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सपोनि घुगे यांनी तात्काळ पोलीस उपनिरीक्षक गोलवाल, ग्रेपोउपनि शेळके, पोलीस नाईक बांगर, पोलीस शिपाई पठाण पो शी पिंपळे आणि पोलीस शिपाई सानप यांच्यासोबत दोन पंचांना घेऊन घटनास्थळी धाव घेतली.

हॉटेल ओमकारसमोर संशयित व्यक्ती उभा असताना पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याच्या कमरेला पाठीमागील बाजूस एक अर्धवट गंजलेले लोखंडी गावठी पिस्तूल आढळून आले. पोलिसांनी पिस्तुलाच्या परवान्याबाबत विचारणा केली असता, आरोपीकडे कोणताही परवाना नसल्याचे समोर आले.

जप्त केलेल्या गावठी पिस्तूलाचे अंदाजित मूल्य ४०,०००/- रुपये आहे. पोलिसांनी दोन पंचांसमक्ष पंचनामा करून पिस्तूल जप्त केले आहे. आरोपीने बेकायदेशीररित्या गावठी पिस्तूल बाळगून लोकांमध्ये दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचे निष्पन्न झाले आहे.आरोपीविरुद्ध भारतीय हत्यार कायदा कलम ३, २५ सह भारतीय न्याय संहिता, २०२३ कलम २२३ आणि महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.सदरील कारवाई पोलीस अधीक्षक श्री.नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी बाळकृष्ण हानपुडे पाटील यांचे मार्गदर्शनाखाली सहा.पोलीस निरीक्षक मधुसुदन घुगे, पोलीस उपनिरीक्षक गोलवाल, ग्रेपोउपनि शेळके, पोलीस नाईक बांगर, पोलीस शिपाई पठाण, पो शि पिंपळे आणि पोलीस शिपाई सानप यांनी केली आहे.

# अरोही स्टाईल स्टुडीओमुळे असंख्य महिलांचे करिअर घडले-उमाताई समशेट्टे

**नविन जागेतील स्थलांतर महिलांसाठी सोयीचे- सरोजनीताई हालगे**

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.४ ऑगस्ट**

महिलांनी आपला व्यवसाय सुरु करुन स्वतःच्या पायावर उभे रहावे यासाठी ब्युटी पार्लर व इतर कलांमध्ये निपुन असलेल्या जुन्या परळी भागातील श्रध्दा हालगे(फुलारी) या युवतीने सुरु केलेल्या अरोही स्टाईल स्टुडीओमुळे मागील काही वर्षात असंख्य महिलांनी स्वतःचे व्यवसाय उभे करत करिअर घडवले असल्याचे भाजपा शहराध्यक्षा उमाताई समशेट्टे यांनी सांगितले तर अरोही स्टाईल स्टुडीओ आता नविन रुपात परळीच्या मुख्य रस्त्यावर सुरु झाल्याने महिलांची सोय झाल्याचे माजी नगराध्यक्षा सरोजनीताई हालगे यांनी सांगितले.अरोही स्टाईल स्टुडीओ उर्जा कॉम्प्लेक्स, मिलिंद शाळेजवळ, राणी लक्ष्मीबाई टॉवर रोड येथे स्थलांतरित झाल्यानंतर आयोजित पानसुपारी कार्यक्रमात त्या बोलत होत्या.





अत्यंत माफक दरात मेकअप व इतर सुविधांच्या उपलब्धतेमुळे परळी शहर व परिसरातील महिला व युवतींच्या पसंतीस उतलेल्या श्रध्दा हालगे (फुलारी) यांच्या अरोही स्टाईल स्टुडीओचे उर्जा कॉम्प्लेक्स येथे स्थलांतर झाले आहे.अधिक विस्तृत जागेत,अत्याधुनिक साधनांसह नव्या रुपात सुरु झालेल्या या स्टडीओ स्थलांतरानिमीत्त रविवार दि.३ ऑगस्ट रोजी भाजपा शहराध्यक्षा उमाताई समशेट्टे,माजी नगराध्यक्षा सरोजनीताई हालगे,माजी नगरसेविका श्रीमती गंगाताई शिंदे,इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा श्रद्धाताई हालगे पुणे येथील मेकअप आर्टिस्ट मिना शैलेश जाधव,भाजपा महिला मोर्चाच्या शहराध्यक्षा सुचितााताई पोखरकर,रेणुकाताई वैजनाथ सोळंके,भाजपा शहर उपाध्यक्षा वर्षाताई जोशी,समिक्षा श्रीकांत पाथरकर धारुर येथील मेकअप आर्टिस्ट निलम रवी वावधनी यांच्या उपस्थितीत पानसुपारीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.यावेळी प्रमुख अतिथींचे स्वागत अरोही स्टाईल स्टुडीओच्या संचालिका श्रध्दा हालगे (फुलारी) यांनी केले.

सहकार्यासाठी सदैव तयार-श्रध्दा हालगे-फुलारी

मी ब्युटी पार्लर व्यवसायात पाऊल ठेवल्यानंतर व्यवसायापेक्षा मैत्री व महिला,युवतींनी आपापले व्यवसाय सुरु करावेत यासाठी सहकार्य करण्यावर भर दिला असुन आज जागतिक मैत्री दिनाचे औचित्य साधून आम्ही पानसुपारीचा कार्यक्रम आयोजित केलेला आहे.यासाठी मला माझ्या कुटुंबातील सर्व सदस्यांसह मैत्रिणींचे पाठबळ मिळत आहे.भविष्यातही सर्वांना सोबत घेवुन अरोही स्टाईल स्टुडीओच्या माध्यमातून कार्य करणार असल्याचे श्रध्दा हालगे (फुलारी) यांनी सांगितले.

# साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त बोरीसावरगाव येथे रक्तदान शिबिर

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.४ ऑगस्ट**



तालुक्यातील बोरीसावरगाव येथे साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर घेण्यात आले या सामाजिक उपक्रमात अनेक रक्तदात्यांनी रक्तदान केले.


कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती बोरीसारगाव चे सरपंच वैजनाथ रामभाऊ देशमुख उपसरपंच बाळकृष्ण रामलिंग यादव माजी उपसरपंच अंगद श्रावण पोळ ग्राम सदस्य अक्षय रावन पोळ ग्राम सदस्य विनोद सटवा पोळ ग्राम सदस्य गंगाधर अंबादास पौळ जालिंदर पोळ योगेश प्रकाश देशमुख ज्योतीभाऊ मुळे राजपाल भैया काकडे रक्तदान शिबिर आयोजन वीर फकीरा ग्रुप ने केले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष सुरज कुंडलिक पोळ उपाध्यक्ष दत्ता नंदू राव पौळ सचिव सत्यजित महादेव पोळ खजिनदार साई बजरंग पोळ ,कार्यक्रमाचे सल्लागार अंगद श्रावण पोळ अजय भिवाजी पोळ गोविंदा तुळशीराम पोळ दत्ता मारुती पोळ नितीन बापू पोळ प्रकाश धनराज पोळ आकाश धर्म पोळ राहुल संतोष पोळ राहुल ज्ञानोबा पोळ बालाजी बापू वाघमारे आकाश हरिभाऊ पोळ कुलदीप रमेश पोळ कुणाल गुरुरोबा पौळ आदींनी केले.सामाजिक उपक्रमाने जयंती साजरी केली

# १३ ऑगस्ट रोजी कृषिकुल येथे संवाद माध्यम प्रतिनिधींशी कार्यक्रमाचे आयोजन

**ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष मयंक गांधी यांचीही उपस्थिती**



**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.४ ऑगस्ट**



विकासपुरुष आणि सामाजिक कार्यकर्ते मयंक गांधी यांनी ग्लोबल विकास ट्रस्टची स्थापना करून या संस्थेच्या माध्यमातून अनेक लोकोपयोगी कामे केली आहेत. आजमितीस ग्लोबल विकास ट्रस्ट आणि कृषिकुल संस्थांच्या माध्यमातून राज्यभर आणि राज्याच्या बाहेर अनेक सामाजिक कामे केली जात आहेत. या सर्व गोष्टींच्या अनुषंगाने संवाद माध्यम प्रतिनिधींशी या विशेष कार्यक्रमांचे बुधवार, दिनांक १३ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजता आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमास मयंक गांधी यांची उपस्थिती असणार असून, बीड जिल्ह्यातील सर्व पत्रकार, संपादक तसेच सर्व माध्यमांच्या प्रतिनिधींना निमंत्रित करण्यात आले आहे.

ग्लोबल विकास ट्रस्ट आणि कृषिकुल या संस्थेच्या माध्यमातून शेतकरी केंद्रस्थानी ठेवत विविध कामे राज्यभर आणि राज्याच्या बाहेरही केली जात आहेत. ज्यामध्ये जलसंधारण, मृदा संधारण, शेतीचे आधुनिकीकरण आणि शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम संस्थेच्या माध्यमातून घेतले जातात. राज्याच्या विविध भागांतील शेतकरी शेतीच्या आधुनिक तंत्रज्ञानाचे धडे इथे घेऊन शाश्वत शेतीकडे वळले आहेत. सिरसाळा जवळ उभारलेल्या ग्लोबल विकास ट्रस्टच्या संकुल परिसरात विविध प्रयोगशाळा, प्रत्यक्ष फळबाग प्लॉट्स, गोशाळा तसेच शेतकरी प्रशिक्षण केंद्र उभे करण्यात आले आहे. संस्थेचे संस्थापक मयंक गांधी या सर्व विषयाच्या अनुषंगाने सर्व पत्रकार, संपादक तसेच मध्यम प्रतिनिधी बांधवांशी संवाद साधणार आहेत. यानुषंगाने बुधवार, दिनांक १३ ऑगस्ट २०२५ रोजी १२ वाजता संवाद माध्यम प्रतिनिधींशी या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. बीड जिल्ह्यातील सर्व पत्रकार, संपादक तसेच सर्व माध्यमांच्या प्रतिनिधींना या कार्यक्रमासाठी निमंत्रित करण्यात आले आहे. निमंत्रित सर्वांनी कार्यक्रमास आवर्जून उपस्थित रहावे असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# बीडमध्ये आ.क्षीरसागरांच्या उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान शिबिर उत्साहात

**आ.संदीप क्षीरसागरांच्या हस्ते महसूल विभागाच्या विविध दाखल्यांचे वितरण**



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.४ ऑगस्ट** ):-

बीड शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे बीड तहसील कार्यालयाच्या वतीने आ.संदीप क्षीरसागर यांच्या प्रमुख उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान शिबीर उत्साहात पार पडले. यावेळी महसूल विभागाच्या वतीने देण्यात येणार्या विविध दाखल्यांचे, आ.संदीप क्षीरसागर यांच्या हस्ते लाभार्थ्यांना वितरण करण्यात आले.

बीड तहसील कार्यालयाच्या वतीने महसूल सप्ताहाच्या निमित्ताने सोमवारी (दि.४) रोजी बीड शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास आ.संदीप क्षीरसागर यांची प्रमुख उपस्थिती होती. यामध्ये सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, विद्यार्थी व महिला यांना रहिवाशी प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, जातीचे दाखले, रेशन कार्ड, जन्म-मृत्यू प्रामाणपत्र तसेच प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र, संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ निवृत्ती वेतन योजना आदी योजनेच्या लाभार्थ्यांना मंजूरीपत्र व दाखल्यांचे वितरण आ.संदीप क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी आ.सय्यद सलीम, उपविभागीय अधिकारी कविता जाधव, तहसिलदार चंद्रकांत शेळके यांच्यासह बीड तहसील कार्यालयाचे अधिकारी कर्मचारी तसेच बीड तालुक्यातील महसूल विभागाच्या विविध योजनांचे लाभार्थी आणि सामान्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य हे समाजाला दिशा व चालना देणारे होते-विनायक रत्नपारखी

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.४ ऑगस्ट**



संयुक्त महाराष्ट्र व कामगार चळवळीचा बुलंद आवाज, थोर विचारवंत, समाज सुधारक, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीच्या निमित्ताने माजलगाव येथे लहुजी विद्रोही सेनेचे संस्थापक अध्यक्ष भास्कर शिंदे यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमात साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. या प्रसंगी भाजपा शहर मंडल अध्यक्ष विनायक रत्नपारखी यांनी अण्णाभाऊ साठे यांचे कार्य सांगताना म्हणाले अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य हे परिवर्तनाला दिशा व चालना देणारे होते. महाराष्ट्राच्या एकूणच जडणघडणीत आणि परिवर्तनात त्यांचे व त्यांच्या साहित्याचे योगदान महत्त्वपूर्ण मानले जाते. संयुक्त महाराष्ट्र चळवळ लोकमानसात रुजविण्याचे काम अण्णा भाऊ साठे यांनी केले. अण्णाभाऊनी आपले आयुष्य वंचित पीडित शोषित व्यक्तींना न्याय मिळावा म्हणून समाजासाठी संघर्ष करत संपूर्ण जीवन निस्वार्थ भावनेने समर्पित केले , त्यांनी परदेशात देखील आपल्या साहित्यातून कार्य केले व एवढेच नाही तर रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य किती महान होते हे आपल्या पोवाडा शाहिरीतून मांडले. गेल्या वर्षीच देवेंद्रजी फडणवीस यांनी रशियामध्ये त्यांच्या पुतळ्याचे अनावरण केले .त्यांचे कार्य हे देशातच नव्हे तर परदेशात विशेष म्हणजे रशियात देखील मांडले जाते रशियांच्या लोकांना अण्णाभाऊ साठे यांचे कार्य लवकर कळाले पण आपल्या लोकांना आजही अण्णाभाऊ साठेंचे कार्य हे कळाले नाही त्यामुळे यापुढील काळात त्यांचे कार्य कळावे म्हणून त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांनी केलेले विविध कार्य हे व्याख्याने व निबंध वक्तृत्व स्पर्धा ठेवून त्यांचे विविध कथा कादंबरी पुस्तकाचे समाजामध्ये वाटप करून त्यांचे कार्य सर्वांपर्यंत पोहोचन्यासाठी आपण सर्वांनीच प्रयत्न केले पाहिजेत व आपण अशाप्रकारे जयंतीच्या माध्यमातून उपक्रम घेतले तर त्यांची जयंती खऱ्या अर्थाने साजरी केली असे म्हणायला उचीत ठरेल. गेल्या अनेक वर्षापासून लहुजी विद्रोही सेनेचे संस्थापक अध्यक्ष भास्कर शिंदे हे अण्णाभाऊ साठे यांची जयंती विविध उपक्रम घेऊन जयंती साजरी करतात त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करून कौतुक केले. या कार्यक्रमाचे प्रसंगी राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते अच्युतराव लाटे शरद यादव अजय शिंदे , अजयसिंह राऊत या उपस्थित मान्यवरांनी देखील अण्णाभाऊ साठे यांचे कार्य मांडले. या कार्यक्रमास मा उपनगराध्यक्ष दिपक मेंडके राम राजे सोळंके अजय सिंह राऊत दिनकर शिंदे शरद कचरे आनंद कुलकर्णी संतोष जाधव नामदेव मुळे मनोज फरके सह विविध पक्षातील विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# धारूर न्यायालय परिसरात वृक्षारोपण कार्यक्रमाचा उत्साह, न्यायाधीश, पोलीस अधिकारी, प्राध्यापक व विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग



**तभा वृत्तसेवा**
**किल्लेधारूर दि.४ ऑगस्ट**

'झाडे लावा, झाडे जगवा' या संदेशाला मूर्त रूप देत किल्ले धारूर येथील न्यायालय परिसरात रविवारी, ३ ऑगस्ट रोजी भव्य वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमामुळे न्यायालय परिसर हिरवागार झाला असून, हा उपक्रम इतरांनाही प्रेरणा देणारा ठरला आहे.

यावेळी मार्गदर्शन करताना, अति जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. सुधीर भाजीपाले यांनी झाडांमुळे मिळणारा ऑक्सिजन, पावसाला मिळणारी मदत आणि फळांचे महत्त्व समजावून सांगितले. त्यांच्या मार्गदर्शनाने प्रेरित होऊन मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करण्यात आले. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. आनंद यावलकर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि दिवाणी न्यायाधीश क स्तर, धारूर येथील श्री. निलेश वाली यांच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम संपन्न झाला.

या कार्यक्रमात धारूर न्यायालयाचे न्यायाधीश श्री. निलेश वाली, अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश श्रीमती रेहमत शेख, केज न्यायालयातील न्यायाधीश श्रीमती एम. एस. कुलकर्णी आणि श्रीमती पी. व्ही. चव्हाण, धारूर पोलीस स्टेशनचे पी. आय. श्री. देविदास वाघमोडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

विविध क्षेत्रांचा सहभाग

या कार्यक्रमात राजमाता जिजाऊ महाविद्यालयाचे उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, प्रा. मोहन परजणे, जाहीर दादा पाटील सर, श्री. गणेश सोळंके, वकील आणि पत्रकार यांनीही सहभाग घेतला. बीड येथील 'डॉक्टर महिलांची झाडांची भिशी' या संघटनेने २० हजार रुपयांची झाडे भेट देऊन विशेष योगदान दिले. 'रयतमित्र फार्मर प्रोड्युसर कंपनी'ने कार्यक्रमाचे नियोजन केले, तर 'पर्यावरण समृद्धी मंच' आणि इतर अनेक संघटनांनी श्रमदान केले.

विद्यार्थ्यांचा सहभाग

राजमाता जिजाऊ महाविद्यालयातील एन.सी.सी. कॅडेट्स, 'कमवा व शिका' योजनेचे आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. मिलिंद गायकवाड आणि इतर प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

भविष्याचा संदेश

'चला, एक दिवस पर्यावरण रक्षणासाठी देऊया आणि एक झाड लावूया' या संकल्पनेतून आयोजित या कार्यक्रमात, प्रत्येक व्यक्तीने एक झाड भेट म्हणून आणण्याचे आवाहन करण्यात आले होते. यातूनच पर्यावरण संवर्धनासाठी समाजातील प्रत्येक घटकाने पुढे येण्याची गरज अधोरेखित झाली.

# इतिहास संकलनचा उत्सव: देवगिरी प्रांत अधिवेशनात चार इतिहास संशोधकांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा**
**कडा दि.४ ऑगस्ट**

इतिहास म्हणजे केवळ भूतकाळाचे संकलन नव्हे, तर राष्ट्राच्या स्मृतींचे श्रद्धा व प्रेरणास्थान. त्या स्मृतींच्या संजीवनीने प्रेरित होत महाराष्ट्रातील इतिहासप्रेमींनी संशोधनाचे व्रत घेतलेली संस्था म्हणजे इतिहास संकलन संस्था, महाराष्ट्र (देवगिरी प्रांत). या संस्थेच्या वतीने आयोजित केलेले तिसरे प्रांतीय अधिवेशन ही केवळ एक शैक्षणिक परंपरा नव्हे, तर इतिहासप्रेमाचा उत्सव ठरणार आहे. १२ व १३ ऑगस्ट २०२५ या दिवशी श्री सिद्धेश्वर महाविद्यालय, माजलगाव, जिल्हा बीड येथे होणाऱ्या या भव्य अधिवेशनात इतिहास संशोधन, समाजप्रबोधन, शिक्षण आणि संघटन क्षेत्रात लक्षणीय योगदान देणाऱ्या चार मान्यवरांना प्रतिष्ठेचे पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत.

या दोन दिवसीय राष्ट्रीय अधिवेशनाची संकल्पना देखील अत्यंत प्रेरणादायी आहे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर: नेतृत्व, सामाजिक सुधारणा आणि सांस्कृतिक पुनर्जागरण. या विषयाच्या अनुषंगाने विविध परिसंवाद, शोध निबंध व संवाद सत्रांचे आयोजन करण्यात आले आहे. अधिवेशनाचे आयोजन इतिहास विभाग, श्री सिद्धेश्वर महाविद्यालय, माजलगाव यांच्यातर्फे अखिल भारतीय इतिहास संकलन योजना (-BISY), नवी दिल्ली संलग्न इतिहास संकलन संस्था महाराष्ट्र देवगिरी प्रांत व भारतीय इतिहास अनुसंधान परिषद, (ICHR), नवी दिल्ली यांच्या सहकार्याने होत आहे.या अधिवेशनाचे प्रमुख आकर्षण म्हणजे संस्थेच्या वतीने देण्यात येणारे चार पुरस्कार. ही पुरस्कार परंपरा केवळ गौरवासाठी नव्हे, तर इतिहाससंशोधनातील मूल्यमापन, मूल्यप्रवणता आणि प्रेरणेसाठीचा एक महत्त्वाचा सन्मान आहे. श्री सु. ग. जोशी (लातूर) यांना 'बाबासाहेब आपटे ज्येष्ठ इतिहास संशोधक पुरस्कार', डॉ. प्रभाकर देव (नांदेड) यांना 'स्व. मोरोपंत पिंगळे शैक्षणिक कार्य पुरस्कार', प्रा. डॉ.राजेंद्र नन्नवरे (जळगाव) यांना 'स्व. हरिभाऊ वाकणकर शिक्षक पुरस्कार', तर श्री हेमंत पोखरणा (कडा, बीड) यांना 'स्व. डॉ. सतीश मित्तल संघटन पुरस्कार' प्रदान करण्यात येणार आहेत. हे सर्व पुरस्कार संस्थेच्या प्रांत कार्यकारिणीच्या बैठकीत एकमताने जाहीर करण्यात आले आहेत.

या पुरस्कार प्रक्रियेचे संपूर्ण नेतृत्व आणि संकल्पना डॉ. राधाकृष्ण जोशी, संस्थापक अध्यक्ष व पश्चिम क्षेत्रीय संघटन सचिव, अखिल भारतीय इतिहास संकलन योजना, नवी दिल्ली व प्रांताध्यक्ष डॉ. मुकुंद देवर्षी यांनी पार पाडली. डॉ . मुकुंद देवर्षी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यकारिणीच्या बैठकीत हा ऐतिहासिक निर्णय झाला. या कार्यकारिणीमध्ये राज्यभरातील ख्यातनाम संशोधक, इतिहासकार आणि शिक्षणतज्ज्ञांचा समावेश आहे. यामध्ये प्रा. धनंजय जवळेकर (सचिव), डॉ. रवी सातभाई (संघटन सचिव), डॉ. त्र्यंबक पाटील, आणि डॉ. बाबासाहेब शेप, उपाध्यक्ष, डॉ. शांता जाधवर, महिला प्रमुख , डॉ. गणपत गट्टी, संपर्क प्रमुख, बाळासाहेब गीते, कायदेविषयक सल्लागार, प्रा. शशिकांत पसारकर, कोषाध्यक्ष, डॉ . पुष्कर शास्त्री, बौध्दिक प्रमुख, डॉ . जगदीश बियाणी, लेखन प्रमुख, डॉ. हरी जमाले, निमंत्रित सदस्य, डॉ. गीतांजली बोराडे, सदस्य, डॉ. मोहिनी उपासनी, सहमहिला प्रमुख, यांचा यामध्ये सहभाग असून सर्वांनी एकमताने वरील नावावर शिक्कामोर्तब केले आहे.

अधिवेशनाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री सिद्धेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी हे निमंत्रक , डॉ. जी. पी. फसले (आयोजक सचिव) आणि प्रा. डॉ. के. के. मालू (सहसंयोजक). महाविद्यालयातील इतिहास विभागाच्या परिश्रमातून हे अधिवेशन इतिहासप्रेमींसाठी एक वैचारिक पर्वणी ठरणार आहे.

या अधिवेशनात राज्यभरातून आणि देशाच्या विविध भागातून इतिहास संशोधक, अभ्यासक, विद्यार्थी आणि विचारवंत सहभागी होणार असून, भारतीय परंपरेवर आधारित इतिहास लेखनाला चालना देण्याच्या दृष्टिकोनातून हे अधिवेशन ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचे ठरणार आहे. यानिमित्ताने ज्ञान, संशोधन आणि सांस्कृतिक संवाद यांचे त्रिसूत्री साध्य होणार असून, पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या कार्याचा दीप पुन्हा एकदा उजळणार आहे.

बीड विभागीय कार्यालय : आदर्शनगर गणपती मंदिरासमोर पांगरी रोड, बीड मो.९४०३२६४९३०, E-Mail - jagannathdeshmukh2020@gmail.com

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# अजिंठा येथे वाढला डासांचा प्रादुर्भाव; धुर फवारणीची मागणी!

तभा वृत्तसेवा

अजिंठा दि, ४ ऑगस्ट : अजिंठा परिसरात औषध फवारणीअभावी डासांचा प्रादुर्भाव वाढला असून, विविध साथींचे आजार पसरण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे औषध फवारणी करण्याची मागणी केली जात आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस आहे. पाऊस पडत असल्याने फुकटपूरा, इंदिरानगर , गंगा जमुना परिसर, गावातील अनेक ठिकाणी पाण्याचे डाबके साचत असल्याचे चित्र दिसत आहे. पावसाच्या पाण्याचा योग्य निचरा होत नसल्याने ठिकठिकाणी डाबळे निर्माण झाले आहे.



तसेच काही गटारी तुंबून त्या पाण्यामध्ये डासांची पैदास वाढली आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे.

घंटागाडी घरोघरी दरोज येऊन कचरा सकलन होत असले तरीही बहुतांश जून्या भागात असलेल्या गटरींमधील घाणीचे साम्राज्य पसरले आहेत .याबाबत वारंवार तक्रार करूनही ग्रामपंचायत प्रशासन लक्ष देत नसल्याने पावसाने वाढलेले गवत, तुंबलेल्या गटारी तसेच विखुरलेल्या कचऱ्यामुळे डासांच्या उत्पतीमध्ये वाढ झाली आहे .

### धूर फवारणीबाबत ग्राम पंचायतीचे उदासीन

पावसाळ्याच्या तोंडावर नाल्या, गटारांची स्वच्छता आणि पावसाळ्यात नियमित धूर फवारणी हे नागरी आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असते. सहाजिकच ही जबाबदारी ग्राम पंचायत प्रशासनाची असते. मात्र पावसाळा सुरू होऊ दोन महिने झाले तरी ही ग्राम पंचायत प्रशासनाला धूर फवारणीचा मुहुर्तच सापडेलेला दिसत नाही. ग्राम पंचायतच्या या हलगर्जीपणामुळे अजिंठा गावातील प्रत्येक वॉर्डात डासांचा प्रचंड प्रादुर्भाव झाला आहे. हा आणखी वाढून मलेरिया, व्हायरल फिवरचा प्रकोप वाढण्याची जणू ग्रा. प प्रशासन प्रतीक्षा करीत असल्याचे नागरिकानी संताप व्यक्त केला आहे.

पावसाळ्यात साथीच्या आजारांचे प्रमाण वाढले आहे. थंडी, ताप, सर्दी, घसा दुखणे, असे आजार असलेले रुग्ण खासगी दवाखान्यात उपचार घेत आहेत.

अजिंठा परिसरात पावसाच्या पाण्याचे डबके सर्वत्र सचलेले असून अस्वच्छतेमुळे डासांचा प्रादुर्भाव वाढल्यामुळे साथीच्या आजारांचे रुग्णदेखील वाढत आहेत. त्यामुळे ग्राम पंचायत प्रशासनाने परिसरातील साचलेल्या पाण्याच्या तळीवर तसेच गटारी इतर ठिकाणी त्वरित औषध फवारणी करणे गरजेचे आहे.

डासांचा प्रादुर्भाव दिवसेंदिवस वाढत चालला आहे . गावातील अनेक गल्ल्यात डासांचा उपद्रव वाढला सकाळी संध्याकाळी डास चावत आहे . सध्या घरातदेखील डास त्रासदायक ठरत आहेत. त्यामुळे ग्रामपंचायत प्रशासनाने त्वरित औषध फवारणी करावी. शेख रफीक, शेख सिराज, सलीम खान आदी स्थानिक नागरिकांनी केली आहे .

## प्रतिभावान अभिनेत्री गौरी टोंक सोनी सबवरील 'इत्ती सी खुशी' या आगामी

एक चांगले कथानक, हृदयस्पर्शी प्रोमो आणि मोठमोठ्या कलाकारांच्या उपस्थितीमुळे सोनी सबवरील आगामी मालिका 'इत्ती सी खुशी'च्या आगमनाची प्रतीक्षा करण्यात येत आहे. मालिकेच्या गुणी कलाकारांच्या संचात आता गौरी टोंक या कसलेल्या अभिनेत्रीची भर पडली आहे. उत्तम अभिनय आणि दमदार स्क्रीन प्रेझेन्सबद्दल ओळखली जाणारी गौरी या मालिकेत नंदिनी मेहता ही व्यक्तिरेखा साकारणार आहे. ही एक महत्त्वाची भूमिका आहे, जिचा प्रभाव सुहास (वरुण बडोला) आणि अन्विता (सुम्बुल तौकीर खान) यांच्या जीवनावर पडतो.

### प्रेम, आनंद आणि पडद्यामागील हृदयस्पर्शी नात्

शूटिंग संपल्यानंतर देखील तुमच्या सोबत राहते, ती सेटवर झालेली मैत्री, एकत्र बसून घेतलेला चहा, परस्परांतील आश्वासक शांतता, हास्य –विनोद आणि कठीण काळात दिलेला मूक आधार. या फ्रेंडशिप डेच्या निमित्ताने सोनी सबचे कलाकार अभिषेक वर्मा, आन तिवारी, शीहान कपाही आणि नवीन पंडिता आपल्या पडद्यामागच्या त्या सुंदर नात्यांविषयी सांगत आहेत, ज्याच्यामुळे सेट त्यांच्यासाठी दुसरे घर बनला. 'उफ्फ ये लव है मुश्किल …' मालिकेत शौर्य सिन्हाची भूमिका करत असलेला अभिषेक वर्मा म्हणतो, कुणी तरी तुमच्या पाठीशी आहे, या भावनेमुळे बळ मिळते.

## सुरेश डवले पाटील यांची नियुक्ती



छत्रपती संभाजीनगर – सुरेश डवले पाटील यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन संभाजी सेना या सामाजिक संघटनेमध्ये संस्थापक अध्यक्ष सुधाकर माने यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रदेशअध्यक्ष प्रा. रामेश्वर शिंदे व जिल्हाअध्यक्ष राजू शिंदे पाटील यांच्या हस्ते सुरेश डवले पाटील यांची संभाजी सेना या सामाजिक संघटनेमध्ये जिल्हा उपाध्यक्ष या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. त्याच्या या नियुक्ती बद्दल बाळासाहेब मदन पाटील, शेखर हजारे, शेखर पुरी, विनोद दिवेकर, शिवाजी करवंदे, सचिन डवले, बालाजी हिवाळे, प्रदिप सिरसाठ, बद्री बकाल, अनिल नवतुरे, शेखर पुरी, अशोक थोरात, कुणाल शिंदे, मुसा पठाण, रावसाहेब पांडव आर्दीनी सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन केले आहे.

## धार्मिक स्थळ गुगल वर नोंद करण्यासाठी निशुल्क ऑनलाईन गुगल मॅपिंग

### विहिंप मंदिर अर्चक पुरोहित संपर्क आयामाचा स्तुत्य उपक्रम

छत्रपती संभाजीनगर – भारत हा मंदिरांचा देश आहे जगामध्ये सर्वात अधिक मंदिरे भारतात आहेत परंतु ही सर्वच मंदिरे सेसश्रश वर शोध घेतल्यानंतर सापडत नाहीत कारण मंदिरांनी आत्तापर्यंत त्यांच्या मंदिराचे गुगल मॅपिंग केलेले नाही. ही बाब लक्षात घेऊन विश्व हिंदू परिषदेच्या मंदिर अर्चक पुरोहित संपर्क आयामाने सर्व मंदिरे बौद्ध विहार गुरुद्वारे जैन स्थानके यांचे गुगल मॅपिंग व्हावे या दृष्टिकोनातून १६ ऑगस्ट रोजी रात्री ८ ते ९ या वेळात ऑनलाईन निशुल्क कार्यशाळेचे आयोजन केलेले असून या कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी मंदिरातील अध्यक्ष सचिव यांनी त्यांचे नाव .ज्ञानेश्वर जाधव ९४२२२१२७५३, या भ्रमणध्वनी क्रमांकावर नोंदवावे असे आवाहन मंदिर अर्चक पुरोहित आयामाचे देवगिरी प्रांत संपर्कप्रमुख राजीव जहागिरदार ९४०३०८०७१२ आणि श्री विकास आपटे ९८२०३३६२१८ यांनी केले आहे

## कामगार बांधवांच्या कल्याणासाठी सातत्याने प्रयत्नशील – आ. संजना जाधव

### विनामूल्य गृहपयोगी संच वितरण केंद्राचे आमदारांच्या हस्ते उद्घाटन

तभा वृत्तसेवा

कन्नड : दि.०४ ऑगस्ट – तालुक्यातील कामगार बांधवांच्या कल्याणासाठी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या माध्यमातून विनामूल्य गृहपयोगी संच वितरण केंद्राचे उद्घाटन आमदार संजना जाधव यांच्या हस्ते संपन्न झाले. हा महत्त्वाचा उपक्रम तालुक्यात आणण्यासाठी आमदार जाधव यांनी सातत्याने पाठपुरावा करून शासनस्तरावर ठोस पावले उचलली.

तालुक्यात ६०,००० कामगारांची नोंद असून, त्यापैकी ११,००० कामगारांना आतापर्यंत या योजनेचा लाभ मिळाला आहे. उर्वरित कामगारांना या केंद्रामुळे लाभ घेणे अधिक सुलभ होणार आहे.



उद्घाटन प्रसंगी आमदार संजना जाधव म्हणाल्या, शासनाच्या योजना प्रत्येक पात्र नागरिकांपर्यंत पोहोचवणे हेच आपले ध्येय आहे. कामगार बांधव हे आपल्या अर्थव्यवस्थेचे कणा आहेत, त्यांचे हक्काचे लाभ कोणाच्याही अडथळ्याशिवाय मिळाले पाहिजेत. पुढील काही दिवसांत सर्कलनिहाय कॅम्प आयोजित करून गटविकास अधिकारी आणि ग्रामविस्तार अधिकाऱ्यांच्या माध्यमातून सर्व पात्र कामगारांना या योजनेचा लाभ देण्यात येईल. पात्र कामगारांची नावे नोंदणीमध्ये समाविष्ट करून त्यांना तातडीने संच मिळवून देण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. तालुक्यातील कामगार बांधवांच्या अडचणी दूर करून त्यांना गृहपयोगी साहित्याबरोबरच आरोग्य, शिक्षण व सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ मिळवून देणे ही आपली प्राथमिक जबाबदारी आहे. शासनाच्या प्रत्येक योजनेचा लाभ खेड्यापाड्यापर्यंत पोहोचला तरच खरी विकासक्रांती घडेल.

कार्यक्रमाला शिवसेना महिला तालुकाप्रमुख सोनाली घाटबळे, कृ.उ.बा.स. सभापती डॉ. मनोज राठोड, उपसभापती जयेश बोरसे, खरेदी विक्री संघ सभापती ज्ञानेश्वर निकम, संचालक राजकुमार गंगवाल, बाजार समिती संचालक साईनाथ आल्हाड, बापू सोनवणे, माजी नगरसेवक काकासाहेब कवडे, संतोष पवार,अंधानेर सरपंच अशोक दापके, रुग्ण कल्याण समिती सदस्य राम पवार, कल्याण पवार, रंगनाथ आल्हाड, रामेश्वर घनकर, आकाश बोलधने, प्रविण राठोड, अब्दुल वहाब, निरंजन चव्हाण, अप्पासाहेब जाधव, मिनाबाई निकम, सुनिता मालोदे, प्रताप गुजर, प्रकाश राजपूत, लक्ष्मण साठे, कृउबा सभापती डॉ. सदाशिव पाटील, उपसभापती कांता सोनवणे, अब्दुल जावेद, बन्सीधर निकम, राजू मोकासे, किशोर पवार यांच्यासह मान्यवर व कामगार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश न्यायालय क.स्तर गंगापुर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ५१६/२०२५

अजिजखान सालमखा पठाण व इतर

विरूध्द

निरंक

प्रकरण : वारस प्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज

ज्याअर्थी अर्जदार नं. १ यांचे पती आणि अर्जदार नं. २ ते ७ यांचे पिता नामे पठाण सालमखों मिराखों हे दि. १५/०२/२०२१ रोजी मौजे रांजणगाव शेणपुंजी, ता.गंगापुर जि. औरंगाबाद येथे मृत्यु पावले असुन अर्जदार नं. १. साहजनबी सालमखान पठाण, रा. भोईगल्ली, सोनपेठ, ता. सोनपेठ जि.परभणी २. फरजाना बेगम नयुम खान पठाण, रा. मिस्किन प्लॉट, जिंतुर, परभणी ३. अजिजखान सालमखा पठाण, रा. इनामदार वस्ती, भोईगल्ली, सोनपेठ, ता.सोनपेठ जि. परभणी ४. तामिजखा सालमखा पठाण, रा. रांजणगाव शेणपुंजी, ता. गंगापुर जि. औरंगाबाद ५. शमशाद बेगम नईमपाशा शेख, रा.टेकडी मोहल्ला, सोनपेठ, ता. सोनपेठ जि.परभणी ६. शेख नाजेराबी खदीर, रा.झोपडपटटी, इदगाह नगर, सिरसाळा, बीड ७. शमशोदिन सालम पठाण, रा.भोईगल्ली, सोनपेठ, ता. सोनपेठ जि. परभणी यांनी मयताचे वारस प्रमाणपत्र मिळणे कामी ॲड.श्री.बी.पी.जोशी, गंगापुर यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी अर्जदार नं. १ ते ७ यांना या न्यायालया तर्फे वारस प्रमाणपत्र देणे कामी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप असल्यास जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याचे तारखेपासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात लेखी आक्षेप स्वतः अथवा आपल्या विधीज्ञा मार्फत नोंदवावा. मुदतीचे आत आक्षेप प्राप्त न झाल्यास पुढील कायदेशीर कार्यवाही नियमाप्रमाणे करून अर्जदारांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. सदरचे जाहीर प्रगटन माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी प्रसिध्दीस देण्यात येत आहे.

दि.०४/०८/२०२५

आदेशावरून
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क.स्तर गंगापुर

## नवहाती तांडा येथील राकॉचे उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्यांचा भाजपमध्ये जाहीर प्रवेश



तभा.वृत्तसेवा

जिंतूर,दि.४ ऑगस्ट – नवहाती तांडा ता.जिंतूर येथील राष्ट्रवादी काँग्रेसच्या ग्रामपंचायत चे उपसरपंच काशिनाथ परसराम चव्हाण, ग्राम पंचायत सदस्य बालाजी विठ्ठल चव्हाण, ग्राम पंचायत सदस्य नामदेव कोंडीबा चव्हाण, ग्राम पंचायत सदस्य रामा सोमला चव्हाण, दिलीप रोहिदास पवार, विठ्ठल गोबरा जाधव, अंबादास गोबरा जाधव ह्या प्रमुख कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या भ्रष्ट नेतृत्वाला कंटाळून राष्ट्रवादीला सोडून पालकमंत्री माननीय नामदार मेघनादीदी साकोरे बोर्डीकर ह्यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन काल दिनांक ३ ऑगस्ट २०२५ रोजी जिंतुर येथे मा.आ.आदरणीय रामप्रसादजी बोर्डीकर साहेब ह्यांच्या हस्ते भाजपा मध्ये प्रवेश केला.

यावेळी सोबत नवहाती तांडा येथील मा.सरपंच महीपती हरिभाऊ राठोड, पंडित सखाराम राठोड, दादाराव देवीचंद चव्हाण, रोहिदास पांडुरंग चव्हाण, राजू रामचंद्र राठोड, रामा किसन जाधव, नारायण दादाराव मोरे हे उपस्थित होते.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या खोटारड्या नेतृत्वाला आता त्यांचेच कार्यकर्ते कंटाळले असुन कार्यकर्त्यांचे नाव पुढे करून स्वहितासाठी पक्षबदल करून स्वतःच्या तुंबड्या भरण्यासाठी नामदार मेघना दीदींना जाणूनबुजून टार्गेट करणाऱ्या बालिश बुद्धीच्या नेत्याला आता त्यांच्याच पक्षातील कार्यकर्ते नाकारत आहेत. पालकमंत्र्यांवर विनाकारण खोटेनाटे आरोप करून त्यांची प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न करण्यासाठी आपल्या कार्यकर्त्यांची दिशाभूल करणाऱ्या राष्ट्रवादीच्या भ्रष्टाचारी नेत्याचा खोटेपणा आता उघडा पडला असुन आता त्यांच्यावर तोंड लपवण्याची वेळ आलेली आहे.

त्यांचा हा खोटेपणा त्यांच्याच कार्यकर्त्यांच्या लक्षात आल्यामुळे आता राष्ट्रवादीच्या सुजाण जागृक कार्यकर्त्यांनी राज्यमंत्री मेघना दीदींचे पाण्यावाणी निथळ व सोन्यासारखे बावनकशी नेतृत्व मान्य केले आहे. त्यामुळे विकासाच्या प्रवाहात सामील होण्यासाठी राष्ट्रवादीच्या गढूळ नेतृत्वाला कंटाळून राष्ट्रवादी काँग्रेस चे शेकडो कार्यकर्ते बोर्डीकर साहेबांच्या स्वाभिमानी नेतृत्वावर विश्वास ठेऊन नामदार मेघना दीदी सोबत भारतीय जनता पक्षात प्रवेश करत आहेत.


## बोरीत पालकमंत्री मेघनाताई बोर्डीकर हस्ते घरकुल लाभार्थ्यांना मंजुरी पत्र व प्रथम हप्त्याचे वितरण

तभा.वृत्तसेवा

जिंतूर,दि.४ ऑगस्ट

जिंतूर तालुक्यातील बोरी व परिसरातील प्रधानमंत्री आवास योजनेतील लाभार्थी महिला व नागरिकांना पालकमंत्री माननीय सौ. मेघनाताई साकोरे बोर्डीकर यांच्या हस्ते दिनांक २ ऑगस्ट रोजी घरकुल मंजुरी पत्र व प्रथम हप्त्याचे वितरण करण्यात आले. याशिवाय गृहप्रवेश कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

सदर कार्यक्रमात व्यासपीठावर मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथुर व अतिरिक्त उपमुख्य कार्यकारी



अधिकारी रश्मी खांडरे, तिरुपती अर्बन बँकेचे संचालक सतीश चौधरी, अभिजीत पारवे, सभापती आत्माराम पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमात बोरी ता. जिंतूर येथील महिलांनी घरकुल कामात ग्रामसेवक यांच्याकडून होणारी अडवणूक व विविध अडचणी पालकमंत्र्यांच्या समोर मांडल्या. यानंतर पालकमंत्री सौ मेघनाताई साकोरे बोर्डीकर यांनी संबंधित मुजोर ग्रामसेवकास महिलांचा सन्मान करणे व घरकुल कामे नियमाप्रमाणे व्यवस्थित करण्याच्या सूचना देत चांगलेच खडसावले. या कार्यक्रमास बोरी व परिसरातील घरकुल लाभार्थी महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महिलांचा सन्मान आणि नियमा बाबत पालकमंत्र्यांचा इशारा

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील घरकुल योजना राबवताना लाभार्थी महिलांचा ग्रामसेवक यांनी सन्मान ठेवला पाहिजे आणि सर्व कामे नियमाप्रमाणे व्यवस्थित केली पाहिजेत, असे पालकमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांनी सांगितले. या कार्यक्रमास जिंतूर तालुका गटविकास अधिकारी सुभाष मानकर तसेच नायक तहसीलदार प्रशांत राखी घरकुल चे इंजिनियर जगताप दाभाडे जाधव मोरे ईरफान आदी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश न्यायालय क.स्तर गंगापुर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ५२०/२०२५

रंजना बद्रीनाथ आंबेकर व इतर

विरूध्द

निरंक

प्रकरण : वारस प्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज

ज्याअर्थी मयत कमल भिमराव आव्हाड यांचा दि.२८/०६/२०२५ रोजी मौजे जोगेश्वरी, ता.गंगापुर जि. औरंगाबाद येथे मृत्यु झाला आहे. तसेच मयत कमल भिमराव आव्हाड यांचे पती म्हणजेच अर्जदार नं. १ व २ यांचे वडील नामे भिमराज नंदराम आव्हाड यांचा दि.२८/१२/२००३ रोजी मौजे रामडोह, ता. नेवासा जि.अहमदनगर येथे मृत्यु झाला आहे. अर्जदार नं. १. रंजना बद्रीनाथ आंबेकर, रा. जोगेश्वरी, शिवाजी नगर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद २. नवनाथ भिमराव आव्हाड, रा. जोगेश्वरी, ता.गंगापुर जि. औरंगाबाद यांनी मयताचे वारस प्रमाणपत्र मिळणे कामी ॲड.श्री.बी.पी. जोशी, गंगापुर यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी अर्जदार नं. १ व २ यांना या न्यायालया तर्फे वारस प्रमाणपत्र देणे कामी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप असल्यास जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याचे तारखेपासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात लेखी आक्षेप स्वतः अथवा आपल्या विधीज्ञा मार्फत नोंदवावा. मुदतीचे आत आक्षेप प्राप्त न झाल्यास पुढील कायदेशीर कार्यवाही नियमाप्रमाणे करून अर्जदारांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. सदरचे जाहीर प्रगटन माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी प्रसिध्दीस देण्यात येत आहे.

दि.०२/०८/२०२५

आदेशावरून
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क.स्तर गंगापुर

## आमखेडा ग्रामपंचायत सरपंचपदी भाजपाच्या नंदा आगे बिनविरोध

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.४ ऑगस्ट

आमखेडा ग्रामपंचायतीचे सरपंच गजानन ढगे यांचेवर अतिक्रमण केल्यामुळे छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी त्यांचे पद व सदस्यत्व रद्द केले होते.त्यामुळे सरपंच पद रिक्त झाले होते.

रिक्त झालेल्या सरपंच पदासाठी जिल्हाधिकारी कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांनी नव्याने सरपंच पदाच्या निवडीसाठी ग्रामपंचायत कार्यालय आमखेडा येथे विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते.

यासाठी निवडणूक पिठासिन अधिकारी म्हणून महसूल मंडळ अधिकारी के.एस.डिगोळे व



सहाय्यक अधिकारी म्हणून ग्राम अधिकारी सत्यनारायण पुल्लेवाड यांची नियुक्ती करण्यात आली होती.सरपंच पदासाठी नंदा संजय आगे यांचा एकमेव अर्ज दाखल झाला होता.दुपारी दोन वाजता ग्रामपंचायत कार्यालयात विशेष सभा घेण्यात आली.या सभेत पीठासीन अधिकारी के. एस.डिगोळे यांनी सरपंच पदासाठी नंदा संजय आगे यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने सरपंच पदी बिनविरोध निवडून झाल्याचे घोषित केले.या सभेला ग्रामपंचायत सदस्य पूनम भामरे, सारजाबाई बडक,अनिल ठाकरे,राजेंद्र गव्हाड,बाळू बेदवे हे सदस्य उपस्थित होते.

या सभेला उपसरपंच मंगलाबाई कोलते,अर्जुन बोडखे, देवयानी तेलंगे,दिपाली फुसे हे चार ग्रामपंचायत सदस्य गैरहजर होते.

सरपंच पदी नंदा संजय आगे यांची निवडी ची घोषणा होताच भाजप कार्यकर्त्यांनी जल्लोष केला.

यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य पुष्पाताई काळे यांनी नवनिर्वाचित सरपंच नंदा आगे यांचा सत्कार केला.यावेळी भाजपचे तालुकाध्यक्ष संजय पाटील,जिल्हा सरचिटणीस वसंत बनकर,माजी नगराध्यक्ष कैलास काळे,भाजपा सोयगाव तालुका उपाध्यक्ष योगेश पाटील,माजी पंचायत समिती सदस्य संजीवन सोनावणे,माजी सरपंच राजेंद्र जावळे,तालुका खरेदी विक्री संघाच्या संचालक मंगेश सोहणी,मयूर मनगटे,सुनील गावंडे,संजय चौधरी,संजय आगे,सुनील ठोंबरे,प्रदीप राठोड,राहुल राठोड,संजय तायडे, चिंदु आगे आदींसह भाजप कार्यकर्ते उपस्थित होते.

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर कन्नड (श्रीमती. आर. एस. तापडिया मॅडम) यांच्या कोर्टात.**

किरकोळ अर्ज क्रं. २६२/२०२५

पु. तारीख – ०४.०९.२०२५

अर्जदार : १. मुकूंदा पिता छबु पटाईत, वय ४३ वर्षे, धंदा शेती, रा.चिंचखेडा बु. ता. कन्नड, जि. औरंगाबाद २. ज्ञानेश्वर पिता छबु पटाईत, वय २३ वर्षे, धंदा शेती, रा. चिंचखेडा बु. ता. कन्नड जि. औरंगाबाद ३. श्रीमती. सुमनबाई भ्र. छबु पटाईत, वय ८५ वर्षे, धंदा शेती, रा.चिंचखेडा बु. ता. कन्नड जि. औरंगाबाद ४. सौ. शारदा भ्र. कुमार मंडळ, वय ४५ वर्षे, धंदा घरकाम, रा. विठ्ठल मंदीराजवळ, शिवाजीनगर अंबरनाथ ठाणे ता. जि.ठाणे

विरुध्द

गैरअर्जदार :–निरंक

अर्ज :– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ व ३ प्रमाणे कायेदशीर वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी तमाम जनतेस कळवीण्यात येते की, वरील अर्जदार क्र. १ ते ४ यांनी ॲड. एन. बि. थोरात कन्नड यांच्या मार्फत न्यायालयात अर्ज सादर केला की,

मयत गुना पिता म्हातारजी जाधव हे स्वातंत्र्यापुर्वी मयत झाले असुन त्यांना मुलगा शंकर व पत्नी शेवंताबाई व मुलगी जईबाई अशी वारस आपत्ये होती. मुलगा शंकर याचे लग्न न झाल्यामुळे व त्यास काही एक मुल बाळ न होता तो दि.३०.०१.१९९६ रोजी मौजे चिंचखेडा बु येथे मयत झाला. तसेच मयत गुना याची पत्नी नामे शेवंताबाई सन १९७१ मध्ये मौजे चिंचखेडा बु. येथे मयत झाली. मयत शेवंताबाई हिस कोणीही वारस नाही. मयत गुनाची दुसरी मुलगी नामे जाईबाई चिंचखेडा बु. येथील रामजी पटाईत यांचे सोबत लग्न झाल्यानंतर रामजी चाफा यांच्यापासुन जाईबाई हिस छबु मुलगा झाला. छबु व्यतीरीक्त मयत जईबाई रामजी हिस काही एक आपत्ये झाले नाही. छबु हा दि.३१.१२.२०१६ रोजी मौजे चिंचखेडा बु. ता. कन्नड येथे मयत झाला मयत छबु यास अर्जदार क्रं. १ व २ अशी मुले व अर्जदार क्रं.४ मुलगी व अर्जदार क्रं. ३ विधवा पत्नी सुमनबाई असे वारस आहे. अर्जदार क्रं. १ ते ४ हे चिंचखेडा बु. ता. कन्नड येथील रहीवाशी असुन ते मयत शंकर यांचे वारस आहेत मयत शकर यास अर्जदार १ ते ४ शिवाय इतर कोणीही वारस नाही. शंकर हे मयत झाल्यामुळे त्यांच्या पश्चात अर्जदार नं. १ ते ४ यांना तहसील कार्यालय, तलाठी कार्यालय, ईतर शासकीय निम शासकीय कामे करण्यासाठी वारस प्रमाणपत्र आवश्यकता असल्यामुळे कायदेशीर वारस प्रमाणपत्राची मागणी अर्जामध्ये केली आहे.

त्याअर्थी सदरील अर्जाबाबत कोणाचा काही उजर आक्षेप असल्यास सदरील जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत कोर्टात सादर करावा कोणाचा उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करुन अर्जदार नं. १ ते ४ च्या हक्कात कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

सबब हे जाहीर प्रगटन

दिनांक. १/८/२०२५

आदेशावरुन

क. लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायाधीश क. स्तर कन्नड

## कै.श्री.बाबुरावजी काळे ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्यादित यांची वार्षिक सर्व साधारण सभेचे आयोजन

सोयगाव,दि.४ ऑगस्ट – येथील कै.श्री.बाबुरावजी काळे ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्यादित,सोयगाव यांची २७ वी वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन दि.६ बुधवार रोजी सकाळी ९:०० वाजता व्यंकटेश कॉम्प्लेक्स (छत्रपती शिवाजी महाराज चौक जवळ) संस्थेच्या वरच्या मजल्यावर सोयगाव येथे संस्थेचे चेअरमन दिलीप राजमल बिर्ला यांच्या अध्यक्षतेखालील ठेवण्यात आली आहे.सदर सभे मध्ये मागील सर्व साधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे, सन.२०२४–२५ या वर्षाचे संचालक मंडळाने मंजूर केलेले आर्थिक पत्रके वाचून मंजूर करणे,सन.२०२४–२५ मध्ये अंदाज पत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणे अशा ऐनवेळी येणा–या विषयावर चर्चा करणे बाबत.

## हरकूबाई सारडा यांचे निधन



पैठण दि ०४ :- शहरातील प्रसिद्ध किराणा मालाचे व्यापारी राजेंद्र, संजय, श्रीकांत, संदीप सारडा यांच्या मातोश्री श्रीमती हरकूबाई श्रीकिसन सारडा यांचे वयाच्या ८७ वर्षी आज दिनांक एक ऑगस्ट शुक्रवार रोजी पहाटे दुःखद निधन झाले. त्यांच्यावर येथील नागघाट स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी पंचक्रोशीतील प्रतिष्ठित व्यापारी नागरीक उपस्थित होते.

## शालिवाहन पतसंस्थेचे कार्य दीपस्तंभासारखे : बलराम नवथर

तभा वृत्तसेवा

पैठण दि ०४ :- महाराष्ट्र राज्य कार्यक्षेत्र असलेल्या पैठण येथील शालिवाहन पतसंस्थेच्या आज १३ शाखांचा विस्तार, ३०० कोटीचा एकूण व्यवसाय, सतत १२ टक्के लाभांश व ऑडिट वर्ग अ मिळवत गेल्या २८ वर्षापासून सर्वोत्कृष्ट बँकिंग सोबतच समाजोपयोगी सेवेतही अग्रेसर असलेल्या शालिवाहन पतसंस्थेचे कार्य हे दीपस्तंभा समान असल्याचे गौरोदगार पैठण चे सहाय्यक निबंधक बलराम नवथर यांनी काढले.

शालिवाहन पतसंस्थेच्या २८ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित वृक्षारोपण, रक्तदान शिबीर, गरजू विद्यार्थ्यांना शालेय गणवेश वाटप बलराम नवथर यांचे हस्ते करण्यात आले.

पैठण शाखेच्या २८ व्या वर्धापन दिनानिमित्त दादेगाव (जुने) येथील जि.प. प्राथमिक शाळेच्या प्रांगणात वृक्षारोपण कार्यक्रमांतर्गत भारतीय वंशाची सुमारे २५० झाडे लावण्यात आली. या वेळी आर्ट ऑफ लिव्हिंग व गोवत्स परिवार यांचे संयुक्त विद्यमाने बालाजी विद्यालय नारळा, बालाजी विद्यालय



जायकवाडी दक्षिण, आस्वाद प्राथमिक शाळेतील ६० गरजू विद्यार्थ्यांना सहाय्यक निबंधक बलराम नवथर, संस्थेचे चेअरमन किशोर चौहान यांचे हस्ते शालेय गणवेश वाटप करण्यात आले. या वेळी छत्रपती संभाजीनगर येथील दत्ताजी भाले रक्तपेढी चे संयुक्त विद्यमाने आयोजित रक्तदान शिबिरात ५० रक्तदात्यांनी उत्स्फूर्त रक्तदान केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या मनकी बात कार्यक्रमात शालिवाहन पतसंस्थेच्या सभासद असलेल्या पैठण येथील पैठणी विणकर सौ. कविता अरुण ढवळे यांच्या कार्याचा आवर्जून उल्लेख केला. चेअरमन किशोर चौहान यांनी, हा विषय पैठणकरांसाठी मोठ्या सन्मानाची व अभिमानाची गोष्ट आहे. कविता ढवळे यांनी केलेल्या कामाला आज खर्या अर्थाने परिसस्पर्श लाभल्याचे सांगत शालीवहान पतसंस्थेच्या वतीने ढवळे यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी लक्ष्मण गायके, व्यवस्थापक भारत कोंगे,वरिष्ठ अधिकारी शिवाजी घोडसे, वसूली अधिकारी संदलसे, व्यवस्थापक अझर शेख, सूरज शंकरे, जनसंपर्क अधिकारी नरेश सिकची, श्रीनिवास गोसावी, सुरेश लघाने, परीक्षित गोसावी, अरुणा पिल्लाई, देवीदास पूर्णपात्रे, विश्वास कावसानकर, रविंद्र डहाळे, तृप्ति बचाटे, उज्वला म्हस्के आदींसह समस्त कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## अग्रलेख...

# यांना काय कळणार 'सनातन'?

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला राज्यात सर्वाधिक जागा मिळाल्या. अर्थात महाविकास आघाडीमध्ये हा पक्ष लढल्याने मुस्लिम, दलित आणि उबाठाचे एकनिष्ठ मतदार यांच्यामुळे काँग्रेसला बऱ्यापैकी यश मिळाले. ज्याप्रमाणे उबाठाच्या एकनिष्ठ मतदारांचा फायदा काँग्रेसला झाला तसाच फायदा भारतीय जनता पक्षाच्या एकनिष्ठ मतदारांचा फायदा त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसला झाला. सर्वाधिक नुकसान झाले ते काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे. उबाठाला मिळालेले मानसिक समाधान एवढेच की महाविकास आघाडीत सर्वाधिक २० जागा कशाबशा पदरात पडल्या. महायुतीच्या पदरात राज्यातील मतदारांनी भरभरून मत टाकले. गाड्यासोबत नळ्याचीही जत्रा झाली. महाविकास आघाडीतील मोठ मोठ्या नेत्यांना मतदारांनी घरचा रस्ता दाखविला. आजी-माजी मुख्यमंत्री, सतत सत्तेच्या वर्तुळात राहणारे, वर्षानुवर्षे मंत्रिपदे भोगणारे तर काही नुसते जात आणि धर्माच्या तर काही आई-वडिलांच्या पुण्याईने सत्तेच्या खुर्च्या उबवणारे या सर्वांना जनतेने चांगलाच हिसका दाखविला. २०१४ पासून राज्यातच नव्हे तर देशभरात भारतीय जनता पक्षाला जनतेचे भरभरून प्रेम मिळत आहे. मतदार तोच आहे पण असा काय बदल झाला की काँग्रेससह विरोधकांना पराभवाला सामोरे जावे लागत आहे? कारण एकच आहे आणि ते म्हणजे हिंदू आता जागृत झाला आहे. तो एका झेंड्याखाली एकवटत आहे. एवढी वर्षे जातिपातीत विखुरलेले, प्रादेशिक पक्षांच्या पालख्या वाहणाऱ्या हिंदूंच्या डोक्यात प्रकाश पडतो आहे. सोबतच काँग्रेससह अन्य विरोधी पक्षांच्या नेत्यांच्या मनात आणि डोक्यात सनातन हिंदू धर्माबद्दल किती द्वेष कुटून भरलेला आहे, हेही उघड होत आहे. राहुल गांधी, दिग्विजय सिंह, जयराम रमेश, कपिल सिब्बल, मणिशंकर अय्यर, पी. चिदंबरम् आणि त्यांचं कार्ट कार्ती, सुशीलकुमार शिंदे हे काँग्रेसचे नेते सातत्याने हिंदू धर्मावर टीका करीत आले आहेत. त्यात भर पडली आहे ती महाराष्ट्रातील काँग्रेसचे वरिष्ठ नेते, माजी केंद्रीय मंत्री आणि माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या रूपाने. मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणाचा तपास हिंदू धर्माला बदनाम करण्याचा उद्देश डोळ्यासमोर ठेवून तत्कालीन काँग्रेस-राष्ट्रवादीच्या नेतृत्वातील आघाडी सरकारने केला होता. या घटनेच्या आडून तत्कालीन गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी भगवा दहशतवाद या शब्दाचा प्रथमच वापर केला इस्लामिक दहशतवाद्यांच्या कृत्यावर पांघरूण घालण्यासाठी. हिंदूही कसे दहशतवादी आहेत, हे जगाला पटवून देण्यासाठी काँग्रेसने भगवा दहशतवाद या शब्दांचा घाट घातला होता. पण, काँग्रेसच्या या सर्व बाटग्यांचे मनसुबे २०१४ पासून जनतेने उधळायला प्रारंभ केला आहे. राज्यात जे काही काँग्रेसचे मोजके नेते उरले आहेत त्यात पृथ्वीराज चव्हाणांचे नाव घेतले जाते. एक कठोर शिस्तीचा नेता, ज्याने २०१३ मध्ये तत्कालीन राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांच्या विरोधातही कारवाई करण्यास मागेपुढे पाहिले नव्हते, म्हणून ओळख आहे, पण हा नेताही हिंदुविरोधी असल्याचे उघड झाले. हिंदू आणि हिंदुत्व हे वेगवेगळे आहेत, असा शोध प्रथम काँग्रेसचे युवराज राहुल गांधी यांनी लावला होता. शब्दांच्या याच जाळ्यात उच्चशिक्षित असलेले पृथ्वीराज चव्हाण अडकले. मालेगाव बॉम्बस्फोट खटल्याचा निकाल लागून त्यात सर्व आरोपींची न्यायालयाने निर्दोष सुटका केली. यावर एका वृत्तवाहिनीशी बोलताना पृथ्वीराज चव्हाण सर्व आरोपी निर्दोष झाल्याने भ्रमिष्ट झाल्याचे वाटले आणि यापुढे हिंदू दहशतवाद असे न म्हणता हिंदुत्ववादी किंवा सनातन दहशतवादी म्हणावे, असे दोन पर्यायी शब्द दिले. सनातन, हिंदू आणि हिंदुत्व हे वेगवेगळे असल्याचा उच्चकोटीचा (?) शोध लावत या महाशयांनी स्वहस्ते अकलेचे दिवाळे काढले. म्हणजे ज्या धर्मात जन्म झाला त्या धर्माविषयी एवढी आस्था आणि द्वेष मुख्यमंत्री राहिलेली व्यक्ती बाळगत असेल तर तिचे कार्यकर्ते कसे असतील, हे यावरून लक्षात येते.

खरे तर काँग्रेसच्या राजकारणाचा पायाच हिंदुद्वेष आहे. आतापर्यंत जातिपातीचे राजकारण करीत, दिल्लीची चाकरी करीत सत्ता उपभोगलेल्या या हिंदुद्वेष्ट्यांना सनातन अथवा हिंदू या शब्दांचा अर्थ काय कळणार? सनातन म्हणजे शाश्वत, सनातन म्हणजे अनादी. ज्याचा प्रारंभ नाही आणि अंतही नाही, असा जो तो म्हणजे सनातन. हा शब्द केवळ आणि केवळ पंचमहाभूते आणि हिंदू धर्माबाबत वापरला जातो. सनातन हा हिंदू धर्माचा समानार्थी आहे आणि हा विशाल हिंदू केवळ एक धर्म नाही तर जीवन जगण्याची पद्धत आणि तत्त्वज्ञान आहे. हिंदुत्व म्हणजे कर्तव्य, नैतिकता आणि शाश्वत मूल्ये होय. जगातील प्रत्येक धर्माचे कुळ आणि मूळ सापडते पण सनातन धर्म अनादी आहे. हिंदू धर्माचा आणखी एक महत्त्वाचा भाग आहे तो जीवनशैली, ज्यात काळाच्या ओघात बदल होत असतात. हिंदूंनी काळाच्या सुसंगत बदल आपसूकच स्वीकारले आहेत. निसर्ग आणि काळानुरूप जो स्वत:त बदल करतो, त्याअनुरूप वागतो त्याचे अस्तित्व कधीही पुसले जात नाही. जगात ज्या ज्या धर्माचा उदय झाला तेव्हा सनातन हिंदू धर्म अस्तित्वात होताच. या धर्माने कुण्याही धर्माला रोखले नाही. कोणताही धर्म हा स्वत:सोबत एक संस्कृती घेऊन येत असतो. या संस्कृतीत जीवन जगण्याची पद्धती आणि मूल्ये समाविष्ट असतात. जगात जे धर्म उदयास आले त्या सर्वांनी प्रथम प्रहार हिंदू धर्मावर करण्याचा प्रयत्न केला आणि हे प्रयत्न अजूनही थांबलेले नाहीत.

पृथ्वीराज चव्हाण यांनी एक गोष्ट लक्षात ठेवावी की तुमच्यासारखे किती आले आणि किती गेले तरी या सनातन धर्माचे कुणीही वाकडे करू शकले नाही. वर्षभरापूर्वी तामिळनाडूतील एक मंत्री उदयनिधी स्टॅलिन याने चेन्नईच्या कामराज मैदानात प्रगतिशील लेखक आणि कलाकारांसमोर बोलताना हिंदू धर्माविषयी गरळ ओकली होती. सनातन धर्माला केवळ विरोध केल्याने काही होणार नाही तर हा धर्म नष्ट करायला हवा, असे अक्कलशून्य विधान तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांचा दिवटा पुत्र असलेल्या उदयनिधीने केले. उदयनिधीची री पृथ्वीराज चव्हाण यांनी ओढली आहे. मालेगाव बॉम्बस्फोटातील आरोपींना त्याच भारतीय न्यायव्यवस्थेने न्याय दिला, ज्या न्यायव्यवस्थेने मुंबई उपनगरीय रेल्वे बॉम्बस्फोटातील आरोपींचीही निर्दोष मुक्तता केली. रेल्वे बॉम्बस्फोटातील आरोपींना निर्दोष सोडले तेव्हा पृथ्वीराज चव्हाण मूग गिळून गप्प होते. काँग्रेसच नव्हे, तर सनातन हिंदू धर्माचा द्वेष करणाऱ्यांनी हे पक्के ध्यानात ठेवावे की आपलं ते बाबू अन् दुसऱ्याचं ते कार्ट हे धोरण आता चालणार नाही. हिंदूंना टार्गेट करून राजकारण करण्याचे, सत्ता मिळविण्याचे दिवस कधीचेच संपले आहेत. गेल्या सत्तर-पंचाहत्तर वर्षांत हिंदू धर्मीयांचे जेवढे नुकसान करायचे होते ते काँग्रेसवाल्यांनी केले. घटनेत हिंदुविरोधी कायदे घुसविले, धोरणे आखलीत पण हा आता भूतकाळ झाला आहे. काँग्रेसला जर उरले सुरले अस्तित्व राखायचे असेल तर न्यायाने वागावे. इतर धर्मीयांचा ज्याप्रमाणे सन्मान केला जातो तसाच सन्मान हिंदूंचाही केला पाहिजे. शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड सातत्याने पुरोगामी असल्याचा आव आणत सातत्याने सनातनवर टीका करीत असतात. आव्हाड यांनी तर पृथ्वीराज चव्हाण यांच्यावरही मात केली. आव्हाडालाही सनातन आणि हिंदू धर्म वेगळा वाटतो. जणू हिंदुद्वेषाची कावीळ झाली. बुद्धी भ्रष्ट झाल्यागत सनातन नावाचा कुठलाही धर्म नाही, सनातन धर्मामुळे वर्णव्यवस्था रुजली, मी केवळ हिंदू धर्माला मानतो, अशी निरर्थक आणि हास्यास्पद बडबड आव्हाड यांनी केली. जग कुठे चालले आणि हा भलत्याच रंगात रंगलेला स्वत:ला नेता म्हणविणारा आव्हाड अजूनही अस्तित्वात नसलेल्या वर्णव्यवस्थेतच अकडून पडलेला आहे. पृथ्वीराज चव्हाण असोत की जितेंद्र आव्हाड, सनातन हिंदू धर्म हजारो वर्षांची आक्रमणे अंगावर झेलूनही हिमालयासारखा अडीग उभा आहे. केवळ निवडणुकीत विजय मिळविण्यासाठी आणि मंत्रिपदे राखण्यासाठी लांगूलचालन करणाऱ्या या तथाकथित नेत्यांना काय कळणार सनातन हिंदू धर्म आणि संस्कृती?

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# भारत-रशिया-चीन युती?

अमेरिकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांनी अखेर भारताच्या विरोधात 'टेरिफ' म्हणजे आयात कर नावाचे हत्यार उपसलेच. त्यात रशिया नावाचा 'दंड'ही जोडला. विशेष म्हणजे भारत, रशिया आणि चीन यांच्या युतीची चर्चा केली जात असताना हा घटनाक्रम घडला.

भारत, रशिया, चीन यांची युती सध्या तरी अशक्य वाटत असली तरी या युतीची चर्चा पुन्हा सुरू झाली, ती परराष्ट्रमंत्री डॉ. जयशंकर यांच्या चीन भेटीनंतर. चिनी नेत्यांसोबत झालेल्या त्यांच्या चर्चेनंतर भारताने चिनी नागरिकांना पुन्हा व्हिसा देणे सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. भारत-चीन संबंध सामान्य होण्याची प्रक्रिया याने सुरू होईल असे मानले जाते. यातूनच या नव्या युतीची चर्चा सुरू झाली. भारत, रशिया आणि चीन यांनी एकत्र येण्याची चर्चा नवी नाही. मात्र, या चर्चेला बळ मिळत आहे ते अमेरिकेच्या भारतविरोधी भूमिकेनंतर.

**बलाढ्य व अजिंक्य!** : भारत, रशिया, चीन यांची युती होणे सध्या तरी शक्य वाटत नसले तरी अशी युती झाल्यास ती जगातील सर्वांत बलाढ्य व अजिंक्य युती असेल असे मानले जाते. युरोपियन युनियन वा नाटो या सर्वांना धक्का देण्याची ताकद या युतीत असेल असे मानले जाते.

**एक पंचमाश भूभाग** : जगात एकूण १९५ देश असले तरी भारत, रशिया, चीन या तीनच देशांचा पृथ्वीतलावरील एकूण भूभाग पृथ्वीच्या एकूण भूभागाच्या एक पंचमांश आहे. आणि या तीन देशांची लोकसंख्या ३६ टक्के म्हणजे एकूण जागतिक लोकसंख्येच्या एक तृतीयांश आहे. एवढा प्रचंड भूभाग व मनुष्यबळ असलेले तीन देश एकत्र आले तर अमेरिका व युरोपसाठी ते मोठे आव्हान ठरू शकतात. रशियाजवळ नैसर्गिक संपत्तीचा अमाप साठा आहे, तंत्रज्ञानाच्या बाबतीत चीनने अमेरिकेला केव्हाच मागे टाकले आहे आणि भारत एक झपाट्याने विकसित होणारी अर्थव्यवस्था आहे. भारत, चीन, रशिया यांची एकूण लष्करी ताकद उर्वरित साऱ्या जगापेक्षा जादा असल्याचे मानले जाते.

**भारत-रशिया** : भारत आणि रशिया यांचे संबंध अतिशय विश्वासाचे राहिले आहेत. माजी राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन् रशियात भारताचे राजदूत असताना या संबंधाचा पाया घातला गेला, तो आजही कायम आहे. तत्कालीन सोवियत युनियनचे राष्ट्रपती लिनोनिद ब्रेझनेव्ह व भारताच्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांचे संबंध बहीण-भावाचे होते. ब्रेझनेव्ह-इंदिरा गांधी यांच्यात झालेला २५ वर्षांचा मैत्री करार भारत-रशिया मैत्रीचा कळस मानला जातो. याच आधारावर इंदिरा गांधींनी १९७१ च्या युद्धाचा जुगार खेळला होता. अमेरिका पाकिस्तानच्या बाजूने युद्धात उतरला तर सोवियत युनियन गप बसणार नाही असे ठोस आश्वासन ब्रेझनेव्ह यांनी इंदिरा गांधींना दिले होते. त्यामुळे अमेरिकेच्या धमक्यांनी जराही विचलित न होता इंदिरा गांधी पाकिस्तानचे दोन तुकडे करण्याच्या निर्णयावर ठाम राहिल्या होत्या. काळाच्या कसोटीवर भारत-रशिया मैत्री अबाधित राहिली.

**चीन-रशिया** : चीन-रशिया दोन्ही देश साम्यवादी विचारांचे. पण, त्यांचे आपसात पटत नव्हते. दोन्ही देशांमध्ये एक युद्धही झाले. त्यात रशियाने चीनला मार दिला होता. आता परिस्थिती बदलली आहे. रशिया कमजोर तर चीन बलवान झाला आहे. अमेरिकेच्या विरोधात दोन्ही देशांनी ही युती केली आहे. रशियाची नाकेबंदी करण्यासाठी अमेरिका व युरोपातील देशांनी या देशावर आर्थिक निर्बंध लावले असले तरी रशियाला दिलासा देणारे दोन देश होते भारत व चीन. या दोन देशांच्या सहकार्यामुळेच रशियाला युक्रेनचे युद्ध लढणे शक्य होत आहे अन्यथा रशियाला केव्हाच युद्ध थांबवावे लागले असते. रशिया-चीन यांचे संबंध दिवसेंदिवस घनिष्ठ होत आहेत.

**प्रश्न चीनचा** : भारत-रशिया यांनी एकत्र येण्यास काहीच समस्या नाही तसेच रशिया-चीन यांनी एकत्र येण्यात समस्या नाही. प्रश्न आहे तो चीनचा. तिबेट-लडाख-अरुणाचल प्रदेश हे प्रश्न दोन्ही देशांनी जवळ येण्यात काही महत्त्वाचे अडथळे आहेत. आणि हे अडथळे सहजासहजी पार करता येतील असे नाहीत. भारत-चीन सीमा विवाद फार जुना आहे. त्यावर तोडगा शोधण्याचे अनेक प्रयत्न झाले. त्यात कुणालाही यश मिळाले नाही. भारत-चीन यांच्यात आजवर दोन लष्करी चकमकी झडल्या. १९६२ चे युद्ध व २०२० चा गलवानमधील संघर्ष.

**पाकिस्तानला पाठिंबा** : भारत-चीन जवळ येण्यास सर्वांत मोठी अडचण पाकिस्तानची आहे. नुकत्याच झडलेल्या भारत- पाकिस्तान संघर्षात पाकिस्तानने वापरलेल्या शस्त्रांपैकी ८१ टक्के शस्त्रास्त्रे चिनी बनावटीची होती ही बाब भारताच्या उपलष्करप्रमुखांनी सांगितली आहे. चीन पाकिस्तानला भारताच्या विरोधात वापरत आला आहे. किंबहुना भारताविरोधात शेजारी देशांना उभे करण्याचे एक अघोषित धोरण चीन मागील काही वर्षांपासून राबवित आहे.

**ब्रह्मपुत्रेवर धरण** : चीनच्या भारतविरोधी भूमिकेत पडलेली ताजी भर म्हणजे ब्रह्मपुत्रेवर एक महाप्रचंड धरण बांधण्याचा चीनचा निर्णय. भारत-चीन सीमेपासून केवळ ३० किलोमीटरवर बांधण्यात येत असलेले हे धरण जगातील सर्वांत मोठे धरण राहणार आहे. जवळपास १५ लाख कोटी रुपये खर्चून बांधल्या जाणाऱ्या या धरणाचा भूमिपूजन समारंभ मागील आठवड्यात पार पडला. दहा वर्षांत हे धरण बांधले जाणार आहे. आणि पायाभूत प्रकल्प बांधण्यात चीनचा वेग पाहता तो हे धरण वेळेपूर्वी पूर्ण करील असे मानले जाते. चीनच्या यावलंग टांसगपो नदीवर हे धरण बांधले जात आहे. भारतात प्रवेश केल्यानंतर या नदीचे नामकरण ब्रह्मपुत्रा होते तर भारतातून बांगलादेशात गेल्यानंतर ती जमुना होते.

**तिप्पट मोठे** : चीनच्या हुबई प्रांतातील यांगत्सी नदीवर बांधण्यात आलेले थ्री जार्जेस धरण हे जगातील सर्वांत मोठे धरण आहे. त्या धरणापेक्षा हे धरण तिप्पट मोठे राहणार असल्याचे समजते. या प्रकल्पात पाच जलविद्युत प्रकल्प चीन उभारणार आहे. यासाठी अनेक बोगदे तयार केले जाणार असून त्यातून पाण्याचा प्रवाह वळविला जाणार आहे.

**पूर आणि दुष्काळ** : भारताने यापूर्वीच या प्रकल्पाबाबत आपली चिंता व्यक्त केली आहे. पण, चीन भारताच्या भूमिकेचा विचार करण्यास तयार नाही असे दिसते. ब्रह्मपुत्रेवर हे धरण बांधून चीन केव्हाही भारताच्या अरुणाचल भागात महापूर वा दुष्काळ दोन्ही प्रकारची स्थिती निर्माण करू शकतो. बहुधा यामुळेच या धरणाला 'वॉटर बॉम्ब' म्हटले जाते.

तिबेट परिसराला वीजपुवठा करण्यासाठी याचा वापर केला जाणार असल्याचे चीनने सांगितले आहे. या धरणामुळे या भागातील पर्यावरण धोक्यात येईल असे जागतिक पर्यावरण तज्ज्ञांना वाटत आहे. चीनची भारत विरोधी भूमिका पाहता सध्या तरी रशिया, भारत, चीन अशी युती होण्याची चिन्हे नाहीत.

**अमेरिकेला जोर!** : अमेरिकला याची चांगली कल्पना असल्याने त्याने भारताला आपल्यासोबत ठेवण्याऐवजी भारताच्या विरोधात भूमिका घेण्याचे ठरविले आहे. भारत-चीन यांना एकाच पारड्यात ठेवण्याचे नवे धोरण ट्रम्प यांनी घेतले आहे. वास्तविक राष्ट्रपती ट्रम्प यांनी आपल्या पहिल्या कार्यकाळात भारताशी चांगले संबंध ठेवले होते. पण, दुसऱ्या कार्यकाळात त्यांची भूमिका एकदम बदलली असल्याचे दिसते. रशियाकडून कच्चे तेल आयात केल्याचा परिणाम म्हणून अमेरिका व युरोप यांनी भारताच्या विरोधात आर्थिक निर्बंध लावण्याची भाषा उच्चारली आहे. अमेरिका या टोकाला जाणार नाही अशी आशा केली जात असतानाच, ट्रम्प यांनी भारताने रशियाकडून आयात केलेल्या तेलाबाबत भारतावर 'दंड' लावण्याचा निर्णय घेतला आहे. ट्रम्प भारताच्या विरोधात आणखी काय काय करतात हे येणाऱ्या दिवसांत दिसणार आहे.

## वेध

**सोनाली पवन ठेंगडी**

# नात्यांत व्हावी मैत्री

ऑगस्ट महिन्याचा पहिला रविवार हा जगभरात मैत्री दिन (नव्हे फ्रेंडशिप डे) म्हणून साजरा केला जातो. या दिवशी तरुणाई एकमेकांना फ्रेंडशिप बॅण्ड बांधतात, चॉकलेट देतात, पार्टी करतात. आपापल्या पद्धतीने ते हा दिवस साजरा करतात. आपण यात पाश्चिमात्य पद्धती वगैरे वादात न पडता फक्त मैत्रीचा विचार केला तर एखादा दिवस आपल्या अशा जीवलगांना दिला पाहिजे, हे मनाला नक्कीच पटेल. मुळात, मैत्रीचे नाते असेच असते की जिथे कोणतीही मर्यादा राहत नाही. एकमेकांसाठी धावून येणे, मित्राच्या सुखात आणि दु:खात पहिले हजेरी लावणे, एकमेकांसाठी करताना कोणताही व्यावहारिक विचार न करणे हा सर्व मैत्रीच्या नात्याचा आयाम आहे. त्याला स्थळ, काळाचे बंधन नाही आणि एकमेकांविषयी असूया, ईर्ष्या तर दूरदूरपर्यंत नसते. असे निकोप मैत्रीचे नाते जगण्याचा आधार होते. एवढेच नाही तर आपले जगणेही अधिक सुंदर करते.

मैत्रीच्या नात्याचा विचार करताना एक मुद्दा सहजच मनाला स्पर्श करून गेला की मैत्रीचे नाते असते पण, मग नात्यांमध्ये मैत्री का नसावी? आज नात्यांविषयी नको तितकी उदासीनता आलेली दिसते. अगदी स्पष्ट सांगायचे तर आता नात्यांमध्ये व्यवहार हावी झाला आहे. पैशाच्या तराजूत नाते मोजले जाते. मग जे नातेवाईक सधन, संपन्न आहेत त्यांच्याशी सगळेच गोड वागतात. पण, ज्यांच्याकडे पैसा नसेल किंवा जे प्रतिकूलतेत जगत असतील, ते कितीही जवळचे नातेवाईक असले तरी त्यांच्याविषयी बेपर्वाईचे धोरण असते. त्यांच्याविषयी विचार करण्याची कोणाला गरजही वाटत नाही. ही भावना केवळ जवळच्या नात्यातच नव्हे तर अगदी सख्ख्यांमध्ये सुद्धा शिरली आहे. दोन दिवसांपूर्वी न्यायालयातील एका प्रकरणाची बातमी समोर आली की, एका मुलाने वृद्ध आईला महिन्याकाठी दोन हजार रुपये देण्यास नकार दिला. दुसरा भाऊ तिला सांभाळतो आहे तर मग मी कशाला तिला पैसे देऊ, असा त्याचा युक्तिवाद होता. त्यासाठी तो न्यायालयात पोहोचला होता. त्याला न्यायालयाने चांगलीच चपराक दिली. न्यायाधीश म्हणाले, आईविषयी जो मुलगा असा विचार करत असेल तो माणूस म्हणवून घेण्याच्या लायकीचा नाही. न्यायालयाचा मुद्दा अगदी योग्य आहे. दुसऱ्या एका प्रकरणात तीन मुले असतानाही त्यांनी आईला सांभाळण्यास नकार दिला. शेवटी पोलिसांनी तीन भावांना आईची काळजी घेण्यासाठी चार-चार महिने वाटून दिले. जी आई तीन मुले एकाच वेळी लहानाचे मोठे करते, तिला तीन मुले मिळूनही सांभाळू शकत नाहीत, ही शोकांतिका आहे.



बहीण-भावांचे नातेही असेच कुठेतरी गढूळ झाले आहे. लग्न झालेल्या बहिणीसाठी भावाने काही केले तर ते त्याचे तिच्यावर उपकार ठरतात. भाऊ सधन असेल आणि बहिणीवर प्रतिकूल स्थिती आली तर तो तिच्याकडे पाहतही नाही, तिची वास्तपुस्तही करत नाही. उलट, पूर्वी काहीतरी केलेले उपकार जाणवून देईल, असे वागतो. घरातील भावजयीला नणंदेचे घरात येणेही मान्य नसते. कुठे नणंदेला भावजयी पसंत नसते. जावांच्या बाबतीत तर 'जावा तिथे हेवा' असे म्हटलेच जाते. आज न्यायालयात बहुतांश खटले नात्यांमधलेच आहेत, ही अतिशय भयानक स्थिती आहे. नात्यांमध्ये आलेला हा कोरडेपणा कुठेतरी प्रत्येकाच्या अहंपणामुळेच दिसतो आहे. नात्यांमध्ये प्रेमापेक्षा 'पैसा झाला मोठा' सोबतच 'इगो झाला मोठा' असे म्हणावे लागेल. पण, इतके निराशाजनक चित्रही रेखाटण्यात अर्थ नाही. कारण शेवटी रक्त हे पाण्यापेक्षा घट्टच असतं, म्हणतात ना तेच खरं. आजही अनेक कुटुंबे अशी आहेत जिथे नात्यांनी एकमेकांना सावरले आहे, प्रत्येकाने प्रत्येकाच्या कठीण काळात खंबीरपणे साथ दिली आहे. मग ते भाऊ-भाऊ असो, बहीण-भाऊ असो किंवा मुलगी-जावई, सुना असो... जिथे सासू-सुना, जावा-जावा, नणंद-भावजय, बहीण-भाऊ, भाऊ-भाऊ, मुलगा-वडील यांच्यात मैत्रीचे नाते निर्माण झाले तिथे वादाला फारसा थारा राहणार नाही. वाद हे केवळ मतभेदाच्या मर्यादित राहतील आणि त्यामुळे संवादात विघ्न येणार नाही. नाते सुंदर करायचे तर त्याला मैत्रीचा आयाम द्यायला काय हरकत आहे? जसे आपण मैत्रीत आपल्या मित्र किंवा मैत्रिणीला समजून घेतो तीच भावना नात्यात निर्माण झाली तर आगामी काळात निकोप, सुंदर, देखणी कुटुंबव्यवस्था अस्तित्वात येईल. आता सणांचे दिवस आहेत. या शुभ दिवसांमध्येच याची सुरुवात करायला काय हरकत आहे...शुभस्य शीघ्रम्...!

७७५५९३८८२२

# २५ टक्के शुल्काचे उत्तर : आत्मनिर्भर भारताचे जागतिक गान

## प्रासंगिक

**श्याम जाजू : माजी राष्ट्रीय उपाध्यक्ष (भाजपा)**

भारत हा जगातील तिसरा सर्वात मोठा औषध उत्पादक देश आहे. अमेरिकेच्या बाजारपेठेत जेनेरिक औषधांची मोठी मागणी आहे आणि भारत त्यांचा प्रमुख पुरवठादार आहे. ट्रम्पच्या आयात शुल्कामुळे अमेरिकेत या औषधांची किंमत वाढू शकते, परंतु ही एक संधी देखील आहे. भारताचे नाव ग्लोबल हेल्थ गारंटी म्हणून करण्याची शक्यता आपण निर्माण करू शकतो. भारताच्या लसीकरण राजनैतिकतेमुळे कोविड-१९ काळात भारताला १५०+ देशांमध्ये लस पोहोचवता आल्या आहेत. ह्या मॉडेलचे आता डिजिटल आरोग्य, वैद्यकीय उपकरणे आणि एआय-डायग्नोस्टिक्ससाठी अनुकरण करता येईल.


चीनवरील अवलंबित्व कमी करण्याच्या जागतिक ट्रेंडमध्ये, एक विश्वसनीय उत्पादन केंद्र आपल्याला होण्याची अभूतपूर्व संधी मिळाली आहे. आदरणीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखालील सरकार तंत्रज्ञानाच्या कूटनीतिद्वारे(टेक्नोलॉजी डिप्लोमेसी) इलेक्ट्रॉनिक सुट्ट्या भागांमध्ये पुढे जाण्यासाठी काम करतच आहे. सेमीकंडक्टर मिशन आणि डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा, उ्झख जसे आधार, भीम, कोविन च्या धर्तीवर हार्ड डीपीआय, म्हणजेच भारतात सेमीकंडक्टर , आयओटी सेन्सर्स , इलेक्ट्रॉनिक घटकांचे उत्पादन किंवा भारत एटीएमपी (असेंबली टेस्टिंग मार्किंग आणि पॅकेजिंग) युनिट्ससाठी एक समर्पित झोन बनला पाहिजे.

जगातील सर्वात शक्तिशाली देशाला आता मेड इन इंडिया आयफोन हवे आहेत .ट्रम्पच्या २५% टॅरिफच्या धमकीनंतरही, ॲपलने भारतावर विश्वास व्यक्त केला आणि भारताने ते सिद्ध केले आहे. मार्च ते मे २०२५ दरम्यान भारतातून पाठवलेल्या आयफोनपैकी, ९७% आयफोन अमेरिकेत पोहोचले, ज्याचे मूल्य <२७,००० कोटी होते. फक्त मे महिन्यातच ८,६०० कोटी किमतीचे आयफोन अमेरिकेत पाठवण्यात आले. जानेवारी ते मे या कालावधीत एकूण निर्यात ३७,००० कोटींपेक्षा जास्त झाली,२०२४ पेक्षा खूपच जास्त. जिथे एकेकाळी अमेरिकेतील अर्धे आयफोन भारतात बनवले जात होते, आता जवळजवळ ९७% म्हणजेच सर्व अमेरिकन आयफोन धारक हे भारतातून निर्यातीत हँडसेट वापरणारे आहेत. हा केवळ व्यापार नाही तर तो भारताच्या ताकदीचा, विश्वासाचा आणि तांत्रिक नेतृत्वाचा जाहीरनामा आहे. आज, भारत केवळ निर्मिती करत नाही तर आपल्या धैर्याने, कौशल्याने आणि दृढनिश्चयाच्या बळावर जागतिक तंत्रज्ञानाचे भविष्य घडवत आहे.

**आत्मनिर्भर भारत पासून वैश्विक रक्षा शक्ति पर्यंत**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची रणनीती स्पष्ट आहे की भारत आता जगातील संरक्षण वस्तू व सेवांचा आयातदार नसावा, तर एक मजबूत आणि विश्वासार्ह संरक्षण निर्यातदार म्हणूनही उदयास यावा. ही केवळ एक रणनीती नाही तर भारताच्या जागतिक भूमिकेची पुनर्रचना करण्याचा प्रवास आहे. अलिकडच्या काळात, जेव्हा भारत आणि रशियामधील धोरणात्मक संबंध अधिक दृढ झाले, तेव्हा अमेरिकेकडून भारतावर दबावाचे राजकारण देखील दिसून आले. परंतु भारताने धोरण आणि नाविन्यपूर्णतेने त्याला प्रतिसाद दिला. शस्त्रांवरील अवलंबित्व सोडून स्वतःच्या भूमीवर शक्ती निर्माण करण्याचा मार्ग स्वीकारला. 'मेक इन इंडिया - डिफेन्स एडिशन' अंतर्गत, एक औद्योगिक क्रांती सुरू झाली, ज्याने DRDO, HL, BEL सारख्या सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांना आणि टाटा एरोस्पेस, ङ्ग्ढ डिफेन्स, कल्याणी ग्रुप सारख्या खाजगी कंपन्यांना एका समान दृष्टिकोनातून जोडले.

भारत केवळ ड्रोन, क्षेपणास्त्र प्रणाली आणि इलेक्ट्रॉनिक युद्ध तंत्रज्ञानात स्वयंपूर्ण झाला नाही तर जागतिक बाजारपेठेतही स्पर्धात्मक बनला आहे. हा बदल अचानक आला नाही. आवश्यक नीतिगत बदल, स्पर्धात्मक आणि मार्गदर्शक धोरण, सखोल संशोधन आणि दृढनिश्चयाद्वारे दशकांचे आयात-अवलंबन तोडण्याचा हा परिणाम आहे. २०१३-१४ मध्ये भारताची संरक्षण निर्यात फक्त १,९४० कोटी रुपये होती, तर २०२४-२५ मध्ये ही संख्या २३,६२२ कोटी रुपये झाली आहे, निर्यातीने हे सिद्ध केले आहे की भारत आता इतरांवर अवलंबून नाही, तर इतरांच्या गरजा पूर्ण करणारा देश बनला आहे.



आदरणीय प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजी म्हणतात , भारत आता केवळ आपल्या सीमांचे रक्षण करणार नाही तर जगाला सुरक्षित करण्यात भागीदार बनेल, तेही भारतीय तंत्रज्ञान, परंपरा आणि विश्वासाच्या सहाय्याने. त्यांचे स्वप्न आहे की भारत केवळ त्याच्या लष्करी सामर्थ्यासाठीच नव्हे तर त्याच्या दृढनिश्चय, नाविन्यपूर्णता आणि विश्वासार्ह संरक्षण उत्पादनांसाठी ओळखला जावा. विकसित भारताचे स्वप्न आता फक्त एक कल्पना राहिलेला नाही तर तो एका ठोस कृती आराखड्यामध्ये आणि स्पष्ट यशांमध्ये रूपांतरित झाला आहे. भारत नेक्स्टचे २०२९ पर्यंत ५०,००० कोटी रुपयांची संरक्षण निर्यात करण्याचे उद्दिष्ट आहे. हे केवळ एक आर्थिक आकडा नाही तर नवीन भारताच्या जागतिक विश्वासार्हतेचे, आत्मविश्वासाचे आणि तांत्रिक नेतृत्वाचे प्रतीक आहे. भारत स्वतःसाठी नाही तर संपूर्ण जगासाठी, सुरक्षित, सक्षम आणि स्वावलंबी भविष्यासाठी कोणत्या दिशेने वाटचाल करत आहे याची ही पुष्टी आहे.

टॅरिफ संकट नाही , तर तो रणनीतिक पुनर्रचनेचा काळ आहे. ट्रम्प यांच्या २५% कर धोरणामुळे भारत एका महत्त्वाच्या टप्प्यावर आला आहे. एकीकडे दबाव आहे, तर दुसरीकडे संधीचे दारही उघडते. भारताचा इतिहास साक्षी आहे की प्रत्येक बाह्य दबावाने आपल्याला आतून अधिक मजबूत बनवले आहे. १९९८ च्या अणुनिर्बंधांप्रमाणे, आज ही टॅरिफ धोरण देखील भारतासाठी धोकादायक आहे पण डिजिटल, आर्थिक आणि धोरणात्मक शक्ती म्हणून उदयास येण्याची संधी देत आहे. ग्रामीण भारताचा आत्मा असलेल्या एम एसएमई आणि हस्तकला क्षेत्रावर तात्काळ परिणाम होईल. कोट्यवधी कारागिरांचे जीवन कापड, कार्पेट, चामडे, काच आणि हस्तकला यासारख्या उत्पादनांशी जोडलेले आहे. परंतु या संकटाच्या काळात ब्रँडिंग, मूल्यवर्धन आणि विविधीकरण या मार्गाने भारताला अधिक मजबूत बनवू शकतो. डिजिटल इंडिया हा काळ त्यांच्यासाठी सुवर्णकाळ बनू शकतो. एआय, सायबरसुरक्षा, हेल्थटेक, डेटा ॲनालिटिक्स आणि योग भारत अशा क्षेत्रात ग्लोबल डिजिटल गुरुकुल म्हणून उदयास येऊ शकतो. Skilled Migration Ecosystem द्वारे आपण केवळ ज्ञान निर्यात करू शकत नाही तर जागतिक नेतृत्वाची प्रतिष्ठा पुनर्स्थापित करू शकतो.

भारताला आता एक Post-Tariff Era Strateg अंतर्गत नवीन बाजारपेठा, पर्यायी निर्यात केंद्रे शोधणे आवश्यक आहे. युरोप, आफ्रिका, लॅटिन-अमेरिकेत मेड-इन-इंडिया च्या वस्तू आणि सेवांचा पुरवठा करण्याची हि योग्य संधी असू शकते. स्ट्रॅटेजिक टेक अलायन्स च्या अंतर्गत जपान, फ्रान्स, युएई, इस्त्रायल सारख्या भागीदारांशी नव्याने सखोल संबंध निर्माण करणे गरजेचे वाटते. ही वेळ घाबरण्याची नाही, तर आपला दृष्टिकोन बदलण्याची आहे. आदरणीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारत या टॅरिफ संकटाचे सकारात्मक निराकरण नक्कीच करेल आणि हा बदल केवळ आर्थिक नाही तर तो राष्ट्र उभारणीतील एक क्रांतिकारी अध्याय बनू शकतो.

## आपण मोबाईलवर पाहतो काय?

मोबाईलचे इंटरनेट प्रोग्राम वापरामुळे मानसिक आरोग्य आणि धेय प्रेरणा यावर दिवसेंदिवस प्रभाव पडतो आहे. आज मोबाईल हा केवळ एक संवादाचे साधन न राहता, आपले मनाचे दार बनले आहे. आपण दिवसभरात किती वेळ मोबाईल वापरतो, यापेक्षा आपण त्यावर 'काय' पाहतो हे जास्त महत्त्वाचे झाले आहे.

जर आपण सकारात्मक विचार, प्रेरणादायक कथा, ध्यान, अभ्यास, मन समजून घेणाऱ्या गोष्टी पाहू लागलो, तर हळूहळू मन स्थिर, समंजस आणि उद्दिष्टांकडे वळू लागतं. मनाला जे खाऊ घालाल, तसेच ते बनते. मोबाईलवर काही क्षण हसण्यासाठी जरूर वापरा, पण त्याचे संपूर्ण आयुष्य खाऊ देऊ नका. थोडा वेळ मानसिक पोषणासाठीही ठेवा. मनोरंजनात हरवू नका, अभ्यासात उभे राहा. मोबाईल तुमचे साधन आहे, व्यसन नव्हे.

**मुनीश्वर मलेवार**/९४०५५१३३२४

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# जिल्हा परिषदेच्या हायटेक शाळेत विद्यार्थी संगणकावर गिरवताहेत स्पर्धा परीक्षेचे धडे



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ ऑगस्ट**
शहरातील रिसाला बाजार भागात असलेल्या गणेशवाडी जिल्हा परिषद शाळा लोकसहभागातून हायटेक झाली असून या शाळेत पाचवी ते आठवीचे विद्यार्थी नियमित अभ्यासक्रमासोबतच संगणकावर स्पर्धा परिक्षेचे धडे गिरवित आहेत. जिल्हा परिषदेची ही शाळा कौतुकाचा विषय बनली आहे.

गणेशवाडी जिल्हा परिषद शाळा इयत्ता पहिली ते आठवीपर्यंत आहे. मागील अनेक वर्षापासून ही शाळा येथे आहे परंतु मागील काळात शाळेला अनेक असुविधा असल्यामुळे या शाळेत विद्यार्थ्यांचे प्रवेश होत नव्हते. परंतु यावर्षी केंद्र प्रमुख, मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थी यांनी शाळेचा चेहराच बदलून टाकला आहे. शाळेचा परिसर नयनरम्य करण्यात आला असून मैदानावर पेव्हरब्लॉक बसविण्यात आले आहेत. शाळेच्या परिसरात वृक्षारोपन करून त्यांचे संगोपन केले जात आहे. परिसरात सुमारे ५० पेक्षा अधिक झाडे आहेत. शिक्षकांसोबतच शालेय विद्यार्थी या झाडांचे संगोपन करून त्यांची निगा राखत आहेत.

शाळेचे मुख्याध्यापक, व शिक्षकांच्या मदतीसोबतच पालकांच्या सहभागाने शाळा हायटेक करण्यात आली आहे. मानव विकास मिशन अंतर्गत शाळेला चाळीस टॅब देण्यात आले आहेत. याशिवाय हायटेक संगणक लॅब तयार करण्यात आली आहे. या संगणक लॅबमध्ये प्रत्येक बेंचवर टॅब ठेवण्यात आले आहेत. यामध्ये डेव्हलपमेंट लर्नींग प्रोग्राम हे सॉफ्टवेअर टाकण्यात आले असून त्यातून विद्यार्थी त्यांच्या अभ्यासक्रमासोबतच स्पर्धा परीक्षेचे धडे गिरवीत आहेत. विद्यार्थ्यांना आपसूकच संगणकाचे ज्ञानही मिळत आहे. या शाळेतील इयत्ता तिसरी व चौथीच्या विद्यार्थ्यांना संगणकाचे ज्ञान दिले जात आहे. त्यानंतर पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना संगणकाच्या ज्ञानासोबतच अभ्यासक्रम व इतर माहीतीही दिली जात आहे. त्यासाठी दररोजच्या तासिकेमध्ये संगणकाच्या तासाचा देखील समावेश करण्यात आला आहे.

जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी या शाळेला भेट देऊन केलेल्या पाहणीमध्ये विद्यार्थ्यांचे संगणकीय ज्ञान व अभ्यासातील प्रगती पाहून शाळेचे कौतुक केले आहे. याशिवाय शाळेसाठी आणखी योजनांचा लाभ देण्याचे आश्वासनही त्यांनी दिले आहे. शहरातील जिल्हा परिषदेच्या या शाळेची खाजगी शाळेशी होणारी स्पर्धा कौतुकाचा विषय ठरली आहे.

यासंदर्भात केंद्र प्रमुख कुलदीप मास्ट यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, केंद्रातील सर्व शाळांमधून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न केले जात आहेत. त्यासाठी शिक्षकांचा मोठा सहभाग असून पालकांचेही सहकार्य मिळत आहे. त्यामुळे सुट्टीच्या दिवशीही विद्यार्थ्यांचे जादावर्ग घेतले जात आहेत.

# आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त रेड रन स्पर्धेचे बक्षीस वितरण



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ ऑगस्ट**
जिल्हा शल्य चिकित्सक डॉ नितीन तडस यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष, जिल्हा रुग्णालय हिंगोली यांच्या तर्फे आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त भव्य रेड रन स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस वितरण मान्यवरांच्याहस्ते करण्यात आले.

अकोला बायपास येथून स्पर्धेला सुरुवात होऊन राज्य राखीव दल मैदान येथे स्पर्धेचा समारोप करण्यात आला. यावेळी प्रभारी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ नामदेव पवार, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ दीपक मोरे यांनी हिरवी झेंडी दाखवून स्पर्धेला सुरुवात केली. यावेळी जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनी सहभाग घेतला. मुलींमधून प्रथम क्रमांक राधा हैबत कोकाटे, आदर्श महाविद्यालय हिंगोली, द्वितीय क्रमांक आरती विष्णू भोयर, आदर्श महाविद्यालय हिंगोली, तृतीय क्रमांक सुहानी विलास मोगले, कै. बाबुराव पाटील महाविद्यालय हिंगोली तर उत्तेजनार्थ अनिशा गौतम पाईकराव, आदर्श महाविद्यालय हिंगोली यांनी पटकावला.

तर मुलांमधून प्रथम क्रमांक सतीश वामन चव्हाण, कै. बाबुराव पाटील महाविद्यालय हिंगोली, द्वितीय क्रमांक गंगाधर विठ्ठल गलांडे, कै. बाबुराव पाटील महाविद्यालय हिंगोली, तृतीय क्रमांक मोहम्मद आफाण शेख निसार, शिवाजी महाविद्यालय हिंगोली तर उत्तेजनार्थ रोहन सखाराम रणवीर, शिवाजी महाविद्यालय हिंगोली यांनी पटकावला.

विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते रोख रक्कम व प्रमाणपत्र, मेडल देण्यात आले. यावेळी जिल्हा कार्यक्रम अधिकारी डी एस चौधरी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार व्यक्त केले. यावेळी डॉ प्रकाश कोठुळे, प्रा. डॉ सचिन हटकर, प्रा. डॉ महेश मंगनाळे, प्रा डॉ संभाजी पाटील, प्रा माणिक ढोकळे, प्रा आनंद पठाडे, पोलिस प्रशिक्षण अॅकेडमीचे राजू हनवते, पोलिस कर्मचारी व ट्रॅफिक पोलिस व स्पर्धक आदी उपस्थित होते.

स्पर्धेतील विजेत्या प्रथम व द्वितीय स्पर्धकांना १२ ऑगस्ट रोजी मुंबई येथे होणाऱ्या राज्यस्तरीय रेड रन स्पर्धेसाठी सहभागी होणार आहेत. स्पर्धेच्या यशस्वितेसाठी संजय पवार, श्रीमती टीना कुंदणानी, आशिष पाटील, नितीन राठोड, महानंदा साबळे, रेखा बलखंडे, लक्ष्मी वाठोरे, सुनीता गायकवाड, बालाजी चापाकानडे, नम्रता भगत, म्ब्युलन्स स्टाफ व सर्व एमएसएसीएस स्टाफने परिश्रम घेतले.

# शिवसेना आ. संतोष बांगर यांच्या कावड यात्रेला तुफान गर्दी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ ऑगस्ट**
कळमनुरी येथील चिंचाळेश्वर महादेव मंदिर येथे आ. संतोष बांगर यांच्याहस्ते सोमवारी दि ४ ऑगस्ट रोजी महापूजा झाल्यानंतर कावड यात्रा हिंगोलीकडे निघाली. या कावड यात्रेत हजारो भाविक सहभागी झाले होते. भाविकांच्या सोयीसाठी जागोजागी चहापाणी, नाश्ताची व्यवस्था करण्यात आली होती.

श्रावण महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी आ. संतोष बांगर यांच्यावतीने कळमनुरी येथील चिंचाळेश्वर महादेव मंदिर ते हिंगोली येथील कयाधू अमृतधारा महादेव मंदिरापर्यंत १८ किमीची पायी कावड यात्रा काढण्यात आली होती. दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी कावडयात्रेची जय्यत तयारी मागील काही दिवसांपासून शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी केली होती. कळमनुरी आणि हिंगोली शहरातील सर्व रस्त्यांवर, शासकीय कार्यालयासमोर, चौकाचौकात मोठमोठे होर्डींग्ज लावण्यात आले होते. तसेच सोशल मिडीयावर या कावड यात्रेस उपस्थित राहण्यासाठी मोठा प्रचार करण्यात आला होता. हिंगोली जिल्ह्यासह बाहेर जिल्ह्यातील भाविक सकाळपासूनच कळमनुरी येथील कावड यात्रेत सहभागी होण्यासाठी दाखल झाले होते.

आ. संतोष बांगर यांच्याहस्ते चिंचाळेश्वर महादेव मंदिरात महापूजा केल्यानंतर कावड यात्रेला सुरूवात झाली. यावेळी आ. राजेश नवघरे, अॅड मनीष साकळे, माजी सभापती श्रीराम बांगर, युवासेना जिल्हाप्रमुख राम कदम, गुड्डु बांगर, संजय बोंढारे, राजेंद्र शिखरे, संतोष वेरूळकर यांच्यासह हजारो भाविक, कार्यकर्ते उपस्थित होते. हर हर महादेव, बम बम भोलेच्या गजरात ही कावड यात्रा हिंगोलीकडे निघाली. यावेळी कळमनुरी ते हिंगोली महामार्गावरील वाहतूक व्यवस्था ठप्प पडली. पोलिस प्रशासनाने वाहतुक व्यवस्थेमध्ये बदल केला. यात्रेतील भाविकांना त्रास होऊ नये म्हणुन सिमेंट रस्त्यावर पाणी टाकण्यात आले होते. अनेक ठिकाणी भाविकांना पिण्याचे पाणी, नाश्ता, चहाची व्यवस्था करण्यात आली होती. दुपारी साडेचारपर्यंत ही कावडयात्रा हिंगोली शहरात पोहोचल्यानंतर ठिकठिकाणी कावडयात्रेचे स्वागत करण्यात आले. येथील महात्मा गांधी चौकात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे कावड यात्रेत सहभागी झाल्यानंतर पदाधिकारी व कार्यकर्त्यांना संबोधीत करणार आहेत.



**हिंगोली- शिवसेना आ. संतोष बांगर यांच्यावतीने कळमनुरी येथील चिंचाळेश्वर महादेव मंदिर ते हिंगोली येथील कयाधू अमृतधारा महादेव मंदिरापर्यंत सोमवारी कावड यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या कावउ यात्रेमध्ये हजारो भाविकांसह शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### बीएसएनएल टॉवर कार्यान्वित करण्याची मागणी

शिरड शहापूर- शिरड शहापूर सर्कलमधील शिरड शहापूर व उमरा येथील बी.एस.एन.एल.चे टॉवर कार्यान्वित करा अन्यथा वंचित बहुजन आघाडी तर्फे लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. अनेकवेळा अर्ज करूनही संबंधित कार्यालय याकडे दुर्लक्ष करीत आहे. शिरड शहापूर व उमरा येथील बीएसएनएल टॉवरच्या कार्यक्षेत्रातील ग्राहकांचे सिम कार्ड मागील वर्षापासून सेवे अभावी बंद पडले आहेत. ग्राहकांना या गोष्टीचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. औंढा तालुक्यात बऱ्याच ठिकाणी जसे जवळाबाजार औंढा नागनाथ या ठिकाणी बीएसएनएलची सेवा सुरू आहे, त्याच धर्तीवर शिरडशहापूर उमरा बीएसएनएलची सेवा सुरू करून द्यावी अन्यथा वंचित बहुजन आघाडीतर्फे लोकशाही मार्गाने तुमच्या कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येईल असे निवेदनाद्वारे वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा अध्यक्ष अनिल कांबळे यांनी कनिष्ठ अभियंता वसमत यांना देण्यात आले आहे.

### अकरावी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार



कळमनुरी- महात्मा ज्योतिबा फुले कनिष्ठ महाविद्यालय कळमनुरी येथे अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांचे नियमित वर्गांची सुरुवात करण्यात आली. कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य तानाजी जगताप यांच्या हस्ते अकरावीच्या विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे सत्कार करण्यात आले तसेच प्राचार्य तानाजी जगताप यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सर्व विद्यार्थ्यांनी आपले ऑनलाइन प्रवेश निश्चित करण्यासाठी महाविद्यालयाशी संपर्क साधावा याप्रसंगी कनिष्ठ महाविद्यालयाचे परीक्षक सोलेकर, साहू, श्रीमती देशमुख, श्रीमती माद्रप, गुंडाळे, मोगले, पवार, काकडे आदींची उपस्थिती होती.



हिंगोली- येथील राष्ट्रमाता जिजाऊ विद्यानिकेतन शाळेत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक जयंती साजरी करण्यात आली. यावेळी मुख्याध्यापक बल्लाळ, कान्हेड यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# दुसऱ्या श्रावण सोमवारी औंढ्यात नागनाथाच्या दर्शनासाठी हजारो भाविकांची गर्दी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली ४ ऑगस्ट**
बारापैकी आठवे ज्योतिर्लिंग असलेल्या प्रभू नागनाथांच्या दर्शनासाठी श्रावणातल्या दुसऱ्या सोमवारी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. रविवारी मध्यरात्रीपासूनच भाविक येथे दाखल होऊ लागले होते.

पोलीस निरीक्षक गणपतराव राहिरे, देवस्थानचे व्यवस्थापक सुरेंद्र डफळ, माधव सूर्यवंशी यांनी प्रभू नागनाथाची सपत्नीक महापूजा केली. दुग्धाभिषेक केला. मध्यरात्रीनंतर दोनला मंदिर भाविकांना दर्शनासाठी खुले झाले. मराठवाड्यासह विदर्भ व राज्याच्या अन्य भाविकांनी दर्शन घेतले. अनेक भाविक अनवाणी मंदिरात दाखल झाले होते.दिंड्या, कावड यात्राही आल्या होत्या. 'हरहर महादेव', 'बम बम भोले', 'नागनाथ महाराज की जय'च्या जयघोषाने मंदिर परिसर दिवसभर दुमदुमून गेला. देवस्थानचे अधीक्षक वैजनाथ पवार, व्यवस्थापक सुरेंद्र डफळ, कृष्णा पाटील, प्रदीप जोशी, रवी देशपांडे, नागेश माने, रामप्रसाद उदगिरे, गणेश उदगिरे, मंदिर गार्डप्रमुख बबन सोनुने ,मुकेश पडोळे, जगदेव दिंडे गणेश जगताप आदी दिवसभर मंदिरामध्ये होते. पोलीस निरीक्षक जी एस राहिरे, सपोनी कैलास भगत, पोलीस उपनिरीक्षक श्रीधर वाघमारे, दत्ता कानगुले, अफसर पठाण, शेख खूदुस, जमादार संदीप टाक सुभाष जयताडे रविकांत हरकाळ वाशिम पठाण माधव सूर्यवंशी गजानन गिरी अमोल चव्हाण यांच्यासह पोलीस कर्मचारी व होमगार्ड यांनी बंदोबस्त ठेवला होता. तसेच मंदिरात भाविक भक्तांना साबुदाणा खिचडी चहा पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

# शिक्षणाधिकारी दिग्रसकर यांनी घेतले नागनाथाचे दर्शन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ ऑगस्ट**
श्रावणातील दुसऱ्या सोमवारी हिंगोली जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाधिकारी प्रशांत डिग्रसकर यांनी आठवे ज्योतिर्लिंग प्रभू नागनाथास दुग्धभिषेक करून महापूजा केली.

आठवे ज्योर्तिलिंग औंढा नागनाथ येथील नागनाथाच्या दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविक येत आहेत. यावेळी नागनाथ संस्थान व नागेश्वर विद्यालयाच्यावतीने नागनाथ मंदिराची प्रतिमा देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी देवस्थानचे अधीक्षक वैजनाथ पवार, व्यवस्थापक सुरेंद्र डफळ, एस सदावर्ते, उद्धव नागरे, ज्ञानेश्वर लांडे जयकुमार इंगोले, अंबादास वाहेळ, सचिन जाधव, गजानन कुटे, मुकेश पडोळे, जगदीश दिंडे नागेश माने आदी उपस्थित होते.

# बन, बरडा, पिंपरी भागातील शेतकऱ्यांच्या नुकसानीचे प्रशासनाकडून पंचनामे



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ ऑगस्ट**
सेनगाव तालुक्यातील बन, बरडा, पिंपरी या भागातील शेतकऱ्याच्या शेतीचे मोठे नुकसान झाले असून सतत होत असलेल्या पावसामुळे या भागामध्ये ढगफुटीचे दृश्य झाल्याने घटनास्थळी भाजपा प्रदेश कार्यकारणी विशेष निमंत्रित सदस्य शिवाजीराव मुटकुळे यांनी भेट देऊन शेतीची पाहणी केली होती त्यानंतर उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांना तात्काळ पंचनामे करण्यास सांगितले. दि. ३१ जुलै रोजी शासनाच्या कर्मचाऱ्यांकडून थेट शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन शेतकऱ्याच्या झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्यात आले असून यावेळी तहसीलदार सखाराम मांडवगडे, मंडळ अधिकारी डुकरे, तलाठी यांच्यासोबत शासकीय कर्मचारी त्याचबरोबर भारतीय जनता पार्टी प्रदेश कुलकर्णी, निमंत्रित सदस्य शिवाजीराव मुटकुळे, भानुदास पवार, हिम्मत राठोड, विजय डोखळे, भागवत मुंढे, विजय धाकतोडे, पद्माकर नाईक, दिगंबर शिंदे नारायणराव कोटकर, लक्ष्मण थोरात अनिल नागरे, अंकित वाघ, दामोदर गडदे यांच्यासह भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी शासनाच्याकर्मचाऱ्यांना शेतकऱ्याच्या बांधावर नेऊन पिंपरी, बन, वझर, बरडा या भागात झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्यात आले.

# ओमप्रकाश देवडा विकास बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ ऑगस्ट**
ओमप्रकाश देवडा पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि. हिंगोलीची ४३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवारी हिंगोली येथील बँकेचे नविन मुख्यालय ओमभवन, तिरुपती नगर येथे बँकेचे अध्यक्ष प्रकाशचंद सोनी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.



यावेळीबँकेचे उपाध्यक्ष सुनिल देवडा, बँकेचे संचालक विठ्ठलदास मुंदडा, जुगलकिशोर धन्नावत, नरेंद्र मोदी, नरेंद्र अग्रवाल, प्रकाश गोयल, बजरंगलाल अग्रवाल, सुभद्रादेवी मंत्री, ज्ञानेश्वर मामडे, शशिकांत दोडल, राजेंद्र निमोदीया, गजाननराव देशमुख, आशिष काबरा, विजय अग्रवाल, राजेश अग्रवाल, राजु मुदिराज, अजित बज, संजय देवडा, बँकेचे तज्ञ संचालक अध्यक्ष एम.एम. बुद्रक, सदस्य बालाजी सोनवणे, कमलकिशोर बगडीया, नवनित राठोर, सर्व शाखांचे शाखा सल्लागार समितीचे अध्यक्ष व सदस्य, बँकेचे सभासद, ग्राहक, ठेवीदार, कर्मचारी बंधु व बँकेचे व्यवस्थापकीय संचालकसुधीरजालनापुरे,सरव्यवस्थापक शशिकांत कंदी, सरव्यवस्थापक सौ. समता अग्रवाल, उपसरव्यवस्थापक सुधिर मुळे, सहाय्यक सरव्यवस्थापक ज्ञानदेव घुगे, श्रीराम माळोदे, संजय घोडेकर, संजय गवडे व सर्व कर्मचारी वृंद उपस्थित होते. बँकेचे सरव्यवस्थापक शशिकांत कंदी यांनी अहवाल वाचन केले. १०५.०० कोटी व बँकेचा निव्वळ नफा रु. ३.४६ कोटी झाला आहे.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## उपोषण आंदोलनाच्या तयारीसाठी सकल मराठा समाज सज्ज

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३ ऑगस्ट -** संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी २९ ऑगस्ट रोजी मुंबई येथे उपोषण आंदोलन करणार असल्याचे जाहीर केले आहे. त्या पार्श्वभूमीवर सकल मराठा समाज बांधवांना चलो मुंबई ची हाक दिली आहे. याबाबत लातूर जिल्हा सकल मराठा समाज बांधवांच्यावतीने लातूर येथील रुक्मिणी मंगल कार्यालय येथे रविवारी व्यापक नियोजन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सदरील बैठकीस लातूर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील मराठा सेवक मोठ्या संख्येने उपस्थित राहिले.

यावेळी झालेल्या बैठकीतून मुंबई येथे होणाऱ्या उपोषण आंदोलनाच्या तयारीसाठी लातूर जिल्ह्यातील सकल मराठा समाज सज्ज झाला असून प्रत्येक तालुकावाईज बैठका घेऊन समाजाच्या मागण्याबाबत जनजागृतीचे काम प्रगतीपथावर सुरू करण्याचा संकल्पही एकमताने करण्यात आला.

मराठा आरक्षण लढाई आता अंतिम टप्प्यात आली असून मराठा आरक्षण मिळण्यासाठी संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील मुंबई येथे २९ ऑगस्ट पासून उपोषण आंदोलन करणार आहेत. या आंदोलनात महाराष्ट्रासह विविध राज्यातील मराठा समाज बांधव लाखोंच्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. याबाबत राज्यभरात प्रत्येक जिल्ह्यात, तालुक्यात नियोजनात्मक व्यापक बैठकांचे आयोजन करण्यात आले आहे.

त्याचाच एक भाग म्हणून रुक्मिणी मंगल कार्यालय येथे लातूर जिल्ह्यातील मराठा सेवकांची बैठक सकल मराठा समाजाच्यावतीने आयोजित करण्यात आली होती. सदरील बैठकीत प्रत्येक तालुक्यात बैठका घेणे, आंदोलनाबाबत व्यापक जनजागृती करणे, प्रवासाचे नियोजन करणे बाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.




### संक्षिप्त वृत्त...

## लातूर फार्मसीत साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ ऑगस्ट -** मराठी साहित्याच्या अथांग सागरामध्ये अस्सल लोकभाषा शैलीचे स्वतंत्र भांडार तयार करून मराठमोळ्या साहित्याची निर्मिती ही अण्णाभाऊ साठे यांची महान कामगिरी आहे पृथ्वी ही शेषनागाच्या मस्तकावर तरली नसून



कष्टकऱ्यांच्या व श्रमिकांच्या तळहातावर तरली आहे असे सांगणारे संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील बुलंद आवाज साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त श्री वेताळेश्वर शिक्षण संस्था संचलित लातूर कॉलेज ऑफ फार्मसी लातूर , महाविद्यालयांमध्ये महापुरुषाच्या प्रतिमेला संस्थेचे अध्यक्ष भीमाशंकर बावगे,सचिव वेताळेश्वर बावगे,संचालक नंदकिशोर बावगे, प्राचार्य डॉ. श्रीनिवास बुमरेला,प्राचार्य डॉ.वीरेंद्र मेश्राम, प्राचार्या योगिता बावगे,प्राचार्या रूपाली गिरी यांच्या शुभहस्ते प्रतिमेचे पूजन व पुष्पमाला अर्पण करून विनम्र अभिनंदन करण्यात आले. तसेच या कार्यक्रमाला प्रा. सोमवंशी भागवत,प्रा.अतुल कदम प्रा.शुभम वैरागकर ,प्रा.माधुरी पोलकर, प्रा सुप्रिया जाधव, प्रा शबनम शेख, स्नेहजा भालेराव, ग्रंथपाल ज्ञानेश्वर कांबळे ,मनदीप सवई आदी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## जिल्ह्याअंतर्गत बदली टप्पा चार लवकरच सुरू होणार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ ऑगस्ट -** बदली प्रक्रियेतील अतिशय सर्वात महत्त्वाचा आणि नव्वद टक्के ज्या टप्प्यात बदल्या होतात, तो म्हणजे संवर्ग चार बदली टप्पा लवकरच सुरू होणार आहे. रविवारी संवर्ग तीन म्हणजेच बदली अधिकार प्राप्त शिक्षकांच्या बदली झालेल्या याद्या प्रसिद्ध होणार आहेत.

सोमवारी बदली पात्र म्हणजेच संवर्ग चारसाठी रिक्त पदांची यादी घोषित होणार असून, ५ ते ८ ऑगस्टपर्यंत बदलीस प्राधान्यक्रम भरण्याची संधी दिली जाणार आहे. बदलीपात्र शिक्षकांनी अभ्यास करूनच गावांची नावे नोंदवावीत. सेवाज्येष्ठ शिक्षकांनी भरलेला पसंतीक्रम पाहून आणि आपली अपेक्षित सेवाज्येष्ठता बघून अपेक्षित गावे भरणे यात आपले कौशल्य अवलंबून आहे. गावे भरण्यासाठी शिक्षकांनी स्वतः अभ्यास करून निर्णय घ्यावा. गावांची यादी व सेवाज्येष्ठ शिक्षकांची यादी तयार करून कोण कुठे घेऊ शकतो, याचा अंदाज लावा. त्यानंतरच प्राधान्यक्रम भरावा. प्राधान्यक्रम भरण्याच्या अगोदर आपल्याजवळ त्याची यादी यूडायस कोडसह तयार ठेवावी. यातून निश्चित अपेक्षित शाळा मिळेल.

## 'गोदावरी इन्स्टिट्युट 'च्या ३८ विद्यार्थ्यांची फार्मा कंपनीत निवड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ ऑगस्ट -** तालुक्यातील कोळपा येथील गोदावरी इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी मध्ये डी. फार्मसी, बी. फार्मसी, एम. फार्मसी च्या अंतिम वर्षातील व उत्तीर्ण विद्यार्थ्यांकरिता एजिओ फार्मासुटिकल्स लिमिटेड पुणे, मार्कसन फार्मासुटिकल्स प्रायव्हेट लिमिटेड गोवा आणि तुलीप्स लॅब प्रायव्हेट लिमिटेड पुणे व ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेल यांच्या वतीने कॅम्पस मुलाखती घेण्यात आल्या.

सदरील कॅम्पस प्लेसमेंटसाठी गोपाळ आवळे, विश्वनाथ पाटोळे आणि माधव साखरे, मॅनेजर राहुल आरे आणि एलीऑस मॅनेजमेंट कन्सल्टिंग प्रायव्हेट लिमिटेड चे संतोष स्वामी, संस्थेचे सचिव रमेशअप्पा केवळराम, संस्था अध्यक्ष रामेश्वर केवळराम, सहसचिव राहुल केवळराम, एमसीए विभागाच्या प्राचार्या प्रतीक्षा केवळराम, प्राचार्य डॉ. राहुल एस. सोळुंके उपस्थित होते. कॅम्पस ड्राईव्हमध्ये १६३ पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ११४ विद्यार्थी मुलाखतीस उपस्थित होते. त्यातून प्रत्यक्ष मुलाखतीमधून ३८ विद्यार्थ्यांची एजिओ फार्मासुटिकल्स लिमिटेड पुणे (१८), मार्कसन फार्मासुटिकल्स प्रायव्हेट लिमिटेड गोवा (१०) आणि तुलीप्स लॅब प्रायव्हेट लिमिटेड पुणे (१०) या कंपनी मध्ये क्वालिटी अशुरन्स आणि मशीन ऑपरेटर या पदासाठी निवड करण्यात आली.

## आ. कराड यांचा रेणापूर येथे तिसरा जनता दरबार होणार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ ऑगस्ट -** लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत येत्या ५ ऑगस्ट २०२५ मंगळवार रोजी रेणापूर येथील रेणुकाई मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आला असून आ. कराड यांचा हा तिसरा जनता दरबार आहे.

गोरगरीब सर्वसामान्य आणि तळागाळातील माणसाचे प्रश्न, अडीअडचणी आणि व्यथा समजून घेण्यासाठी त्यांच्याशी संवाद साधण्यासाठी लातूर ग्रामीण मतदार संघात दर तीन महिन्याला लातूर तालुक्यात दोन, रेणापूर तालुक्यात एक आणि भादा सर्कल मध्ये एक याप्रमाणे चार ठिकाणी जनता दरबार घेण्यात येणार असल्याचे आ. रमेशआप्पा कराड यांनी घोषित केले होते. त्यानुसार लातूर तालुक्यातील मुरुड आणि ममदापूर येथे नुकताच जनता दरबार घेण्यात आला. या दोन्ही ठिकाणी सर्व स्तरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. बऱ्याच जणांचे प्रश्न जागेवरच निकाली निघाले तर अनेक प्रश्नांना सोडविण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देऊन महिनाभरात निकाली काढण्याचे बोलून दाखवले. येत्या ५ ऑगस्ट २०२५ मंगळवार रोजी रेणापूर तालुक्यातील रेणापुर शहरासह खरोळा, पानगाव, कामखेडा आणि पोहेगाव जिल्हा परिषद सर्कल मधील जनतेचा रेणापूर येथील रेणुकाई मंगल कार्यालयात सकाळी १० वाजता हा जनता दरबार होणार आहे.

## दरोड्याच्या तयारीत असलेली बीडच्या सराईतांची टोळी जेरबंद

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ ऑगस्ट -** दरोड्याच्या तयारीत असलेल्या बीड जिल्ह्यातील पाचजणांच्या सराईत गुन्हेगारांना नागरिकांच्या सतर्कतेमुळे औसा व भादा पोलिसांनी रविवारी पहाटेच्या सुमारास घातक शस्त्रासह जेरबंद केली आहे. सदर आरोपी रेकार्डवरील सराईत गुन्हेगार असून, त्यांच्यावर लातूर जिल्ह्यासह शेजारील जिल्हे व राज्यात अनेक गुन्हे दाखल असल्याचे उघडकीस आले आहे.

लातूर जिल्ह्यातील औसा, किल्लारी, भादा, रेणापूर, चाकूर व अहमदपूर पोलीस ठाण्यांच्या हद्दीमध्ये गेल्या काही दिवसांपासून घरफोडी तसेच दुकानांचे शटर तोडून चोरीच्या घटना घडत आहेत. पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी स्थानिक गुन्हे शाखा तसेच जिल्ह्यातील सर्व पोलीस अधिकाऱ्यांची बैठक घेवून रात्रीच्या वेळी सतर्क राहून पेट्रोलिंग व नाकाबंदी करून रात्रग्रस्तमध्ये स्थानिक नागरिकांना सामावून घेण्याच्या सूचना दिल्या होत्या. दरम्यान, औसा तालुक्यातील शिवली मोड व सिंदाळा येथे एक चारचाकी मालवाहू वाहन संशयितरित्या औसा-तूळजापूर रोडवर फिरत आहे, अशी माहिती मिळाल्याने औसा व भादा ठाण्याच्या रात्रग्रस्तवरील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदारांनी सदरचे संशयित वाहन नागरिकांच्या मदतीने शिवली मोड परिसरातून ताब्यात घेतले. यावेळी अंधाराचा फायदा घेवून तीन आरोपी पळून गेले. तर रिहान मुस्तफा शेख, अन्वरखॉ जलालखॉ पठाण (दोघेही रा. गौतमनगर, परळी, जि. बीड), हाफिज मुमताजोद्दीन शेख (रा. आझादनगर, परळी, जि.बीड), सादेक मोहम्म्द यासिन मोहम्मद (रा. जुना बाजार, बीड) आणि फारुख नबी शेख (रा. बार्शी नाका, बीड) यांना अटक केली.

आरोपींच्या ताब्यातील चारचाकी मालवाहू अशोक लिलँड टेम्पोची (एमएच ४४ यू ३२९८) झडती घेतली असता, त्यामध्ये दरोड्यासाठी लागणारा एक लोखंडी कोयता, एक धारदार चाकू, दोन लाकडी दांडके, एक लोखंडी पहार, दोन लोखंडी कटावणी, तीन बनावट रेडीयमचे वाहनांचे नंबर प्लेट, एक



टेम्पो व चार मोबाइल आदी एकूण ७ लाख ७१ हजार २५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. वरिष्ठांच्या मार्गदर्शनात औसा ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुनील रेजितवाड, भादा ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक महावीर जाधव, पोलीस उपनिरीक्षक भाऊसाहेब माळवदकर, पोलीस अंमलदार रामकिशन गुट्टे, हनमंत पडिले, जमादार मौला बेग, दत्तात्रय तुमकुटे, फड, योगेश भंडे, सचिन गुंड, भागवत गोमारे, सूर्यकांत मगर, प्रकाश राठोड, संदीप राठोड आदींनी ही सेवा बजावली. नागरिकांच्या सतर्कतेमुळे तसेच पोलिसांच्या तत्काळ प्रतिसादामुळे पाच दरोडेखोर घातक शस्त्रासह जेरबंद झाले असून, फरार तीन आरोपींचा पोलीस शोध घेत आहेत.

## महाराष्ट्र टायगर सेनेकडून मोफत अन्नदान

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ ऑगस्ट -** लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती विविध उपक्रमाने साजरी करण्यात आली. महाराष्ट्र लिब्रेशन टायगर - सेनेच्यावतीने शहरात मोफत अन्नदान करण्यात आले.

येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे आनंदभाई वैरागे यांच्यावतीने हे अन्नदान करण्यात आले. शिवाजी नगरचे पोलीस निरीक्षक दिलीप सागर, पोलीस निरीक्षक आनंत्रे, कैलास कांबळे, अशोक देडे, काँग्रेस कमिटीचे सचिव डॉ. दिनेश नवगिरे यांच्या हस्ते अन्नदान करण्यात आले. यावेळी अनंत साळुंके, सशिुभंम साळुंके, प्रेम वैरागे यांच्यासह सामाजिक संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लम्पीग्रस्त पशुंना पोषणयुक्त आहार द्या : डॉ. भिकाणे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ ऑगस्ट -** लम्पीने त्रस्त असलेल्या गोवंशास मऊ हिरवा एकदल, द्विदल चारा द्यावा. चारा प्रथिनेयुक्त, स्वच्छ चारा देऊन तो सडलेला नसावा याची काळजी घ्यावी. गरज पडल्यास हाताने चारा खाऊ घालावा. कारण गाठी व वेदनेने जनावरे स्वतः खाणे टाळतात, अशी माहिती डॉ. अनिल भिकाणे यांनी दिली.

लम्पी चर्मरोग प्रतिबंध व उपचार विषयक जिल्हास्तरीय ऑनलाईन मार्गदर्शन सत्रात ते बोलत होते. डॉ. भिकाणे नागपूरच्या महाराष्ट्र पशुवैद्यक व पशुविज्ञान विद्यापीठात कार्यरत आहेत. मार्गदर्शन सत्रास लातूर जिल्ह्यातील सर्व १३२ पशुवैद्यकीय संस्थांचे प्रमुख, सहाय्यक आयुक्त, पशुधन विकास अधिकारी, पशुधन पर्यवेक्षक, प्रादेशिक सहआयुक्त डॉ. नाना सोनवणे, जिल्हा उपायुक्त डॉ. श्रीधर शिंदे उपस्थित होते.

डॉ. भिकाणे पुढे म्हणाले, लम्पी विषाणूजन्य रोग असल्याने दरवर्षी वेळेवर लसीकरण हाच प्रभावी उपाय आहे. सर्व गोवर्गीय जनावरांना वेळेवर लस देणे आवश्यक आहे. रोगाच्या सुरूवातीस जनावरांची काळजीपूर्वक देखभाल औषधोपरांपेक्षा अधिक परिणामकारक ठरते. या काळात ८० टक्के सुश्रूषा आणि २० टक्के औषधोपचार आवश्यक असल्याचे आवाहन त्यांनी केले.

## प्रदर्शनातून सांगितले स्तनपानाचे महत्त्व

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ ऑगस्ट -** स्तनपान सप्ताहनिमित्त विलासराव देशमुख शासकीय परिचर्या महाविद्यालयाच्या वतीने अतिविशेषोपचार रुग्णालयात विविध उपक्रम घेऊन जनजागृती करण्यात येत आहे. सप्ताहाचे उद्घाटन डॉ. मंगेश सेलूकर यांच्या हस्ते झाले. यावेळी स्त्रीरोग विभागप्रमुख डॉ. भाऊराव यादव, प्राचार्या अश्विनी बेले, अमृता पोहरे, डॉ. सिरसाट, सुकुमार गुरे, आदींची उपस्थिती होती. याप्रसंगी डॉ. भाऊराव यादव यांनी स्तनपानाचे महत्त्व सांगितले. यावेळी आयोजित पोस्टर प्रदर्शनात एकूण ३४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. शनिवारी रांगोळी स्पर्धेच्या माध्यमातून स्तनपानाचे महत्त्व सांगण्यात आले.

## गरसुळीचे काँग्रेस सरपंच अजय राठोड यांच्यासह कार्यकर्त्यांचा भाजपत प्रवेश



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ ऑगस्ट -** तालुक्यातील गरसुळी येथील काँग्रेस पक्षाचे सरपंच अजय राठोड यांच्यासह विविध आजी-माजी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी भाजपचे नेते आमदार रमेश कराड यांच्या नेतृत्वात रविवारी भाजपमध्ये प्रवेश केला.

लातूर येथील भाजपच्या 'संवाद' कार्यालयात लातूर ग्रामीणचे आमदार रमेश कराड यांच्या उपस्थितीत झालेल्या या भाजप पक्ष प्रवेश सोहळ्यास मंडळ अध्यक्ष शरद दरेकर, बाबासाहेब घुले, अनिल भिसे, श्रीमंत नागरगोजे, दिनकर राठोड, संतोष चव्हाण, धनंजय पवार, नारायण राठोड, उत्तम चव्हाण, रमेश चव्हाण आदींची उपस्थिती होती.

यावेळी आमदार कराड यांच्या उपस्थितीत गरसुळी येथील सरपंच अजय राठोड, माजी सरपंच तथा ग्रामपंचायत सदस्य वाल्मीक घोडके, श्रीहरी बुवनर, संजय राठोड, सोसायटीचे सदस्य लहू घोडके, शेषराव राठोड, भागवत कातळे, उत्तम कांबळे, वैजनाथ घोडके, प्रशांत चव्हाण, रामराव राठोड, नामदेव राठोड गुरुजी, विजय राठोड, लक्ष्मण चव्हाण, राजाभाऊ राठोड, कृष्णा राठोड, किशन घोडके, रुपेश घोडके, रामदास घोडके, बालासाहेब घोडके, शंकर घोडके, नागनाथ घोडके, अच्युत सरवदे, बालाजी चव्हाण, बाळासाहेब घोडके, हरीपाल घोडके, अंतराम चव्हाण, गोविंद सोमवंशी, नवनाथ वैद्य, बळीराम चव्हाण, मधुकर घोडके आदींनी भाजपमध्ये प्रवेश केला.

लातूर ग्रामीण मतदारसंघातील गावागावात, वाडी, वस्तीत शासनाच्या विविध योजनेच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांचा निधी उपलब्ध करून विकासकामांना गती दिली असून, गरसुळी गावच्या विकासाला निधीची कमतरता पडू देणार नाही, असे यावेळी आमदार रमेश कराड म्हणाले. ही त्यांनी बोलून दाखवले. सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले तर संतोष चव्हाण यांनी आभार मानले.

## दयानंद विज्ञान महाविद्यालयातील संगणकशास्त्र फोरमचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ ऑगस्ट -** येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित, दयानंद विज्ञान महाविद्यालयातील संगणकशास्त्र फोरमचे उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष व महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या हस्ते झाले.

याप्रसंगी संगणकशास्त्र विभाग प्रमुख डॉ.रोहिणी शिंदे, डॉ.युवराज सारणीकर, आयक्यूएसी समन्वयक डॉ.जमन अंगुलवार, डॉ.महेश बेंबडे,डॉ. गजानन बने, डॉ.विजेंद्र चौधरी,डॉ. नाथराव केदार,डॉ.आण्णाराव चौगुले,ग्रंथपाल प्रा.किरण भिसे, संगणकशास्त्र विभाग समन्वयक डॉ.संगीता जाजू, फोरम प्रभारी प्रा.गोविंद बांगड,फोरम अध्यक्ष गौरी जाजू यांची प्रमुख उपस्थिती होती.याप्रसंगी महाविद्यालयाचे डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे यांनी विद्यार्थ्यांनी संगणकशास्त्र फोरमच्या माध्यमातून विविध उपक्रम राबवावेत असे सांगितले.

प्रास्ताविक डॉ.रोहिणी शिंदे यांनी केले तर आभार प्रा.वैभव कुलकर्णी यांनी मानले.फोरम प्रभारी प्रा.गोविंद बांगड यांनी फोरमची माहिती व उद्देश सांगितले.

सूत्रसंचालन आकांक्षा पाटील व प्रज्वल लामतूरे या विद्यार्थ्यांनी संयुक्तपणे केले. यावेळी फोरमचे सर्व सदस्य व ब्रिज कोर्स गुणवंत विद्यार्थ्यांचा यथोचित सन्मान प्रमुख मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी प्रा.सुजाता काळे, प्रा.मंगेश सुगरे, प्रा.सुमित जोशी, प्रा.अरुणा चौधरी,प्रा.आशा बोराडे,प्रा.पुजा नंदगावे,प्रा.दीपाली दाडगे आदी उपस्थित होते.

## सेवालयाच्या समर्थनार्थ धरणे

### सेवालयातील लेकरांचे इतर बालगृहात स्थलांतर करू नये

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ४ ऑगस्ट -** औसा तालुक्यातील हासेगाव येथील सेवालयाचे प्रमुख रवी बापटले हे गेल्या पंधरा वर्षांपासून एचआयव्ही / एडस् संक्रमित महिला व त्यांच्या पाल्यांच्या सुदृढ आरोग्य व उज्ज्वल भवितव्यासाठी काम करीत आहेत. मात्र, काही विघ्नसंतोषी मंडळीने बापटले व सेवालयाला बदनाम करण्यासाठी कुभांड रचले आहे. सेवालयातील लेकरांना इतरत्र स्थलांतर करण्याचा प्रयत्न सुरू आहे. याच्या निषेधार्थ सेवालयाचे पालक, हितचिंतक, मित्रपरिवार, विविध समाजवादी पक्ष आणि संघटनांच्यावतीने शहरातील महात्मा गांधी चौकात रविवारी धरणे आंदोलन केले. सेवालयातील लेकरांना नियमितपणे आरोग्य, शिक्षण, सकस भोजन, क्रीडा या मूलभूत सुविधा मिळत आहेत. त्यामुळे त्यांचे स्थलांतर करण्यात येऊ नये, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

हासेगाव येथे आम्ही सेवक संस्थेच्यावतीने चालविण्यात येणारे सेवालय बालगृह व हॅप्पी इंडियन व्हिलेजच्या माध्यमातून एचआयव्ही / एडस् संक्रमित अनाथ मुलांचा व सज्ञान झालेल्या मुला-मुलींचा व्यवस्थित सांभाळ केला जातो. सेवालयाच्या पाठबळामुळे एचआयव्ही संक्रमित प्रौढ, तरुण-तरुणी स्वतःचे संसार थाटून स्वावलंबी जीवन जगत आहेत. एचआयव्ही संक्रमित दाम्पत्यांना निगेटिव्ह लेकरं झाली आहेत. सेवालयाचे काम नियमानुसार सुरू आहे. असे असताना सेवालयातील एका बालिकेला फूस लावून सेवालयविरोधातील विघ्नसंतोषी मंडळींनी गालबोट लावण्याचा प्रयत्न केला आहे. सेवालयाचे प्रमुख रवी बापटले यांच्यावर खोटे आरोप करून त्यांना अटक करण्यात आली आहे. या खोट्या आरोपांमधून सेवालयाची निर्दोष मुक्तता होईल, याची आम्हाला खात्री आहे. याबाबत न्यायालयाचा निर्णय सगळ्यांनाच मान्य आहे. मात्र, केवळ बापटले यांच्यावर गुन्हा दाखल झाला म्हणून सेवालय बालगृहातील बालकांना दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरित करण्याचा निर्णय बालकांच्या अहिताचा आहे. सेवालयातील सर्व बालके सुखात आहेत. त्यांना नियमितपणे आरोग्य, शिक्षण, सकस भोजन, क्रीडा या मूलभूत सुविधा मिळत आहेत. सेवालयातील मुक्त वातावरण, सकस आहार, नियमित व्यायाम यामुळे सर्व लेकरं ठणठणीत आहेत. बहुतेक मुले उच्च पदस्थ अधिकारी होण्यासाठी परिश्रम घेत आहेत.

सेवालयातील लेकरांना इतर बालगृहात स्थलांरीत करण्याचा महिला व बाल विकास अधिकाऱ्यांनी दिलेला आदेश रद्द करण्यात यावा, अन्यथा लोकशाही पध्दतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा यावेळी देण्यात आला. मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी संदीप यादव यांना देण्यात आले. यावेळी सेवालयाचे पालक, शेकडो हितचिंतक, मित्रपरिवार, विविध समाजवादी पक्ष व संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### सेवालयात सर्व सुरळीत

सेवालयातील मुलींना डॉक्टर करण्याचे रवी बापटले यांचे स्वप्न आहे. दहावी व बारावीत शिक्षण घेत असलेल्या सुमारे २५ मुलांना नियमित शिक्षणासोबतच खाजगी शिकवण्याही लावण्यात आल्या आहेत. सेवालयातील मुलांनी आजपर्यंत ९० टक्क्यांपर्यंत दहावी-बारावीच्या परीक्षेत गुण घेतले आहेत. येथे सर्व सुरळीत सुरू असताना लेकरांना बाहेर हलविण्याच्या हालचाली या लेकरांचे भवितव्य अंध:कारमय करणाऱ्या आहेत. रवी बापटले हे न्यायालयीन कोडठीत असले तरी त्यांच्या गैरहजेरीत संस्थेच्या उपाध्यक्षा शैलजा बरुरे यांच्यासह संस्थेचे सर्व सदस्य, संचालक सेवालयातील मुलांची काळजी वाहत आहेत. तरीही या लेकरांना दुसऱ्या बालगृहात हलविण्याचा बाल कल्याण समितीला देण्यात आलेला आदेश बालकांच्या हिताचा नाही.



www.tarunbharat.net
तरुण भारत
# अर्थकारण



## चुकीच्या मार्गाने नेऊ शकतो 'शॉर्टकट'

अर्थभान

शेअर बाजार अधीर गुंतवणूकदारांकडून संयमित गुंतवणूकदारांना पैसे हस्तांतरित करण्याचे साधन आहे -वारेन बफेट

वारेन बफेटच्या अनेक उत्तम विधानांपैकी वरील वाक्य अत्यंत संयुक्तिक आहे. वारेन बफेटला जगातील सर्वोकृष्ट गुंतवणूकदारांत सामील केल्या जाते. आकडेवारी किंवा चार्ट इत्यादीचा अभ्यास करून गुंतवणूक करणे हा एक भाग आहे, पण गुंतवणूक करण्यापूर्वी, करीत असताना आणि केल्यावर आपल्या मनाचे चाळे, पैसे कमवायचा लोभ किंवा गमवायची भीती आणि आजूबाजूला घडणाऱ्या घटना याचा प्रभाव गुंतवणुकीच्या कामगिरी वर पडतो. बहुतांशी सगळेच मोठे आणि विख्यात गुंतवणूकदार मस्तिष्कपेक्षा मनाच्या तयारीला जास्त महत्त्व देतात. त्यामुळे गुंतवणूक करणे संपत्ती निर्माण करण्याचे एक शक्तिशाली साधन असले तरी, हा नेहमीच एक पूर्णपणे तर्कशुद्ध खेळ नसतो. आपले मन, काही 'शॉर्टकट' किंवा 'पक्षपात'साठी आतुर असते, जे आपल्याला चुकीच्या मार्गावर नेऊ शकतो. विशेषतः जेव्हा पैशाचा प्रश्न असतो, हे वर्तणुकीशी संबंधित पक्षपात समजून घेणे अधिक स्मार्ट आणि शिस्तबद्ध गुंतवणूकदार बनण्याच्या दिशेने पहिले पाऊल आहे. गुंतवणूक करताना लक्षात ठेवण्यासारखे १० महत्त्वाचे वर्तणुकीशी संबंधित पक्षपात येथे दिले आहेत:

**१. पुष्टीकरण पूर्वग्रह : 'हे मला आधीच माहीत होतं!'**

कल्पना करा की तुम्हाला विश्वास आहे की, एखाद्या प्लॉटचे भाव गगनाला भिडणार आहे. हे पुष्टीकरण पूर्वग्रह तुम्हाला तुमच्या सध्याच्या विश्वासाची पुष्टी करणारी माहिती शोधायला आणि तिचा अर्थ लावायला लावतो, तर त्याला विरोध करणारी कोणतीही गोष्ट तुम्ही दुर्लक्षित करता. तुमच्या निर्णयाला पूरक माहिती/लेख उत्सुकतेने वाचाल, पण कोणत्याही अडचणीची सूचना देणाऱ्या बातम्या फेटाळून लावाल. यामुळे अतिआत्मविश्वास आणि संभाव्य धोके न ओळखल्यास हानी होण्याची शक्यता असते. **यावर मात करण्यासाठी** : सक्रियपणे भिन्न मते आणि तुमच्या सुरुवातीच्या गृहितकांना आव्हान देणारी माहिती शोधा. तुमच्या स्वतःच्या कल्पनांसोबत विरोधाभास निर्माण करा.

**२. अतिआत्मविश्वास पूर्वग्रह : 'मी शेअर बाजाराचा जीनियस आहे!'**

हा पूर्वग्रह आपल्याला स्वतःच्या क्षमता आणि अंदाजांच्या अचूकतेबद्दल जास्त अंदाज लावायला लावतो. तुम्हाला वाटू शकते की, तुम्ही स्टॉक निवडण्यात प्रत्यक्षात आहात, त्यापेक्षा चांगले आहात किंवा तुम्ही बाजाराची वेळ योग्यरीत्या ठरवू शकता. अतिआत्मविश्वासामुळे जास्त व्यवहार, जास्त धोका पत्करणे आणि अपयशाची शक्यता कमी लेखणे होऊ शकते.

**यावर मात करण्यासाठी** : तुमच्या यश आणि अपयशांचा मागोवा घेण्यासाठी ज्ञानाबद्दल वास्तववादी राहा आणि हे मान्य करा की, तज्ज्ञांकडूनही कधीकधी चुका होतात.

**३. अँकरिंग पूर्वग्रह : 'ती पहिली किंमत माझ्या डोक्यात बसली!'**

अँकरिंग तेव्हा होते, जेव्हा आपण निर्णय घेताना आपल्याला मिळालेल्या माहितीच्या पहिल्या भागावर ('अँकर') जास्त अवलंबून असतो. उदाहरणार्थ, जर तुम्ही पहिल्यांदा एखादा स्टॉक १०० मध्ये व्यवहार करताना पाहिला, तर तुम्ही त्या किमतीला अँकर करू शकता. जरी मूलभूत गोष्टी बदलल्या तरी, तुम्ही १०० पेक्षा कमी असलेल्या कोणत्याही गोष्टीला 'संधी' किंवा त्यापेक्षा जास्त असलेल्या कोणत्याही गोष्टीला 'महाग' मानू शकता, त्याच्या सध्याच्या खऱ्या मूल्याची पर्वा न करता.

**यावर मात करण्यासाठी** : नेहमी स्वतःचे सखोल संशोधन आणि विश्लेषण करा, सुरुवातीच्या किमतींना तुमच्या मूल्याची धारणा ठरवू देऊ नका.

**४. तोटा टाळण्याचा पूर्वग्रह : 'मला तोटा सहन होत नाही किंवा मला कधीच तोटा होत नाही!'**

नफ्याच्या तुलनेत तोट्याची वेदना आपल्याला जास्त तीव्रतेने जाणवते. हा पूर्वग्रह गुंतवणूकदारांना तोट्यात असलेल्या गुंतवणुकींना खूप जास्त काळ धरून ठेवण्यास प्रवृत्त करू शकतो. म्हणूनच तोट्यात असलेल्या गुंतवणूक न विकता फायद्यातल्या गुंतवणुकीला विकण्याचा निर्णय घेतला जातो. अर्थात् घोडा आणि खच्चर दोन्ही असताना, घोडा विकून खच्चर ठेवायचे का, खच्चर विकला तर नुकसान होणार.

**यावर मात करण्यासाठी** : तुमच्या गुंतवणुकीसाठी स्टॉप-लॉस मर्यादा सेट करा आणि त्यांचे काटेकोरपणे पालन करा. केवळ अल्प-मुदतीच्या किमतीतील चढ-उतारांवर लक्ष केंद्रित करण्याऐवजी तुमच्या दीर्घकालीन आर्थिक उद्दिष्टांवर लक्ष केंद्रित करा.

**५. समूहाची मानसिकता : 'बाकीचे सर्व तेच करीत आहेत!'**

ही मोठ्या गटाच्या कृतींचे अनुसरण करण्याची प्रवृत्ती आहे, जरी ती तुमच्या स्वतःच्या निर्णयाच्या विरोधात असला तरी. जेव्हा तुम्हाला एखादा स्टॉक वाढताना दिसतो आणि प्रत्येकजण तो खरेदी करीत असल्याचे दिसते, तेव्हा तुम्हाला आत येण्याचा दबाव जाणवू शकतो, तुम्हाला संधी गमावण्याची भीती वाटेल. यामुळे बाजाराच्या शिखरावर खरेदी करणे आणि बाजाराच्या तळाशी विक्री करणे होऊ शकते.

**यावर मात करण्यासाठी** : स्वतःचे स्वतंत्र संशोधन आणि विश्लेषण करा. लक्षात ठेवा की, यशस्वी गुंतवणुकीत अनेकदा गर्दीच्या विरोधात जाणे समाविष्ट असते.

**६. अलिकडील घटनांचा पूर्वग्रह : 'काल जे घडले तेच उद्या घडेल!'**

अलिकडील घटनांचा पूर्वग्रह आपल्याला अलिकडील घटनांवर जास्त वजन देतो आणि त्यांना भविष्यात वाढवतो. जर बाजार अलिकडे चांगला चालला असेल, तर तुम्ही असे गृहीत धरू शकता की, तो अनिश्चित काळासाठी असेच चालू राहील, ज्यामुळे जास्त आशावादी निर्णय होतील. याउलट, अलिकडील मंदी तुम्हाला जास्त निराशावादी बनवू शकते.

**यावर मात करण्यासाठी** : मोठे चित्र आणि ऐतिहासिक डेटा पाहा. लक्षात ठेवा की, बाजाराची चक्रे सामान्य आहेत आणि मागील कामगिरी भविष्यातील परिणामांचे सूचक नसते.

**७. उपलब्धता पूर्वग्रह : 'ती कथा माझ्या डोक्यात बसली!'**

जे प्रसंग सहज आठवतात किंवा आपल्या स्मृतीमध्ये स्पष्ट असतात, त्यांची शक्यता आपण जास्त मानतो. जर तुम्ही एखाद्या पेनी स्टॉकवर एखाद्याने प्रचंड नफा कमावल्याची नाट्यमय कथा ऐकली, तर तुम्ही तुमच्या स्वतःच्या यशाची शक्यता जास्त मानू शकता, जरी असे परिणाम दुर्मिळ असले तरी.

**यावर मात करण्यासाठी** : सनसनाटी कथा किंवा किस्से तुमच्या गुंतवणुकीच्या निर्णयांवर परिणामकारक ठरू देऊ नका. डेटा, मूलभूत विश्लेषण आणि सुनियोजित रणनीतीवर अवलंबून रहा.

**८. बुडालेल्या खर्चाची चूक : 'मी आधीच खूप काही गुंतवले आहे!'**

हा पूर्वग्रह आपल्याला संसाधने (वेळ, पैसा, प्रयत्न) आधीच गुंतवल्यामुळे अपयशी कृतीचा मार्ग सुरू ठेवतो, जरी ते कार्य करीत नाही, हे स्पष्ट असले तरी. तुम्ही तोट्यात असलेला स्टॉक धरून ठेवू शकता, असा विचार करून,'मी आधीच खूप गमावले आहे; आता मी विकू शकत नाही!' जेव्हा योग्य कृती तुमचे नुकसान कमी करणे असेल.

यावर मात करण्यासाठी : तुम्ही आधीच किती खर्च केला, यावर लक्ष केंद्रित करण्याऐवजी तुमच्या गुंतवणुकीच्या भविष्यातील क्षमतेवर लक्ष केंद्रित करा. जर एखाद्या गुंतवणुकीचा आता अर्थ नसेल, तर पुढे जाण्यास तयार राहा.

**९. फ्रेमिंग प्रभाव : 'ते कसे सांगितले जाते, ते महत्त्वाचे आहे!'**

माहिती कशी सादर केली जाते (किंवा फ्रेम केली जाते) ती बाब आपल्या निर्णयांवर लक्षणीय परिणाम करू शकते. उदाहरणार्थ, '९० टक्के यशाची शक्यता' असलेला म्युच्युअल फंड '१० टक्के अपयशाची शक्यता' असलेल्या म्युच्युअल फंडापेक्षा खूप चांगला वाटतो, जरी ते समान माहिती देत असले तरी.

**यावर मात करण्यासाठी** : नेहमी मथळे आणि विपणन भाषेच्या पलीकडे पाहा. निर्णय घेण्यापूर्वी मूलभूत तथ्ये आणि डेटा समजून घ्या.

माणसाला देवाने मन आणि विचार करायची शक्ती दिलेली आहे आणि त्यामुळेच इतर सर्व प्राण्यांपेक्षा तो श्रेष्ठ आहे, पण हेच मन धोका, भीती, लोभ इत्यादी कारणाने चुकीचे निर्णय सुद्धा घेते. वर्तणुकीशी संबंधित पक्षपात मानवी असण्याचा एक नैसर्गिक भाग आहेत. चांगली बातमी अशी आहे की, त्यांची जाणीव असणे हे अधिक तर्कशुद्ध आणि शेवटी अधिक यशस्वी गुंतवणुकीचे निर्णय घेण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल आहे. हे धोके समजून तुम्ही त्यांचा प्रभाव कमी करण्यासाठी आणि तुमच्या दीर्घकालीन आर्थिक उद्दिष्टांवर लक्ष केंद्रित करण्यासाठी रणनीती विकसित करू शकता. ●●

● **पराग परांजपे**
गुंतवणूक तज्ज्ञ/ ९८२२७३८९०३
Think Financial Intermediary Services Pvt. Ltd.

## सोलर इंडस्ट्रीजचे शिल्पकार सत्यनारायण नुवाल!

वैदर्भीय उद्योगपती


सत्यनारायण नंदलाल नुवाल

यशाचा प्रवास हा कधीच सरळसोट नसतो. तो अनेकदा काट्यांनी, अडथळ्यांनी, अपयशांनी आणि संघर्षांनी भरलेला असतो. पण, जी व्यक्ती या परिस्थितीपुढे हार न मानता चालत राहते, पराभवाच्या क्षणात जिद्दीने स्वतःला उभी करते, त्याचे नाव अखेर यशाच्या सुवर्णपानांवर कोरले जातेच. अशीच एक प्रेरणादायी आणि हृदयस्पर्शी जीवनकहाणी आहे सत्यनारायण नंदलाल नुवाल यांची.



राजस्थानातील भीलवाड्यासार'या छोट्याशा गावातून प्रवास सुरू करून रेल्वे प्लॅटफॉर्मवर रात्री घालवत संघर्ष करीत त्यांनी आज सोलर इंडस्ट्रीज इंडिया लिमिटेड नावाचे अब्जावधी रुपयांचे जागतिक साम'ाज्य उद्योगविश्वात उभे केले आहे. भीलवाड्यातील एका सामान्य कुटुंबात त्यांचा जन्म झाला. वडील सरकारी पटवारी तर आजोबा एका लहानशा दुकानाचे मालक- अशी अत्यंत साधी त्यांनी पृष्ठभूमी होती. घरात पैसा कमी होता, पण मेहनतीची आणि प्रामाणिकपणाची परंपरा होती. वडिलांच्या निवृत्तीनंतर आर्थिक ताण अधिक वाढला. त्या काळात उच्च शिक्षण घेण्याची सोयही नव्हती. त्यामुळे सत्यनारायण यांनी दहावीनंतर शिक्षण थांबविले. इतर मुले जिथे पदवी आणि करिअरच्या स्वप्नांमध्ये रमली होती, तिथे हा तरुण वेगळा विचार करीत होता. शिक्षणापेक्षा व्यवसायाकडे त्याचे मन खेचले गेले होते. मथुरेत गुरुदेवांच्या सान्निध्यात राहून त्यांनी संयम, कष्ट आणि चिकाटी यांचे धडे आत्मसात केले. त्या काळातच त्यांच्या मनात ठसाव असा विचार रुजला आणि तो म्हणजे माझा मार्ग शिक्षणाचा नाही, माझा मार्ग व्यवसायाचा आहे.

अर्थातच हा मार्ग सोपा नव्हता. फक्त १८ वर्षांचे असतानाच त्यांनी शाई उत्पादनाचा व्यवसाय सुरू केला. पण, हा पहिला प्रयत्न अपयशी ठरला. त्यानंतर भाडेपट्टा, वाहतूक सेवा अशा अनेक उपक्रमांत त्यांनी भाग्य आजमावले, परंतु प्रत्येक वेळी त्यांना पाहिजे तसे यश मिळाले नाही. तरी सत्यनारायण खचले नाहीत. विवाहानंतर जबाबदाऱ्यांचे ओझे वाढेल आणि रोजगाराच्या शोधात महाराष्ट्रात आले. चंद्रपूर आणि बल्हारशा येथे राहताना त्यांना प्रचंड हालअपेष्टा सोसाव्या लागल्या. काही वेळा तर दोन वेळच्या अन्नाचीही सोय नव्हती. अनेक रात्री रेल्वे प्लॅटफॉर्मवर झोपून त्यांनी दिवस काढले. पण, या सर्व संकटांतून त्यांची एकच जिद्द त्यांना आधार देत होती, हरायचे नाही.

१९७७ मध्ये बल्हारशामध्ये त्यांच्या आयुष्यात एक निर्णायक वळण आले. अब्दुल सत्तार अल्लाहभाई या व्यक्तीकडे औद्योगिक विस्फोटकांचा मासिक परवाना होता, पण वयामुळे ते व्यवसाय पुढे नेऊ इच्छित नव्हते. सत्यनारायण यांनी ही संधी ओळखली आणि केवळ एक हजार रुपयांत तो परवाना भाड्याने घेतला. अशा प्रकारे त्यांच्या विस्फोटक व्यवसायातील प्रवासाची सुरुवात झाली. सुरुवातीला हा फक्त व्यापारी उपक्रम होता, पण कोळसा खाणींमध्ये विस्फोटकांची वाढती मागणी त्यांच्यासाठी वरदान ठरली. थोड्याच दिवसांत बि'टिश कंपनी इम्पिरियल केमिकल इंडस्ट्रीजने त्यांना अधिकृत वितरक म्हणून मान्यता दिली. त्यांच्या व्यवसायाला नवी दिशा मिळाली, आत्मविश्वास वाढला आणि हळूहळू त्यांचे आर्थिक पाय मजबूत होऊ लागले.

१९९५ हे वर्ष त्यांच्या आयुष्यात सोन्याचे अक्षर ठरले. स्टेट बँकेकडून ६० लाखांचे कर्ज घेऊन त्यांनी नागपूरमध्ये सोलर इंडस्ट्रीज इंडिया लिमिटेडची स्थापना केली. सुरुवातीला कोल इंडिया लिमिटेडसार'या सरकारी खाणींना विस्फोटके पुरवण्यापासून प्रवास सुरू झाला. लवकरच कंपनीने उत्पादन क्षेत्रात पाऊल टाकले. १९९६ मध्ये त्यांना वार्षिक सहा हजार टन विस्फोटके निर्माण करण्याचा परवाना मिळाला आणि त्यानंतर मागे वळून पाहावे लागले नाही. व्यापारी व्यवसायापासून उत्पादन व्यवसायाकडे झालेला हा बदलच त्यांच्या साम'ाज्याची खरी सुरुवात ठरली.

सोलर इंडस्ट्रीजच्या उत्पादनात विलक्षण वैविध्य आहे. औद्योगिक खाणकामासाठी वापरली जाणारी विस्फोटके, कार्ट्रिज स्वरूपातील पॅकेज्ड विस्फोटके, डेटोनेटर्स, डेटोनेशन कॉर्ड, कास्ट बूस्टर्स अशा विविध प्रकारची उच्च तांत्रिक उत्पादने कंपनी तयार करू लागली. केवळ औद्योगिक क्षेत्रापुरतीच मर्यादा न ठेवता कंपनीने लष्करी क्षेत्रातही पाऊल टाकले. भारतीय लष्कराच्या अग्नी आणि पिनाका यासार'या अत्याधुनिक मिसाईल प्रकल्पांसाठी लागणारे प्रोपेलेंट, बूस्टर्स आणि युद्धसामगी सोलर इंडस्ट्रीजने तयार केली. त्यामुळे आज या कंपनीचे नाव केवळ औद्योगिक विस्फोटक क्षेत्रातच नव्हे, तर संरक्षण उद्योगातसुद्धा अग'गण्य ठरले आहे.


सोलर इंडस्ट्रीजचा विस्तार वेगाने वाढत गेला. आज कंपनीची उपस्थिती भारतापुरती मर्यादित नाही. झांबिया, नायजेरिया, टर्की, दक्षिण आफ्रिका, घाना, ऑस्ट्रेलिया, तंजानिया यासार'या देशांत कंपनीने आपली केंद्रे उभारली आहेत. एकूण ६५ पेक्षा जास्त देशांमध्ये सोलर इंडस्ट्रीजची उत्पादने पोहोचतात. भारतात आठ राज्यांमध्ये २५ पेक्षा जास्त युनिट्स कार्यरत आहेत. देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय अशा दोन्ही बाजारपेठांमध्ये ही कंपनी आपली भक्कम छाप सोडत आहे. आज अब्जावधी रुपयांच्या उंचीवर पोहोचलेले सत्यनारायण नुवाल हे केवळ उद्योजक नाहीत, तर एक जिवंत प्रेरणा आहेत. उच्च शिक्षण न घेता, इंग'जी भाषेची ताकद नसतानाही त्यांनी जिद्दीच्या बळावर आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर आपले साम'ाज्य उभारले. त्यांच्या प्रवासातून एकच संदेश समोर येतो... अपयश आपल्याला तोडत नाही, ते आपल्याला घडवते. प्रत्येक छोट्या सुरुवातीचे बीजच मोठ्या यशाच्या वृक्षाला जन्म देते. रेल्वे प्लॅटफॉर्मवर रात्री काढणारा तो तरुण आज जागतिक उद्योगविश्वात भारताचा झेंडा उंचावत आहे. सत्यनारायण नंदलाल नुवाल यांचा प्रवास प्रत्येक तरुणांसाठी आशेचा किरण आहे, प्रत्येक स्वप्नवेड्या मनासाठी जिद्दीचे मूर्तिमंत उदाहरण आहे आणि प्रत्येक उद्योजकासाठी प्रेरणादायी आदर्श आहे.. ●●

● **दीप्ती राखुंडे**
९५०३९१०८२२

## 'ग्रे मार्केट' म्हणजे काय रे भाऊ?

ग्रे मार्केटला सोप्या शब्दात सांगायचे तर, आयपीओ शेअर्स खरेदीसाठी हे सेकंड हँड मार्केट आहे. थेट शेअर एक्सचेंजऐवजी गुंतवणूकदाराकडून शेअर्स खरेदी करणे. हा बाजार अनियंत्रित आणि अनधिकृत आहे. येथे काम करणारे दलाल, व्यापारी किंवा विक्रेते यांची कुठेही नोंदणी झालेली नाही. कोणतेही नियम-कायदे नाहीत, परस्पर विश्वासाच्या आधारावर येथे काम केले जाते.

जेव्हा कोणतीही कंपनी प्रथमच शेअर बाजारात नोंदणी करते, तेव्हा ती आयपीओ आणते. ते खरेदी करण्यासाठी, सेबी नोंदणीकृत ब्रोकरेज फर्मकडे अर्ज सादर करावा लागेल. पण, जर गुंतवणूकदारांची इच्छा असेल, तर ते ब्रोकरेज फर्म सोडून इतर कोणत्याही



खरेदीदाराकडून हे शेअर्स खरेदी करू शकतात. एखाद्या शेअरला ग्रे मार्केटमध्ये किती किंमत मिळते, किती खरेदीदार मिळतात. त्याआधारे कंपन्याची लिस्टिंग कशी असू शकते, याचा अंदाज लावतात.

**ट्रेडिंग कशा प्रकारे होते?**

ग्रे मार्केट ट्रेडिंग सामान्यतः तेव्हा होते, जेव्हा एखादा शेअर जो मार्केटमध्ये ट्रेडिंग करण्यापासून निलंबित केला जातो किंवा जेव्हा अधिकृत ट्रेडिंग सुरू होण्यापूर्वी नवीन सिक्युरिटीज खरेदी किंवा विकल्या जातात. ग्रे मार्केटमुळे आपीओच्या मागणीचा अंदाज लावता येतो तसेच नजीकच्या भविष्यात ऑफर केले जाणाऱ्या सिक्युरिटीजचा व्यापार ग्रे मार्केटमध्ये होतो.

**ग्रे मार्केट कसं कार्य करतं?**


ग्रे मार्केटचा व्यवसाय विश्वासावर चालतो. उदाहरणार्थ: एखाद्या कंपनीचा व्यवसाय चांगला सुरू असून, कंपनीला उत्तम नफा देखील झाला आहे. आता कंपनीने व्यवसाय वाढवण्यासाठी आणला. आता गुंतवणूकदारांना या आयपीओमध्ये गुंतवणूक करावीशी वाटल्यास पण अर्ज करण्याची शेवटची तारीख निघून गेल्यास, गुंतवणूकदार ग्रे मार्केटकडे वळतात. तेथे आधीच अर्ज केलेला गुंतवणूकदार त्याच्या शेअरसाठी बोली लावतो. दुसऱ्या गुंतवणूकदाराची इच्छा असल्यास, तो बोली लावून संपूर्ण अर्ज खरेदी करू शकतो.

ग्रे मार्केट हे नवीन समभागाला मिळू शकणारी मागणी आणि त्याची गुंतवणूकदारांमधील लोकप्रियता जोखण्याचे एक माध्यमही मानले जाते. ग्रे मार्केट अनधिकृत आहे, पण बेकायदेशीर नाही. पण, या बाजाराचा अनधिकृत दर्जा म्हणजे हा बाजार प्रचंड जोखमीचा असल्याचे दाखवून देतो. 'ग्रे मार्केट' या शब्दाचा अर्थ अनधिकृत विक्रेत्यांकडून मालाची आयात आणि विक्री देखील आहे; ग्रे मार्केटमधील व्यापारात खरेदीदार आणि विक्रेता यांच्यातील व्यापाराची सर्वस्वी जबाबदारी त्या दोहोंवरच असते आणि जोवर त्यांचा सौदा झालेल्या समभागाचा अधिकृत व्यापार सुरू होत नाही, तोवर हा सौदा निकाली काढला जाऊ शकत नाही. यामुळे एखादा बेईमान पक्ष ठरलेल्या सौद्यापासून परावृत्त होऊ शकण्याची जोखीम असते. या जोखमीमुळे काही संस्थात्मक गुंतवणूकदार, जसे पेन्शन फंड आणि म्युच्युअल फंड, ग्रे मार्केटमधील व्यापारापासून दूर असतात. एकूणच काय तर सेबीच्या नियमांपासून दूर असणारे हे एक प्रति शेअर मार्केट आहे, असे सांगता येईल. ●●

● **सोनाली ठेंगडी**-७७५५९३८८२२

| | २५ जुलै बंदभाव (रु.) | १ ऑगस्ट बंदभाव (रु.) | उतार/ चढाव |
|---|---|---|---|
| सेन्सेक्स | ८१,४६३ | ८०,६०० | -८६३ |
| निफ्टी | २४,८३७ | २४,५५० | -२८७ |
| सोने (१० ग्रॅम) | १,००४८० | ९९,८२० | -६६० |
| चांदी प्रति किलो | ११८००० | ११३००० | -५००० |
| कच्चे तेल बॅरल | $ ६८.७५ | $७१.२५ | $ +२.५ |

## बजाजची नवी बाईक लवकरच येणार बाजारात



दुचाकी आणि तीन चाकी वाहन क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी बजाज ऑटो आता क्रूजर बाईक सेगमेंटमध्ये आपले वर्चस्व पुन्हा प्रस्थापित करण्याच्या तयारीत आहे. यासाठी कंपनीने अॅव्हेंजर २२० स्ट्रीट ही लोकप्रिय क्रूझर बाईक भारतीय बाजारात पुन्हा सादर करण्याचा निर्णय घेतला आहे. अॅव्हेंजर स्ट्रीट २२० ला क्लासिक लूक देण्यात आला आहे. स्ट्रीट मॉडेलमध्ये काळ्या थीमचा वापर करण्यात आला आहे. म्हणजेच बाईकचा बहुतांश भाग मॅट ब्लॅक किंवा ग्लॉसी ब्लॅक शेड्समध्ये असेल. यात क्रूझ मॉडेलप्रमाणे हाय विंडशील्ड, बॅकरेस्ट किंवा क्रोम डिटेल्स दिसणार नाहीत. बाईकमध्ये २२० सीसी ऑईल-कूल्ड, सिंगल सिलेंडर इंजिन देण्यात आले आहे, जे १०.०३ पीएस पॉवर आणि १७.५५ एनएम टॉर्क निर्माण करते. यात ५ स्पीड गीअरबॉक्सचा समावेश आहे. हेच इंजिन सध्या अॅव्हेंजर २२० क्रूझमध्येही वापरण्यात येते. अॅव्हेंजर स्ट्रीट आणि क्रूझ दोन्ही क्लासिक क्रूझर शैलीतील बाईक्स आहेत. अॅव्हेंजर २२० स्ट्रीट ही अॅव्हेंजर २२० क्रूझपेक्षा थोडी स्वस्त असेल. क्रूझ मॉडेल सध्या १.४८ लाख रुपये (एक्स-शोरूम) मध्ये उपलब्ध आहे. तर स्ट्रीट आवृत्तीची संभाव्य किंमत १.४० लाख रुपये किंवा त्याहून कमी असण्याची शक्यता आहे. ●●

## तुमचे व्यवहार कसे ट्रॅक होतात?

डिजिटल पेमेंट्स आणि आयकर

**प्रस्तावना : डिजिटल व्यवहारांची वाढ आणि सरकारचे लक्ष**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१६ मध्ये सुरू केलेल्या 'डिजिटल इंडिया' मोहिमेनंतर भारतात ऑनलाईन व्यवहारांमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. यूपीआय, मोबाइल वॉलेट, नेट बँकिंग, आरटीजीएस, ईएफटी, क्रेडिट कार्ड हे सर्व व्यवहार आता अगदी सामान्य झाले आहेत.

पण अनेकांना हे माहिती नाही की, हे सर्व व्यवहार आयकर विभागाकडून बारकाईने ट्रॅक केले जातात. कारण, विभाग आता केवळ उत्पन्नावर आधारित माहितीवर विश्वास ठेवत नाही, तर लाईफस्टाईल बेस्ड स्क्रूटनी करतो.

**एआयएस आणि टीआयएस - आयकर विभागाचे नवे शस्त्र**

एआयएस हे एक व्यापक स्टेटमेंट आहे, जे आयकर पोर्टलवर प्रत्येक करदात्याला उपलब्ध असते. हे स्टेटमेंट खालील गोष्टींची माहिती समाविष्ट करते:

- बँक खात्यातील जमा व खर्च
- क्रेडिट कार्डवरील खर्च
- शेअर्स, म्युच्युअल फंड खरेदी-विक्री
- व्याजाचे उत्पन्न
- टीडीएस व टीसीएसचा तपशील
- मालमत्ता खरेदी/विक्री
- परदेशी रेमिटन्स (एलआरएस)
- गिफ्ट्स, रेंटल इन्कम, इ. इतर व्यवहार

टीआयएस हे एआयएसचे सारांश स्वरूप आहे, जे थेट आयटीआर फाईल करताना वापरले जाते. हे विभागवार उत्पन्नाचे आकडे दाखवते.

**डिजिटल व्यवहारांचे आयकर विभागाकडून ट्रॅकिंग कसे होते?**

- क्रेडिट कार्ड व्यवहार

**उदा.**- जर एखाद्याने आयटीआरमध्ये ५ लाख रुपये उत्पन्न दाखवले, पण क्रेडिट कार्डवर ९ लाख रुपये खर्च दाखवला असेल, तर विभाग नोटीस पाठवू शकतो.

**युपीआय, वॉलेट्स व बँक व्यवहार**

युपीआय व्यवहार थेट रिपोर्ट होत नाहीत, परंतु ते ज्या बँक खात्यावर आधारित असतात, त्यातील जमा व खर्चाचे निरीक्षण होते. पेटीएम, फोनपे, गुगल पे, क्रेडिट अशा वॉलेट्समधील ट्रान्झॅक्शन्स लिंक्ड बँक अकाऊंटद्वारे ट्रॅक होतात.

**युपीआय व्यवहार म्हणजे करमुक्त व्यवहार नाही!**

अनेकजण समजतात की जीपे/फोनपे/पेटीएमवरून आलेली रक्कम म्हणजे 'गिफ्ट' किंवा खर्च वाटप', म्हणून ते कराच्या कक्षेत येत नाहीत, हे चुकीचे आहे.

यूपीआय हे फक्त पेमेंटचे माध्यम आहे, उत्पन्नाचे स्वरूप नव्हे.

जर तुम्हाला युपीआयने २ लाख रुपये आले आणि ते एखाद्या सेवेसाठी आहे, तर तो व्यवहार 'व्यवसाय उत्पन्न' मानले जाईल. त्या उलट, जर एखाद्या नातेवाईकाने गिफ्ट' म्हणून रक्कम पाठवली आणि ती ५० हजार रुपयांपेक्षा जास्त असेल (आणि नातेवाईक परिभाषित नातेवाईक नाही), तर ती करपात्र ठरू शकते.

टीडीएस आणि टीसीएसचा तपशील - डिजिटल व्यवहारातून स्पष्ट दिसतो

**टीडीएस (मूळ ठिकाणी कर वजा केला)** : उत्पन्नावर टीडीएस लागू होत असल्यास, तो एआयएस व फॉर्म २६एएसमध्ये दिसतो.

**टीसीएस (स्रोतावर गोळा केलेला कर)**

- परदेशी रेमिटन्सवर २०%
- ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मवर १%
- टूर पॅकेजवर ५%

**संशयास्पद वाटणारे व्यवहार कोणते?**

उदा. १० लाखांपेक्षा जास्त कॅश डिपॉझिट, ५० लाखांपेक्षा जास्त चालू खात्यातील डिपॉझिट, युपीआयने मिळालेली मोठी रक्कम - या सर्व व्यवहारांची चौकशी शक्य असते.

**करदात्यांसाठी उपयुक्त सल्ला**

१. एआयएस दर तीन महिन्यांनी तपासा
२. युपीआय/क्रेडिट कार्ड वापराचे व्यवस्थित बॅकअप ठेवा
३. व्यवहार आयटीआरमध्ये योग्य प्रकारे जाहीर करा
४. जुळत नाही टाळण्यासाठी एआयएस व टीआयएसचे मिलान करा

**निष्कर्ष : डिजिटल व्यवहार म्हणजे पारदर्शकतेची जबाबदारी**

- डिजिटल व्यवहारामुळे आपले जीवन सोपे झाले आहे. मात्र तेवढीच आर्थिक जबाबदारी व पारदर्शकता आवश्यक आहे. कारण, आता प्रत्येक रुपयाच्या हालचालीवर सरकारचे लक्ष आहे.
- डिजिटल व्यवहार करा - पण सजगतेने आणि योग्य नोंद ठेवूनच.
- कर चुकवू नका-कर नियोजन करा. ●●

● **अॅड. हितेश प्रवीण पारसे,**
नागपूर. ९०९६३३२३५३
कर व मालमत्ता हस्तांतरण सल्लागार

## बाटा

उद्योगाच्या उगमकथा

बाटा ही १८९४ मध्ये स्थापन झालेली जागतिक पादत्राणे कंपनी आहे. झेक प्रजासत्ताकमध्ये टोमास बाटा यांनी ही कंपनी स्थापना केली. सुरुवातीला हा एक कौटुंबिक व्यवसाय होता; परंतु बाटाने यांत्रिक उत्पादन आणि परवडणाऱ्या किमतीत लक्ष केंद्रित करून शू मेकिंगमध्ये क्रांती घडवून आणली.




युरोप आणि जागतिक स्तरावर वेगाने या कंपनीचा विस्तार झाला. भारतात बाटाने एक महत्त्वपूर्ण स्थान निर्माण केले आहे. या कंपनीची पादत्राणे घराघरात लोकप्रिय आहेत. कंपनीने किरकोळ विक्रेते देखील बनवले आहेत. टोमास बाटा यांनी त्यांच्या भावंडांसोबत जिल्न येथे टी अॅण्ड ए बाटा शु कंपनीची स्थापना केली. प्रारंभी कंपनीने दहा पूर्णवेळ कर्मचारी नियुक्त केले, ज्यांचे कामाचे वेळापत्रक निश्चित होते आणि त्यांना नियमित साप्ताहिक वेतन मिळत असे. १८९५ च्या उन्हाळ्यात टोमास आर्थिक अडचणींचा सामना करीत होते. या अडचणींवर मात करण्यासाठी त्यांनी चामड्याऐवजी कॅनव्हासपासून शूज शिवण्याचा निर्णय घेतला. या प्रकारचे शूज खूप लोकप्रिय झाले आणि कंपनीला ५० कर्मचाऱ्यांपर्यंत विस्तार करण्यास मदत झाली. चार वर्षांनंतर बाटाने त्यांची पहिली वाफेवर चालणारी मशीन बसवली, ज्यामुळे जलद आधुनिकरणाचा काळ सुरू झाला.

१९०४ मध्ये टोमासने अमेरिकेत बनवल्या जाणाऱ्या मशीनबद्दल माहिती घेतली. आपल्या कामगारांना सोबत घेऊन अमेरिकेत गेले. त्या वेळेस लीन शहर जागतिक पादत्राणे उद्योगाचे केंद्र होते. अमेरिकन उत्पादन प्रणालीचा त्यांनी अभ्यास केला. सहा महिन्यांनंतर ते परत आले आणि त्यांनी यांत्रिक उत्पादन तंत्रे सादर केली, ज्यामुळे बाटा शू कंपनी युरोपमधील मोठ्या प्रमाणात शूज उत्पादकांपैकी एक बनली. १९०८ मध्ये अँटोनिनच्या मृत्यूनंतर टोमास यांनी त्यांचे दोन धाकटे भाऊ जैन आणि बहुश यांना व्यवसायात आणले. सुरुवातीची निर्यात विक्री १९०९ मध्ये जर्मनीमध्ये सुरू झाली. त्यानंतर बाल्कन आणि मध्यपूर्वमध्ये सुरू झाली.

१९१२ पर्यंत बाटामध्ये पूर्ण वेळ १५०० कामगार कार्यरत होते. बाटाने यांत्रिक उत्पादन तंत्रांचा स्वीकार केला आणि युरोपमधील बूट उत्पादन उत्पादकांपैकी एक बनले. बाटाने युरोप आणि त्यापलीकडे आपले कार्य विस्तारले. विविध देशांमध्ये कारखाने आणि दुकाने स्थापन केली. बाटा सिस्टीमची कार्यक्षमता, गुणवत्ता नियंत्रण आणि परवडणाऱ्या किमतीवर केंद्रित होती. बाटाच्या जागतिक यशात या घटकामुळेच त्यांना योगदान मिळाले.

भारतात १९३१ मध्ये बाटाने कलकत्ताजवळील कोन्नागर येथे पहिले उत्पादन केंद्र स्थापित केले. स्थानिक हवामान आणि जीवनशैलीसाठी योग्य असलेल्या, परवडणाऱ्या आणि आरामदायी रबर व कॅनवास शूजसह भारतीय बाजारपेठेला प्रारंभी लक्ष केले.

कोन्नागरमधील सुरुवातीचे उत्पादन केंद्र बाटानगर म्हणून ओळखले जाऊ लागले. कालांतराने ते एका भरभराटीच्या टाऊनशिपमध्ये विस्तारले, जे भारतात बाटाच्या उपस्थितीचे प्रतीक बनले. बाटा इंडियाच्या मते दुकाने आणि डीलर्सचे विशाल नेटवर्क असलेले बाटा भारतातील एक आघाडीचे फुटवेअर रिटेलर बनले आहे. गार्डसह बाटा टेनिससारखे प्रतिष्ठित शूज तयार केले, जे शालेय गणवेशात एक प्रमुख घटक बनले होते. दुसऱ्या महायुद्धानंतर बाटाने आपले कामकाज पुन्हा सुरू केले आणि जागतिक स्तरावर आपली उपस्थिती वाढवली.

१९९० च्या दशकात बाटाने आपली रणनीती बदलली. किरकोळ विक्रीच्या विस्तारावर लक्ष केंद्रित केले आणि विकसित राष्ट्रांमध्ये त्यांची काही उत्पादने टप्प्याटप्प्याने बंद केले. आज बाटाची जागतिक स्तरावर मोठी उपस्थिती आहे, ज्यात अनेक खंडांमध्ये मोठ्या संख्येने कर्मचारी, दुकाने आणि उत्पादन सुविधा आहेत. १२५ वर्षांहून अधिक काळापासून कुटुंबाच्या मालकीचा व्यवसाय असलेला हा बाटा उद्योग तीन व्यवसाय युनिटमध्ये विभागलेला आहे - बाटा, बाटा इंडस्ट्रियल्स सेफ्टी शूज, स्टाईल बाटा. २००४ मध्ये बाटाचे मुख्यालय स्वित्झर्लंडमधील लॉसने येथे हलवण्यात आले आणि त्याचे नेतृत्व संस्थापकाचे नातू थॉमस जी बाटा यांच्याकडे सोपवण्यात आले.

बाटाचा अंदाज आहे की, ते दररोज दहा लाखाहून अधिक ग्राहकांना सेवा देतात. ३२ हजारांवर लोकांना रोजगार देतात, ५,३०० हून अधिक दुकाने चालवतात. ११ उत्पादन सुविधांचे व्यवस्थापन करतात आणि पाच खंडांमधील ७० पेक्षा जास्त देशांमध्ये किरकोळ विक्री करतात.

बाटाची भारतासह इतर देशांमध्ये मजबूत उपस्थिती आहे. बाटा कंपनीचे भारतातील चार प्रमुख कारखाने बटानगर (कोलकाता), फरिदाबाद, पाटणा आणि हॉस्पेट येथे आहेत.

बाटाची प्रमुख उत्पादने नॉर्थ स्टार शूज, पॉवर, टीनर, टफीज, बबलगमर्स, लीना, अॅम्बेसेडर, टॉमी टॉकीज, बाटा रेड लेबल ही आहेत. बाटा कंपनीची टॅगलाईन ''सर्वांसाठी शूज; मला माझे शूज खूप आवडतात.''.

● **प्रा. दीपक कुळकर्णी,** नागपूर
९८२२५७५२५७

● संयोजक - **अभिजित वर्तक** ९४२२९२३२०१

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com



# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे यांचे नांदेड विमानतळावर आगमन व हिंगोलीकडे प्रस्थान

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ४ ऑगस्ट -**

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आज नांदेड विमानतळावर आगमन झाले. यावेळी बाळासाहेब ठाकरे हरिद्रा संशोधन केंद्राचे अध्यक्ष तथा आमदार हेमंत पाटील, आमदार बालाजी कल्याणकर, आमदार डॉ. तुषार राठोड, आमदार आनंदराव पाटील बोंढारकर, नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे आदी मान्यवरांनी त्यांचे स्वागत केले.


हिंगोली येथील भव्य कावड यात्रा नियोजित कार्यक्रमासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विमानतळावरून हेलिकॉप्टरने हिंगोलीकडे प्रयाण केले.

# घरफोडीचा गुन्हा उघडकीस; किनवट पोलिसांनी ५.५ लाखांचा मुद्देमाल केला परत

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. ४ ऑगस्ट -**

किनवट पोलीस स्टेशन अंतर्गत दाखल घरफोडीच्या गुन्ह्याचा यशस्वी तपास करत पोलिसांनी ५ लाख ५० हजार रुपयांचा चोरीचा मुद्देमाल जप्त करून तो फिर्यादीकडे न्यायालयाच्या आदेशानुसार परत केला आहे. पोलीस अधीक्षक अभिनाश कुमार (खझड) यांच्या मार्गदर्शनाखाली केलेल्या या प्रभावी कारवाईने नागरिकांच्या सुरक्षेप्रती पोलिसांची सजगता आणि तपासातील कौशल्य अधोरेखित झाले आहे.

फिर्यादी जगदीश भास्कर जाधव (रा. धामनदरी, ता. किनवट) यांनी १४ मे २०२५ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत कुटुंबासह पुतण्याच्या लग्नासाठी घराला कुलूप लावून बाहेर गेले होते. याचवेळी अज्ञात चोरट्याने डुप्लीकेट चावीने घराचे कुलूप उघडून सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम असा ६ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल चोरला. या प्रकरणी १५ मे २०२५ रोजी किनवट पोलीस ठाण्यात भा.दं.वि. कलम ३३१(३), ३०५ अन्वये गुन्हा दाखल (गु.र.नं. १४६/२०२५) झाला.



पोलीस अधीक्षक अभिनाश कुमार पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे तपास केला. तपासादरम्यान माधव हिरामन राठोड (वय २०, रा. धामनदरी) याला संशयित म्हणून ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून ५ लाख ५० हजार रुपयांचा चोरीचा मुद्देमाल जप्त करण्यात यश आले.

०३ ऑगस्ट २०२५ रोजी पोलीस अधीक्षक अभिनाश कुमार यांच्या हस्ते जप्त केलेला मुद्देमाल फिर्यादी जगदीश जाधव यांच्याकडे वजिराबाद, नांदेड येथील पोलीस अधीक्षक कार्यालयात अधिकृतपणे परत करण्यात आला. यावेळी पोलिस निरीक्षक देविदास चोपडे आणि कर्मचारी उपस्थित होते. या गुन्ह्याच्या यशस्वी उकल आणि मुद्देमाल परत मिळवण्यासाठी तपास पथकाने केलेल्या तात्काळ आणि प्रभावी कारवाईचे पोलीस अधीक्षक अभिनाश कुमार यांनी कौतुक केले. ही कारवाई नागरिकांमध्ये सुरक्षेची भावना निर्माण करण्यास पूरक ठरली आहे.

# धर्माबाद येथे डॉ अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी

**तभा वृतसेवा**
**धर्माबाद, दि. ४ ऑगस्ट -**

साहित्य रत्न,बहुजन नायक, लोकशाहीर डॉ आण्णाभाऊ साठे यांचे १०५ वी जयंती इदिरा नगर धर्माबाद येथे दरवर्षी प्रमाणे याही वर्षी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमचे अध्यक्ष लक्ष्मण निदानकर होते प्रमुख पावणे म्हणून के.एम. वाघमारे हसेकर.सि. आर. पी. एफ, लता पागलवड, पोलीस स्टेशन धर्माबादचे ए. पी.आय, माजी सेवा निवर्ती इंडियन आर्मी चरण बुद्धिवंत, अण्णा भाऊ ट्रस्ट चे आध्यक्ष माधव पिगळे,

सत्यनारायण पवळे या सर्व मान्यवरच्या हस्ते डॉ आण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे हस्ते पुष्प अर्पण करून ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी कायेक्रमा च्या ठिकाणी बाबाराव गोणारकर, दिलीप बोईवार, बळीराम सूर्यवंशी,नागनाथ गोणारकर, पांडुरंग काळेवार, दत्ता कचणे, गंगाधर जारीकोट माजी नगर सेवक व सभापती नगर पालिका धर्माबाद, एल. एस. बोईवार सेवानिवृत्त मुख्याध्यपक, जटाळकर जी. पी, राम पवळे,सुदर्शन पहेलवान, प्रवीण गायकवाड, अविनाश पिंगळे जयंती मंडळ उप अध्यक्ष, व्ही. जी. डोईवाड जयंती मंडळ अध्यक्ष तथा लोकस्वराज आंदोलन प्रदेश अध्यक्ष व समाज बांधव मोठया संख्याने उपस्थित होते.

सायंकाळी लोकशाहीर डॉ.आण्णाभाऊ साठे यांच्या तैलचित्राचे भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी शहरातील मुख्य ठिकाणी अनिल कमलाकर यांच्या कडून खिचडी वाटप करण्यात आले,मिरवणुकीच्या वेळी डॉ अण्णाभाऊ साठे जयंती मंडळ सर्व पदाधिकारी व महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त

### प्रफूल्लनगर येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त अभिवादन

**भोकर** -लोकशाहीर साहित्य सम्राट डॉक्टर अण्णा भाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त दि. १ ऑगस्ट रोजी सकाळी दहा वाजता शहिद प्रफूल्लनगर येथे अण्णा भाऊ साठे यांच्या नियोजीत जागेवर ध्वजारोहणाचा कार्यक्रम घेण्यात आला.डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे या महापूरुषांच्या प्रतिमेचं पूजन करुन अभिवादन करण्यात आले.त्यानंतर माजी उपनगराध्यक्ष शेख यूसूफभाई यांच्या हस्ते नियोजीत ठिकाणी ध्वजारोहन करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादीचे तालूकाध्यक्ष राजूभाऊ देशमूख संजय घंटलवार मनसेचे तालूकाध्यक्ष साई जटालवार भाजपाचे सरचिटणीस माधव पवार मॉन्टी र्‍याखावार विक्रम क्षिरसागर आनंद डांगे सूनिल शहा सूशिल बिच्चेवार संदिप गायकवाड सतीश जाधव अँड.आर.के.कदम सूमेध हनमंते जेष्ठ समाजीक कार्यकर्ते जि.जी.गाडे रमेश गूंडेकर साहेबराव वाहूळकर संदिप नरवाडे राजेश सावते आदिंची उपस्थिती होती साहित्यरत्न अण्णाभाऊ यांच्या जिवनचरित्रावर संतोष मनमंदे यांनी प्रकाश टाकला कार्यक्रमाचे सूत्रसंचलन आभार अरुण डोईफोडे यांनी मानले.

### डॉ. अण्णाभाऊ साठे जयंती अध्यक्षपदी कांबळे, कार्याध्यक्षपदी गायकवाड

**नवीन नांदेड** - सिडको अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती महोत्सव अध्यक्षपदी सुरेश कांबळे, कार्याध्यक्षपदी पप्पू गायकवाड व स्वागताध्यक्षपदी दया वाघमारे यांच्या निवड जेष्ठ समाज बांधव तथा सेवानिवृत्त अधिकारी आर.जे.वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत निवड करण्यात आली.



सिडको येथील डॉ. अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती महोत्सव समितीच्या कार्यकारिणीची निवड २७ जुलै २०२५ रोजी करण्यात आली आहे, यामध्ये अध्यक्षपदी सुरेश कांबळे, कार्याध्यक्षपदी पप्पू गायकवाड, सचिव नितीन वाघमारे, उपाध्यक्ष विशाल गंडीबे, मुन्ना कौलंबीकर, सहसचिव बाबुराव कांबळे, ज्ञानेश्वर ढाकणीकर, कोषाध्यक्ष विठ्ठल घाटे, सह कोषाध्यक्ष आनंदा वाघमारे,अंबादास मेकाले,संघटक राजेश गायकवाड,सह संघटक सुनिल अंबुलगेकर,पप्पु कांबळे,युवा आघाडी चंदु कांबळे, अवधुत अंबटवार, प्रसिद्धी प्रमुख संजय गायकवाड, स्वागताध्यक्ष दया वाघमारे यांच्यी नियुक्ती करण्यात आली आहे.या बैठकीस जनार्दन गुपीले, संभाजी बसवंते,ऊतम घोडजकर, चंद्रकांत मेकाले,पि.एम. सुर्यवंशी,शंकर बसवंते,माधव राजकौर, डॉ.वाडेकर ,किशन वाघमारे यांची उपस्थिती होती. बैठकीचे सुत्रसंचलन पि.एम. सुर्यवंशी यांनी तर आभार डॉ.वाडेकर यांनी केले ,नतून अध्यक्ष व कार्याध्यक्ष यांच्या सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या.

# आ. हेमंत पाटील यांची शेत पाणंद रस्ते समितीवर निवड

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ४ ऑगस्ट -**

राज्य शासनाच्या वतीने राज्यातील शेतकऱ्यांसाठी शेत पाणंद रस्ते यांचे मजबुतीकरणसाठी समग्र योजना तयार करून समिति गठीत करण्यात आली असून या समितीवर मा. बाळासाहेब ठाकरे हरिद्रा ( हळद ) संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे अध्यक्ष तथा आमदार हेमंत पाटील यांची राज्य शासनाच्या वतीने निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीमुळे सर्व स्तरातून आमदार हेमंत पाटील यांचे अभिनंदन होत आहे.



राज्यातील शेतकऱ्यांसाठी शेतामध्ये पेरणी, आंतरमशागत, कापणी, मळणी, इत्यादी कामासाठी तसेच शेतीमाल बाजारात नेण्यासाठी बारमाही शेतरस्ते असणे अत्यंत आवश्यक आहेत. यांत्रिकीकरणामुळे शेतीतील यंत्रसामग्रीचा वापर वाढत असल्यामुळे शेतापर्यंत जाण्यास चांगले रस्ते असणे गरजेचे आहे . सध्यास्थितीत राज्यात रस्त्यांची कमतरता असल्याने शेतकऱ्यांना अनंत अडचणींचा सामना करावा लागत आहे. आणि आहे त्या ठिकाणच्या रस्त्यांची अवस्था चांगली नसल्याने राज्य शासन शेत पाणंद रस्ते प्रभावीपणे मजबूत करण्यासाठी योजना प्रभावीपणे राबविणार आहे. नुकत्याच झालेल्या पावसाळी अधिवेशनात याबाबत लक्षवेधी उपस्थित करण्यात आली होती. त्यानुसार राज्य शासनाने पाणंद रस्त्यांचे मजबुतीकरण करण्यासाठी समिती गठीत केली आहे. या समितीवर आमदार हेमंत पाटील यांची निवड करण्यात आली आहे. आमदार हेमंत पाटील हे सातत्याने शेतकऱ्यांचे प्रश्न सभागृहात उपस्थित करून मागण्या मान्य करून घेतात व शेतकऱ्यांना न्याय देण्याचे काम करत असतात. तसेच सध्या मा.बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून शेतीसंबंधी आमदार हेमंत पाटील यांचे सखोल कार्य सुरु आहे. आजवरच्या याच कामाची दखल घेऊन आमदार हेमंत पाटील यांची या समितीवर निवड करण्यात आली आहे. या समिती अंतर्गत सध्या अस्तित्वात असलेल्या मातोश्री पाणंद रस्ते योजनेचा अभ्यास करून त्यामधील त्रुटी दूर करून पुढील पाच वर्षात राज्यातील सर्व पाणंद रस्ते मजबूत करण्यासाठी नव्याने योजना आणखी प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे.

# आ.चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्ष वाटप

**तभा वृतसेवा**
**अर्धापूर, दि. ४ ऑगस्ट -**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते कंधार-लोहा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर साहेब व नांदेड जिल्हा परिषदेचे माजी सभापती प्रवीण पाटील चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त अर्धापुर तालुका राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष आत्माराम कपाटे यांच्या वतीने अर्धापूर येथे वृक्ष प्रेमी नागरिकांना फळांचे व फुलांच्या १०१ वृक्षांचे वाटप करण्यात आले.वृक्षारोपण करण्याऐवजी १०१लोकांना फळांचे व फुलांच्या रोपाचे वाटप करून त्या वृक्षाच्या संगोपनाची जबाबदारी त्यांच्यावर देण्यात आली यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस तालुका अध्यक्ष आत्माराम कपाटे, पंचायत समिती माजी सभापती बाबुराव हेंद्रे, शहराध्यक्ष साबेर, युवती जिल्हाध्यक्ष ज्योती सोनटक्के,माजी शहराध्यक्ष आ.प्रतापराव पाटील चिखलीकर व प्रविण पाटील चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्ष वाटप


अर्धापूर -राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते कंधार-लोहा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार



प्रतापराव पाटील चिखलीकर साहेब व नांदेड जिल्हा परिषदेचे माजी सभापती प्रवीण पाटील चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त अर्धापुर तालुका राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष आत्माराम कपाटे यांच्या वतीने अर्धापूर येथे वृक्ष प्रेमी नागरिकांना फळांचे व फुलांच्या १०१ वृक्षांचे वाटप करण्यात आले.वृक्षारोपण करण्याऐवजी १०१लोकांना फळांचे व फुलांच्या रोपाचे वाटप करून त्या वृक्षाच्या संगोपनाची जबाबदारी त्यांच्यावर देण्यात आली यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस तालुका अध्यक्ष आत्माराम कपाटे, पंचायत समिती माजी सभापती बाबुराव हेंद्रे, शहराध्यक्ष साबेर शेख. युवती जिल्हाध्यक्ष ज्योती सोनटक्के,माजी शहराध्यक्ष संदिप राऊत,युवा नेते विलास कल्याणकर,अनिकेत आवरदे, दत्ता पारवे,महेश राजेगोरे,पवन इंगोले,जगन कल्याणकर,शुभम मठपती,मीना वायाळ,किशोर टेकाळे,माधव राजेगोरे, शिवाजी कल्याणकर, नागेश कपाटे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.,युवा नेते विलास कल्याणकर,अनिकेत आवरदे, दत्ता पारवे,महेश राजेगोरे,पवन इंगोले,जगन कल्याणकर,शुभम मठपती,मीना वायाळ,किशोर टेकाळे,माधव राजेगोरे, शिवाजी कल्याणकर, नागेश कपाटे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महावितरण कंपनीत सुजाता पंडीत यांची सहाय्यक ऑपरेटर पदी निवड

**तभा वृतसेवा**
**उमरी, दि. ४ ऑगस्ट -**



डोंगरकडा येथिल रहिवासी कु. सुजाता राजु पंडीत हिची विद्युत महावितरण कंपनीत सहाय्यक ऑपरेटर पदी निवड झाली आहे.

महावितरण च्या वतीने घेण्यात आलेल्या परिक्षेत कु. सुजाता राजु पंडीत हिने पहिल्याच प्रयत्नात यश संपादन केले आहे. कु. सुजाता पंडीत यांच्या घरची परिस्थिती नाजूक असताना देखील यश प्राप्त केली हि कौतुकास्पद बाब आहे. तिच्या या यशाबद्दल आजी श्रीमती कचराबाई,आई वंदना, वडील राजु पंडीत, व नातेवाईकांनी कौतुक करून अभिनंदन केले आहे

# मुदखेड येथील कुरेशी समाजाचा तहसील कार्यालयावर मोर्चा



**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. ४ ऑगस्ट -**

समस्त शेतकरी बांधव व खरेदी विक्री करणारे व्यापारी व कुरेशी समाजावर होत असलेल्या अन्याय विरोधात शहरातील जमीयतुल कुरेशी समाजाच्या वतीने विविध मागण्यांसाठी दि.४ ऑगस्ट रोजी कुरेशी मोहल्ला येथुन मुक मोर्चा काढून तहसील कार्यालय मुदखेड येथील नायब तहसीलदार संतोष कामठेकर यांना निवेदन देण्यात आले आहे.

या निवेदनात कूरेशी समाज हा आपला पारंपारिक व्यवसाय बैल, म्हैस,शेळी, इत्यादी जनावराची आठवडी बाजारात ने आणण्यासाठी वाहतुकीने खरेदी - विक्री करत असतात वाहतूक करीत असताना काही संघटने कडून रस्त्यावर गाडी अडवून जातीवाचक व अश्लील भाषेत शिवीगाळ व मारहाण करून मोब लिंगचीग करत असतात

कायद्याच्या चौकटीत बसून पण बाजार समितीचे परवाने जनावराचे दाखले वैद्यकीय प्रमाणपत्रे तसेच वाहतुकीय परवाने आधी सर्व कायदेशीर कागदपत्रे आमच्याकडे असतात संघटना तरी देखील काही स्वयंघोषित संघटना व स्थानिक घटक आमच्या समाजावर अन्याय करत आहे.

समाजावर होणारे दिवसेंदिवस गो गोरक्षना कडुन होत असलेला त्रास यांना प्रतिबंध करण्यासाठी कुरेशी समाजाकडून तहसील कार्यालयावर मूक मोर्चा काढण्यात आला आहे.

यावेळी मुदखेड कुरेशी समाज तालुका अध्यक्ष मोहम्मद गौस अब्दुल रहमान, शहराध्यक्ष मोहम्मद खासिम मोहम्मद हुसेन यांच्या सह कुरेशी समाज बांधव यांची उपस्थिती होती. या मूक मोर्चा चे आयोजन शहरातील समस्त खुरेशी समाज बांधवांनी केले होते.

# श्रावणात श्रद्धेचा सोहळा; शंभो प्रतिष्ठानची भक्तिमय कावड यात्रा

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. ४ ऑगस्ट -**

पवित्र श्रावण मासाच्या प्रारंभी, श्रद्धा, भक्ती आणि सामाजिक बांधिलकी यांचे दर्शन घडवत शंभो प्रतिष्ठान नायगांवच्या वतीने बळेगाव ते गंगनबीड येथील प्रसिद्ध शंभो महादेव मंदिरापर्यंत भव्य कावड यात्रेचा शुभारंभ करण्यात आला.

गेल्या काही अनेकवर्षांपासून समाजोपयोगी आणि धार्मिक उपक्रमांमध्ये अग्रेसर असलेल्या शंभोप्रतिष्ठा नने या वर्षी देखील पारंपरिक श्रद्धेने व भक्तिभावाने कावड यात्रेचे आयोजन केले आहे. आज, रविवार दि. ३ ऑगस्ट रोजी सकाळी, माजी जिल्हा परिषद सदस्य तथा भाजपा नेते मा. बालाजी बच्चेवार यांच्या प्रमुख उपस्थितीत, हजारो श्रद्धाळू आणि भक्तांच्या जल्लोषात कावड यात्रेला सुरुवात झाली.

या कावड यात्रेत लहान थोर, महिला-पुरुष, युवक -युवतींचा भरघोस सहभाग दिसून आला. पारंपरिक वेशभूषा,डौलदार ढोल ताशांचे गजर,हर हर महादेवा च्या गगन भेदी जयघोषांनी



वातावरण भक्तिमय झाले होते. बळेगांव पासून सुरू झालेली ही यात्रा, गंगनबीड येथील शंभोमहादेव मंदिरात जलअभिषेक करून संपन्न होणार आहे.

श्रावण महिन्याच्या पावन पर्वावर सुरू झालेली ही यात्रा श्रद्धा, संयम, आणि भक्ती यांचा अनोखा संगम ठरली. शंभप्रतिष्ठानच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असून, स्थानिक पातळीवर धार्मिक जागृती व सांघिक एकतेचे उदाहरण या यात्रेतून उभे राहिले आहे.

# जिल्हाधिकाऱ्यांच्या आश्वासनानंतर धनेगावकरांचे उपोषण मागे

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. ४ ऑगस्ट -**

अप्पर जिल्हाधिकारी किरण अंबेकर यांनी उपोषणकर्ते धनेगाव गावकऱ्यांची अडचण लक्षात घेऊन्.अवैद्यरित्या मोबाईल टॉवर उभारणीस स्थगिती देण्यात आली. सदरील माहीत तोंडी पोलीस निरीक्षक यांना फोनवरून त्याजागी कोणतेही काम सध्या होणार नाही आसे सांगीतले व उपोषण कर्ते माजी जि प सदस्य मनोहर पाटील शिंदे व धनेगावकराणा या लढाईत यश आले.जिल्हाधिकारी यांच्या तोंडी आश्वासनानंतर धनेगाव करांनाचे उपोषण मागे घेण्यात आले.

धनेगाव मुजाम पेठ येथील जय हनुमान सोसायटी येथे अनाधिकृत उभा करण्यात येत असलेल्या मोबाईल टॉवरला येथल नागरिकांचा विरोध होता टॉवर उभा करणारे खाजगी कंपनी येथील नागरिकांचे व ग्रामपंचायत यांचे न जुमानता पोलीस प्रशासनाची हाताशी धरून टॉवरची उभारणी करत असल्याने येथील नागरिकांनी दिनांक ४ ऑगस्ट २०२५ रोजी जिल्हा अधिकारी कार्यालय समोर माजी जि प सदस्य मनोहर पाटील शिंदे यांच्या नेतृत्वाखाली उपोषणास बसले होते सायंकाळी पाच वाजेपर्यंत निवासी जिल्हाधिकारी किरण आंबेकर यांनी धनेगाव चे सरपंच पिंटू पाटील व भुजंगराव पाटील यांच्याशी चर्चा करून आम्ही चार दिवसात कमिटी त्यात सर्वांना बोलावून घेऊन पुढील निर्णय घेऊ तोपर्यंत सध्या त्या टावर चे काम स्थगिती करण्यात येत आहे.आणि सध्या होत असलेल्या टावर तेथून स्थलांतरित करण्याचे लेखी पत्र काढू सादर करू असे आश्वासन तोंडी दिल्याचे माहिती मनोहर पाटील शिंदे यांनी दिली यावेळी या उपोषणाला खासदार रवींद्र चव्हाण, आ. आनंदराव पाटील बोंढारकर,अमर राजूरकर, भुजंगराव पाटील डक, वाजेगावचे सरपंच शेख जमील, धनेगाव सरपंच पिंटू पाटील यांच्या सह सर्व पक्षांनी मनोहर पाटील शिंदे यांच्या उपोषणाला साथ देऊन उपोषणाच्या मागण्या मान्य करण्यात यश आले. यावेळी या उपोषण धन्यवाद /मुजाम पेठ, जय हनुमान सोसायटी येथील सर्व नागरिक यांची उपोषणास उपस्थिती होती.या सर्वांच्या प्रयत्नाला यश आल्याबद्दल मनोहर पाटील शिंदे यांनी पाठिंबा देणाऱ्या सर्वांचे आभार मानले .

# टिळकांचा तेजस्वी वारसा आणि अण्णाभाऊंची प्रकाशमय वाट!

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. ४ ऑगस्ट -**

तालुक्यातील मरवाळी तांडा येथील बालक शिक्षण प्रसारक मंडळ संचलित माध्यमिक आश्रम शाळेत थोर समाजसुधारक,स्वातंत्र्यसैनिक लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथी चे व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीचे औचित्य साधून संयुक्त अभिवादन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात शाळेचे प्राचार्य विजयकुमार देशमुख यांच्या हस्ते दोन्ही महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन,पुष्पहार अर्पण करून करण्यात अभिवादन करण्यात आले. तद्नंतर प्राथमिक, माध्यमिक व उच्च



माध्यमिक आणि पोस्ट बेसिक ज्युनियर कॉलेजमधील सर्व शिक्षकवृंद, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सामूहिकपणे या महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून या वेळी अभिवादन केले.

याप्रसंगी उपस्थित विद्यार्थ्यांशीसंवाद साधताना आश्रम शाळेतील माध्यमिक शिक्षक आनंदराव सूर्यवंशी यांनी सांगितले की, लोकमान्य टिळक हे स्वातंत्र्य चळवळीचे अग्रदूत होते. त्याच दिवशी समाजातील शोषित, वंचित, कामगार वर्गाचे दु:ख मांडणारे, प्रेरणादायी साहित्य लिहिणारे अण्णाभाऊ साठे यांचा जन्म झाला होता. त्यांच्या कथा, पोवाडे, लावण्या व कादंबऱ्यां मधून त्यांनी पुढच्या पिढीला अंधारातून प्रकाशाकडे नेण्याचे काम केले. त्यांच्या मनोगतात व्यक्त केले असता. यावेळी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी टाळ्यांच्या गजरात उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या कार्यक्रमाला माजी प्राचार्य किशन राठोड, मुख्याध्यापिका सौ. कुसुम राठोड, सुर्यकांत जाधव, धोंडीबा तेलंग, संभाजी मेहेत्रे, नागनाथ येलूरे, सुभाष राठोड, देविदास राठोड, पांडुरंग जाधव, महेंद्र सारवले, दिपक बिहाडे, व्यंकट रेकुळवाड, अजय राठोड, मुजमिल शेख, सुभाष कदम, रघुनाथ कल्याण, शिवराम राठोड आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच पोस्ट बेसिक ज्यु. कॉलेजचे नामदेव राठोड, प्रा. हेमंत बावणे, प्रा. पांडुरंग येवले, प्रा. बालाजी माळगे, प्रा. दिलीप गोरे, प्रा. विश्वनाथ स्वामी, प्रा. आकाश सूर्यवंशी, प्रा. यादव कोरनुळे, प्रा. गणेश मारताळेकर, प्रा. दिलीप माने, प्रा. प्रदीप लाभशेटवार, प्रा. शिवशंकर कोरे यांचीही उपस्थिती लक्षणीय ठरली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वस्तीगृह अधीक्षक राजू मरवाळीकर यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. शंकर राठोड यांनी केले.